इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - १७३ ▸ सोमवार,ता.२७ ऑक्टोबर २०२५ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### यूजीसी-नेट परीक्षा : अर्जासाठी मुदतवाढ

नवी दिल्ली,ता.२६-

डिसेंबर सत्रासाठी होणाऱ्या यूजीसी-नेट परीक्षेच्या ऑनलाइन अर्जाची मुदत संपत असतानाच राष्ट्रीय परीक्षा संस्थेने मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उमेदवारांना ऑनलाइन अर्जासाठी सोमवारी २७ पर्यंतची मुदत असेल. परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम मुदत मंगळवारी २८ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच, उमेदवारांना आपल्या अर्जातील तपशिलात दुरुस्ती करण्यासाठी गुरुवारी ३० ते शनिवारी १ या कालावधीत संधी मिळेल.सहाय्यक प्राध्यापक आणि ज्युनियर रीसर्च फेलोशिप (जीआरएफ) पात्रतेसाठी युजीसी नेट परीक्षेचे आयोजन केले जाते.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

दिवाळी स्पेशल ऑफर
१) गोवा ट्रिप - ३१/१०/२०२५ रोजी
३ दिवस, २ रात्री - ४००० रु.
२) श्री बालाजी दर्शन - ७/११/२०२५ रोजी
४ दिवस, ४ रात्री - ८९९९ रु.
* १० दर्शन पॉईंट दाखविले जातील.
* चहा, नाष्टा, जेवण, दर्शन पाससह
श्री गणेश टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
सांगली नाका, इचलकरंजी. मो. ९१३०३२६३०३

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

## औरंगाबादचे झाले छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक

### केंद्रीय गृहमंत्रालयाची मंजुरी

■ छत्रपती संभाजीनगर,ता.२६-

**औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक असे करण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून स्थानकाच्या नाव बदलाला मंजुरी मिळाल्यानंतर स्थानकावरील औरंगाबाद नावाचे सर्व फलक पुसून काढत त्यावर छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक असे नाव लिहिले जात आहे.**

औरंगाबाद शहराचे छत्रपती संभाजीनगर असे नामांतर होऊनही रेल्वेस्थानकावर मात्र औरंगाबाद रेल्वेस्थानक अशीच पाटी होती. त्यामुळे औरंगाबाद रेल्वे स्थानकास आता पुढे छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक या नावाने ओळखले जाईल.राज्य सरकारने घेतलेल्या औरंगाबाद आणि उस्मानाबाद नामांतर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला होता. शासनाच्या नामांतरच्या निर्णयाविरोधात याचिकाकर्त्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असता नामांतराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.



मुंबई-पुणे-कोल्हापूर या दिशांना जाणाऱ्या चाकरमान्यांच्या परतीच्या लोंढ्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होत आहे. पुणे -सातारा दरम्यान जवळपास ५० किलोमीटरच्या पट्ट्यात वाहनांचा प्रचंड ताण जाणवत आहे.

## जयसिंगपूरच्या युवकाचा उदगावजवळ खून

### पार्टीतील वादातून डोक्यात दगड घातला

■ जयसिंगपूर, ता.२६ (प्रतिनिधी)-



**काही दिवसांपूर्वी सुनील पाथरवट याच्या खुनाची घटना ताजी असतानाच पुन्हा उदगाव-अंकली दरम्यान असलेल्या कृष्णा नदी काठावर रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास ३५ वर्षीय युवकाचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. लखन सुरेश बागडी (वय ३५, जयसिंगनगर,जयसिंगपूर) असे खून झालेल्या युवकाचे नांव आहे.**

प्राथमिक माहितीनुसार लखनच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, लखन बागडी हा आपल्या काही मित्रांसोबत उदगावला पाणीपुरवठा

(पान २ वर)

## बी.आर. गवई यांच्यानंतर सूर्यकांत होणार सरन्यायाधीश

### २४ नोव्हेंबरला पदभार स्वीकारणार

■ नवी दिल्ली,ता.२६-

**सर्वोच्च न्यायालयाचे सर्वात ज्येष्ठ न्यायमूर्ती सूर्यकांत पुढील महिन्यात भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. नियुक्तीची औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर, न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारणार आहेत आणि जवळजवळ १५ महिने सरन्यायाधीश म्हणून काम करतील. त्यांचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२७ रोजी संपण्याची अपेक्षा आहे.**



न्यायमूर्ती सूर्यकांत यांना ५ ऑक्टोबर २०१८ रोजी हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली होती. २४ मे २०१९ रोजी ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले.सूर्यकांत यांच्याबरोबर काम करणारे लोक त्यांच्या संतुलित निर्णयक्षमतेसाठी आणि न्यायाप्रती अढळ वचनबद्धतेसाठी त्यांचे कौतुक करतात. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती मिळण्यापूर्वी त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात १४ वर्षांहून अधिक काळ काम केले होते. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सार्वजनिक संसाधनांचे संरक्षण, जमीन संपादन आणि भरपाई, पीडितांचे हक्क, आरक्षण धोरणे आणि संवैधानिक तत्त्वांचे व्यापक संतुलन यासारख्या बाबींबद्दल सातत्याने संवेदनशीलता दाखवली आहे.१४ वर्षांहून अधिक काळ पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केल्यानंतर, न्यायमूर्ती सूर्यकांत यांना ५ ऑक्टोबर २०१८ रोजी हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली होती. २४ मे २०१९ रोजी ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. चंदीगडमध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून १४ वर्षांच्या कारकिर्दीत,

(पान २ वर)



फलटण तालुक्यातील विकास कामांचे ऑनलाईन भूमिपूजन व लोकार्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेजारी मंत्री शंभूराजे देसाई, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, रणजितसिंह नाईक निंबाळकर, मंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन पाटील आदी.

## महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात राजकारण खपवून घेणार नाही

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ फलटण,ता.२६(प्रतिनिधी)-

**फलटणमध्ये आत्महत्या केलेल्या भगिनीला न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, परंतु या घटनेत राजकारण किंवा प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रयत्न कोणी करत असेल तर सहन करणार नाही, त्याला उत्तर दिले जाईल. महायुतीचे सरकार विकासाचा विचार करणारे व समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण येथील विराट सभेत सांगितले.**

### फलटणमध्ये २० हजार कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

फलटण शहर व तालुक्यातील निरा- देवघर प्रकल्प दुसरा टप्पा योजनेचे उद्घाटन व लोकार्पण तसेच त्यापुढील टप्प्याचे भूमिपूजन, प्रशासकीय भवन, महसूल भवन इमारतीचे भूमिपूजन, दहिवडी फलटण रस्त्याचे भूमिपूजन,

(पान २ वर)

## विठ्ठल -रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू

### भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा व व्हीआयपी दर्शन बंद

■ पंढरपूर,ता.२६ (प्रतिनिधी)-

**दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहूर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षी २६ रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पूजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला. विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड; तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल - रुक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू राहणार आहे.**



श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख,

(पान २ वर)

## एसटी बसचालकांची होणार अल्कोहोल तपासणी

### एसटी महामंडळाचा निर्णय

■ पुणे,ता.२६ -



**दिवाळी सण साजरा करून शहरात परतणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने अशा प्रवाशांना सुखकर आणि सुरक्षित प्रवास करता यावा, कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी चालक-वाहकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी केली जात असल्याचे सांगण्यात आले.एसटी महामंडळाच्या ताफ्यातील सर्व बसचालकांची प्रत्येक फेरीपूर्वी अल्कोहोल तपासणी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात खासगी ठेकेदारांच्या

(पान २ वर)

## कोल्हापूर -कलबुर्गी मार्गावर विशेष रेल्वे

■ सोलापूर, ता.२६ -

**कोल्हापूर ते कलबुर्गी मार्गावर विशेष रेल्वे धावणार आहे. याचा फायदा दोन राज्याच्या चार जिल्ह्यातील शेकडो प्रवाशांना होणार आहे. शिवाय या विशेष गाडीमुळे महालक्ष्मीसह गाणगापूरला दर्शनासाठी भाविकांना सहज जाता येणार आहे.**

गाडी क्रमांक ०१४५१ ही विशेष गाडी कोल्हापूर-कलबुर्गी या मार्गावर धावणार आहे. ही गाडी कोल्हापूरच्या स्थानकांवरून सकाळी ६.१० वाजता सुटेल. सदर गाडी हातकणंगले,जयसिंगपूर, मिरज, आरग, बेळंकी,सालाग्रे, कवठे महांकाळ, लंगरपेठ, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, जवळे, वासुद, सांगोला, पंढरपूर, मोडनिंब, कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट रोड,

(पान २ वर)

## गोपाळ बदनेला पोलीस कोठडी

### पंढरपूर ते बीड व्हाया सोलापूरला बदने गेला; काही पोलिसांच्या संपर्कात

■ फलटण, ता.२६(प्रतिनिधी)-

**येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर फरार झालेल्या पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याने शनिवारी रात्री पोलीस ठाण्यात शरण आला. त्याला रात्रीच अटक केली. बदनेला रविवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. दरम्यान, न्यायालयाने बदनेला ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.**

रात्री जवळपास साडेबारा वाजता तो पोलीस ठाण्यात हजर झाला होता. यानंतर त्याला शहर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. रात्री एकच्या सुमारास त्याला वैद्यकीय तपासणीसाठी नेले होते. त्यानंतर पहाटे चार वाजता त्याला पुन्हा पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

या प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून निलंबित पीएसआय गोपाळ बदनेची बाजू ॲड. राहुल धायगुडे यांनी मांडली. यावेळी बदनेच्या बाजूने युक्तिवाद करताना वकिलांनी बदने आणि महिला डॉक्टर यांच्यातील भांडणाचा उल्लेख केला. तसेच बदनेला बळीचा बकरा बनवण्यात

(पान २ वर)

## अमेरिकेत पार्टीमध्ये गोळीबार; दोघांचा मृत्यू ; ११ जखमी

■ वॉशिंग्टन,ता.२६ -

**अमेरिकेच्या नॉर्थ कॅरोलिनामधील मॅकस्टन शहराच्या बाहेरील भागात हॅलोविन पार्टीत गोळीबार झाला. त्यात दोघांचा मृत्यू तर ११ जण जखमी झाले.**

रोबेसन काउंटी शेरिफ कार्यालयानुसार, ही घटना दक्षिण-पूर्व नॉर्थ कॅरोलिनामधील मॅकस्टन शहराजवळील ग्रामीण भागात घडली, जिथे एका घरात झालेल्या पार्टीत १३ जणांवर गोळी झाडण्यात आली.

(पान २ वर)

## ...तर राज्याचे गृहमंत्री काय करतात?

### विजय वडेट्टीवार

■ सातारा,ता.२६-

**महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणावरून विरोधकांनी सरकार आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धारेवर धरले आहे. वर्दीतले गुंड जर का बलात्कार करत असतील, तर राज्याचे**

(पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १२३४०० रु. | १५३००० रु. |

अंडी ६२० रुपये शेकडा

### हास्यतुषार - सुरेंद्र दास



आरोपांच मोहळ उठवायचं आणि वर कान पिचक्या यालाच राजकारण म्हणतात !

## प्रभाग रचना झाली,आरक्षण कधी?

- इच्छुकांचा भागात संपर्क वाढला
- प्रभाग मोठे झाल्याने कसरत होणार
- महायुतीतील घटक पक्षांचे 'वेट अँड वॉच'!

■ इचलकरंजी,ता.२६-

**प्रभाग रचना जाहीर झाली तरी प्रभाग आरक्षण अद्याप जाहीर झालेले नाही. यामुळे आता सर्वांच्या नजरा प्रभाग आरक्षणाकडे लागल्या आहेत. तथापि काहीही झाले तरी निवडणूक लढवायचीच, असा पण केलेल्या इच्छुक उमेदवारांनी भागात संपर्क वाढवण्यास सुरूवात केली आहे. प्रभाग मोठे झाल्याने तसेच प्रभागात थोडा नविन भाग समाविष्ठ झाल्याने अशा ठिकाणी उमेदवारांना कसरत करावी लागणार आहे. शिवाय स्थानिक पातळीवर भाजप आणि महाविकास आघाडी वगळता महायुतीमधील घटक पक्षांनी 'थांबा व पहा' हीच भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.**





इचलकरंजी महापालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना जाहीर झाली आहे. मात्र अद्याप महापौरपदाचे आणि प्रभागातील आरक्षण जाहीर केलेले नाही. तथापि राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत हालचाली सुरू आहेत. महायुती होणार कि नाही

(पान २ वर)

निवडणुकीच्या तोंडावर अनेकजण या पक्षातून त्या पक्षात प्रवेश करताना दिसत आहेत. पण इकडून तिकडे उडी मारली तरी निवडून येणार का? हा खरा सध्या प्रश्न काहींच्या बाबतीत उपस्थित केला जात आहे. शिवाय काही पक्षात उमेदवारीसाठी आताच चढाओढ पहायला मिळत आहे. अशावेळी बाहेरून आलेल्यांना पक्षाने उमेदवारी दिली तर निष्ठावंत गप्प बसणार कि बंडखोरी करणार, हे देखील पहावे लागणार असून यातूनच पाडापाडीचे राजकारण रंगणार असल्याचे बोलले जात आहे.



हार्दिक शुभेच्छा
आमचे परममित्र, युवा उद्योगपती श्री. अंकित अनिल हावळ यांना वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा !
श्री. अंकित अनिल हावळ
अब्राहाम आवळे
मा.नगरसेवक, इ.न.पा.
आकाश रावळ * सुनिल शिंदे
राजाराम वॉर्कर्स

(पान १ वरून)

# बी.आर. गवई यांच्यानंतर सूर्यकांत होणार सरन्यायाधीश

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले, ज्यात तुरुंगातील कैद्यांना पत्नींना भेटण्याची परवानगी देण्याचा निर्णयाचाही समावेश आहे.एका पतीने आपल्या पत्नीची हत्या केल्याच्या प्रकरणात शिक्षा सुनावताना त्यांच्या लक्षात आले की, आरोपीला चार मुली आहेत. यानंतर त्यांनी स्वतः एका महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांशी बोलून मोठ्या मुलीला मोफत शिक्षण देण्याची विनंती केली होती.पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात, बलात्कार प्रकरणांमध्ये डेरा सच्चा सौदाच्या प्रमुखाला तुरुंगवास झाल्यानंतर हिंसाचार झाला होता. यानंतर २०१७ मध्ये डेरा सच्चा सौदाचे निर्जंतुकीकरण करण्याचे आदेश देणाऱ्या आणि त्यातील आर्थिक अनियमिततांची केंद्रीय चौकशी करण्याचे निर्देश देणाऱ्या पूर्ण खंडपीठाचा न्यायमूर्ती सूर्यकांत भाग होते.हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांनी प्रशासकीय सुधारणा आणि न्यायालयीन कार्यक्षमता सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले. मूलभूत सुविधांची उपलब्धता ही संविधानात असलेल्या जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा अविभाज्य भाग आहे, यावर त्यांनी पुन्हा भर दिला होता.

# एसटी बसचालकांची होणार अल्कोहोल तपासणी

शिवशाही, शिवनेरी बसेस भाडेतत्त्वावर चालविल्या जातात. या गाड्यांना चालक पुरवण्याचे कामही ठेकेदारच करतात. यावर महामंडळाने अशा सर्व चालकांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. गतवर्षी एका शिवनेरी बसवरील चालक मद्यपान करून बस चालवत असल्याचा प्रकार समोर आला. हा चालक ठेकेदाराकडील होता. त्यानंतर गतवर्षी महामंडळाच्या कारभारावर प्रचंड टीका झाली होती.या पार्श्वभूमीवर दिवाळीमध्ये चालक-वाहक ड्यूटीवर आल्यावर मद्यपानाची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात येत आहे. पुणे विभागातील स्वारगेट आणि शिवाजीनगर आगारासह जिल्ह्यातील सर्व आगारांतील चालक-वाहकांची अल्कोहोल तपासणी करण्यात येत आहे, चालक-वाहक गाडीत बसण्याअधीच अशी तपासणी केली जाते, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

# कोल्हापूर -कलबुर्गी मार्गावर विशेष रेल्वे

दुधनी आणि गाणगापूर रोड यामार्गे कलबुर्गीला जाणार आहे.तसेच सर्वच ठिकाणी या विशेष गाडीला थांबा देण्यात आला आहे.परिणामी कोल्हापूर, सांगली, सोलापूरसह कलबुर्गी आदी शहर जिल्ह्यातील शेकडो प्रवाशांना याचा फायदा होणार आहे.

# युवकाचा उदगावजवळ खून

करणाऱ्या जॅकवेलजवळील नदीवर पार्टीसाठी गेला होता.यादरम्यान झालेल्या किरकोळ वादातून एकाने लखनच्या डोक्यात दगडाने प्राणघातक वार केला. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे.या घटनेची माहिती मिळताच उदगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संशयितांच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत.तसेच खुनाचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.दरम्यान,लखन बागडी याच्याबरोबर नेमके किती मित्र होते.कोणत्या कारणातून वाद झाला. संशयित एकच आहे की या प्रकरणात आणखी काहीजणांचा सहभाग आहे,हे तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

**जयसिंगपूर येथील गल्ली क्र. १३ येथे काही दिवसांपूर्वी सुनील पाथरवट याचा खून करण्यात आला होता. ही घटना ताजी असताना पुन्हा लखन बागडी याच्या खुनामुळे जयसिंगपूर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात राजकारण खपवून घेणार नाही

(पान १ वरून)

आळंदी -पंढरपूर पालखी महामार्गमधील फलटण नगरपालिका क्षेत्रातील रस्ते उद्घाटने, फलटण शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन आणि वाठार पोलिस स्टेशन इमारती व पोलीस वसाहत इमारतीचे लोकार्पण,प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतून तालुक्यातील रस्ते व आसू फलटण रस्त्याचे भूमिपूजन, फलटण गिरवी रस्त्याचे लोकार्पण अशा सुमारे २० हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कृतज्ञता सोहळा झाला.

फडणवीस पुढे म्हणाले,रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी या दुष्काळी भागाला पाणी मिळवून दिल्याशिवाय शांत राहणार नाही, असा विडा उचलला व तो संघर्ष करून पूर्ण केला म्हणून त्यांचे अभिनंदन करावे लागेल. निरा - देवधरचे पाणी फलटण, माळशिरस, सांगोला तालुक्याला यापूर्वीच पोहोचले असते.परंतु त्यावेळच्या लोकप्रतिनिधींना हे पाणी दुसरीकडे द्यायचे होते.त्यामुळे हे पाणी पोहोचू शकले नाही. परंतु आमच्या सरकारने ही कामे करून दाखवली आणि आज हरित फलटण व माणदेश निर्माण होत आहे. रणजीतसिंह नाईक निंबाळकर व आमदार सचिन पाटील यांनी फलटण सारख्या तालुक्याच्या ठिकाणी जिल्हास्तरावरील सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आता जिल्हा मागू नका अशी मिश्किली करत नागरिकांचे जीवन यामुळे सुखकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार सचिन पाटील यांनी विचार मांडले.यावेळी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले,आमदार मनोज घोरपडे, आमदार अतुल भोसले, आमदार महेश शिंदे, आमदार राहुल कुल, समशेरसिंह नाईक निंबाळकर, प्रल्हादराव पाटील, दिलीपसिंह भोसले,ॲड.जिजामाला नाईक निंबाळकर, ॲड.नरसिंह निकम, जयकुमार शिंदे, राम निंबाळकर, शेखर गोरे, विलास नलावडे, चेतनसिंह केदार,जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, चंद्रकांत फुलकुंडवार,विभागीय पोलीस अधीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस प्रमुख तुषार दोशी, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराजन, प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर, तहसीलदार डॉ.अभिजीत जाधव, तहसीलदार अभिजीत सोनावणे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व शासकीय अधिकारी,नागरिक उपस्थित होते.प्रास्ताविक सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी तर सूत्रसंचालन जयकुमार शिंदे यांनी केले.आभार शिवरूपराजे खर्डेकर यांनी मांनले.

# प्रभाग रचना झाली, आरक्षण कधी?

**(पान १ वरून)** याची अद्याप शाश्वती नसली तरी भाजपने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. यामध्येही हाळवणकर गट आणि आवाडे गटामध्ये अंतर्गत स्पर्धा दिसून येत आहे. महाविकास आघाडीमधील अनेकांनी आपापल्या प्रभागात जुळणी लावण्यास सुरवात केली आहे. याशिवाय निवडणूक लढवायचीच अशी भूमिका घेतलेल्या इच्छुक उमदेवारांनीही प्रभागात गाठीभेटीवर जोर दिला आहे.दीपावलीच्या कालावधीत काहींनी प्रभागात फिरताना कोणत्या भागात, गल्लीत कोणाचे वजन आहे याचा कानोसा घेतला आहे.निवडणुकीच्या तोंडावर काही दिवसांपूर्वी काही आजी-माजी नगरसेवकांनी भाजपात प्रवेश केला. तर काहीजण अद्याप प्रवेशाच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. याशिवाय महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे पदाधिकारी मात्र सावध पवित्रा घेताना दिसत आहेत. दरम्यान, फायदा असेल तरच महायुती करू, अशी भूमिका महायुतीच्या वरीष्ठ नेत्यांकडून घेतली जाणार असेल तर इचलकरंजी महापालिका क्षेत्रात महायुतीतील घटक पक्ष कोणती भूमिका घेणार! हे पहावे लागणार आहे. यासाठी प्रभाग आरक्षण जाहीर झाल्यानंतरच राजकीय घडामोडींना अधिक गती येणार आहे.

# विठ्ठल -रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू

(पान १ वरून)

धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद होवून नित्यपूजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील.९ नोव्हेंबर (प्रक्षाळपूजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. श्रींचा पलंग काढताना पुजेवेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर),ॲड.माधवीताई निगडे, प्र.व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ,अतुल बक्षी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

पंरपरेनुसार श्रींचा पलंग काढल्याने दैनंदिन २४ तास मुखदर्शन व २२.१५ तास पदस्पर्शदर्शन उपलब्ध होत आहे.याशिवाय, मंदिर समितीच्या संकेतस्थळावरून व जागोजागी एलईडी टिव्हीद्वारे लाईव्ह दर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. संपूर्ण यात्रा कालावधीत भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा व व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्यात आलेले आहे.श्रींचा पलंग काढणे, एकादशीच्या सर्व पुजा, महानैवेद्य, श्रींच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला,प्रक्षाळपुजेचे योग्य ते नियोजन करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

**मागील आषाढी यात्रेदरम्यान भाविकांच्या गर्दीचा अनुभव लक्षात घेऊन, यंदाच्या कार्तिकी यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. दर्शन रांगेच्या व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून भाविकांना सुलभ,सुव्यवस्थित आणि जलद दर्शनाची सुविधा मिळावी यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.**

# पार्टीमध्ये गोळीबार; दोघांचा मृत्यू ; ११ जखमी

**(पान १ वरून)** विल्किन्स यांनी सांगितले की, गोळीबार पार्टीत सहभागी दोन गटांमध्ये झाला. या पार्टीत ३०० हून अधिक लोक सहभागी होते, ज्यांची वयोमर्यादा १६ वर्षांपासून सुमारे ५० वर्षांपर्यंत होती.

पोलीसांनी सांगितले की, या पार्टीत दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला, आणि परिस्थिती इतकी गंभीर झाली की दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू केला, ज्यात दोन लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जखमी झाले. पोलिसांनी मृतांपैकी एकाची ओळख १६ वर्षीय किशोर आणि दुसऱ्या व्यक्तीची ओळख ४९ वर्षांचा जेसी लॉकलीयर जूनियर म्हणून केली. या प्रकरणात कोणालाही अटक झाली नव्हती.पोलिसांनी सांगितले की, पार्टीत अनेकांनी गोळी झाडणे सुरू केले होते.अहवालांनुसार, रात्री सुमारे १:१५ वाजता पोलिसांना जोरदार संगीताच्या तक्रारी मिळाल्या. तक्रारीनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाण्याआधीच गोळीबाराची माहिती मिळाली. गोळीबारानंतर १५० हून अधिक लोक घटनास्थळावरून फरार झाले.

# ...तर राज्याचे गृहमंत्री काय करतात?

(पान १ वरून)

गृहमंत्री काय करत आहेत?, असा संतप्त सवाल विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून सट्टा, ड्रग्स आणि बलात्कारासारखे गुन्हे राजरोसपणे सुरू असल्याचा आरोपही केला.

एका उच्चशिक्षित महिला डॉक्टरला जर सुरक्षा मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांचे काय, असा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणाची फास्ट ट्रॅकवर चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

# पंढरपूर कार्तिकीसाठी विशेष रेल्वे

■ सोलापूर, ता.२६ -

**वारकऱ्यांसाठी कार्तिकी एकादशी महत्त्वाची असते. पंढरपूरच्या कार्तिकी एकादशीनिमित्त वारकरी भाविकांसाठी मध्य रेल्वेच्या येथील विभागीय कार्यालय प्रशासनाने सोलापूर-मिरज व मिरज-लातूर या मार्गावरून विशेष गाड्या चालवण्याचे घोषित केले आहे.**

३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या काळात रेल्वेच्या ३६ विशेष फेऱ्या चालवल्या जाणार आहेत.गाडी क्रमांक ०१४४३ मिरज-लातूर ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरपर्यंत दररोज सकाळी ७ वाजता मिरजहून सुटून ती दुपारी ३:३० वाजता लातूरला पोहोचणार आहे. ती गाडी सकाळी १०:१५ वाजता पंढरपूरच्या रेल्वेस्थानकावर येईल. गाडी क्रमांक ०१४४४ ही लातूर-मिरज दररोज दुपारी ४ वाजता लातूरहून सुटून याच दिवशी रात्री ११:४५ वाजता मिरजला पोहोचणार आहे. या गाडीचे सकाळी ७:४५ वाजता पंढरपूरच्या स्टेशनवर आगमन होईल. गाडी क्रमांक ०१४४२ लातूर-मिरज ही दररोज सकाळी ६ वाजता लातूरच्या स्थानकावरून सुटून ती दुपारी १:५० वाजता मिरजला पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४४१ मिरज-लातूर दररोज रात्री १० वाजता मिरजच्या स्थानकावरून सुटेल व ती दुसऱ्या दिवशी पहाटे ५:३० वाजता लातूरच्या स्थानकावर पोहोचेल. तीच गाडी पुन्हा रात्री ११:५० वाजता पंढरपूरला पोहोचेल.

**३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरदरम्यान रेल्वेच्या ३६ विशेष फेऱ्या होणार**

# परतीच्या पावसामुळे भात पिकाचे नुकसान

## शेतकरी अडचणीत; सरकारने मदत करण्याची मागणी

■ कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्यात परतीच्या पावसाने काढणीला आलेल्या भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके जमीनदोस्त झाल्याचे पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येत आहे. भात पीक जमीन दोस्त झाल्याने शेतकरी मात्र आर्थिक अडचणीत येणार आहे.**

मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या परतीच्या पावसामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पीक काढणीच्या टप्प्यावर आली असताना झालेल्या अवकाळी पावसामुळे शाहूवाडी, राधानगरी, करवीर, पन्हाळा, शिरोळ आणि गगनबावडा तालुक्यांतील भातशेतीची परिस्थिती बिकट झाली आहे. दुपारी तासभराहून अधिक काळ मुसळधार पाऊस कोसळल्याने शेतात पाणी साचले, धान्य गळून पडले आणि मळणीतील कामेही ठप्प झाली आहेत. कोल्हापूर जिल्ह्याला गेली चार दिवसापासून अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे.

भाताची पूर्ण वाढ होऊन भात पोसवले आहे. त्यामुळे सध्या भात कापणी आणि मळणीला वेग आला असतानाच परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने भात कापणीमध्ये विघ्न निर्माण झाले आहे. हातातोंडाशी आलेले भात पिक जमीनदोस्त झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणीही केली जात आहे.दरम्यान सततच्या पावसामुळे भात कापणी आणि झोडपणीची कामे थांबली आहेत. ज्यामुळ शेतकरी हतबल झाले आहेत. मुळातच उत्पादन खर्च आणि करावी लागणारी मेहनत एवढाही आर्थिक फायदा शेतकऱ्यांना मिळत नसताना परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. कापणीला आलेले पीक आता पूर्णपणे वाया गेले आहे. कष्ट करून उभे केलेल्या पिकापैकी काहीच हातात राहत नाही. त्यातच मजुरांना पगार स्वतःच्या पैशातून द्यावा लागतो. तेव्हा सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# व्यवसायातील स्पर्धेतून सत्तुराने वार; परस्पर विरोधी तक्रारी

■ इचलकरंजी,ता.२६-

**व्यवसायातील स्पर्धेतून एकमेकांवर सत्तुराने वार करून तसेच दगडाने मारून गंभीर जखमी केल्याची घटना जवाहर नगर फकीर मळ्यात शुक्रवारी सायंकाळी चार वाजता घडली. यप्रकरणी परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या असून सहाजणांवर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

रूवेज हाशमी (वय २१, रा. जवाहनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तौसिफ इनामदार (रा.इंदिरा कॉलनी, कबनूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास फिर्यादिचे राहते घरासमोर तौसिफ इनामदार याने व्यवसायातील स्पर्धेच्या कारणातून फिर्यादिचे वडील अब्दुलरहमान मुस्तफा हाशमी (वय ४८) यांच्या मानेवर व हातावर सत्तुराने वार करून गंभीर जखमी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले आहे. तर तौसिफ इनामदार यांने दिलेल्या फिर्यादिवरून झाकीर हाशमी, रहेमान हाशमी, रियाज पठाण, आब्बु हाशमी, युनुस हाशमी (सर्व रा.शहापुर) या पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फिर्यादित इनामदार यांनी म्हटले आहे कि, व्यवसायाच्या कारणातून हाशमी कुटुंबाशी वाद आहे. रहेमान हाशमी यांची पुतणी खलीफा हाशमी हिच्या कार्यक्रमात गेलो असता तिथे झाकीर हाशमी यांनी तू इथे का आला आहेस, असे म्हणून आपल्याशी वाद घालत अन्य काहीजणांना जमवून सत्तूर, दगड व खुर्च्या तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे म्हटले आहे.

# मध्यवर्ती बसस्थानक प्रवाशांनी हाऊसफुल्ल;सुट्टी संपल्याने परतीसाठी गर्दी

■ इचलकरंजी,ता.२६-

**दिवाळीची सुट्टी संपल्याने अनेकजण आपापल्या गावी परतताना दिसत आहेत. यामुळे रविवारी सकाळपासूनच इचलकरंजी मध्यवर्ती बस स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी दिसून आली.**

दीपावलीच्या काळात शाळा, महाविद्यालये तसेच उद्योग जगतातही काही काळ सुट्टीमुळे बंद असतात. यामुळे विद्यार्थी वर्गासह कामगार, महिला आपल्या गावी जातात. यावेळी एसटीचा प्रवास हा सुरक्षित प्रवास मानला जातो. यामुळे दीपावलीच्या काळात तसेच दीपावली संपल्यानंतरही एसटीला मोठी गर्दी असल्याचे दिसून येत आहे. आठवडा दीड आठवड्याच्या सुट्टीनंतर शाळा, महाविद्यालये तसेच कारखाने सुरू होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह कामगार तसेच माहेरी गेलेल्या लेकी, सुना परतत



आहेत. लांब पल्ल्याच्या एसटी बसेस वेळेवर सोडण्यात येत असल्याने अनेक नागरिकांनी आधीच आरक्षण केल्याचे दिसून येत होते.

येथील मध्यवर्ती बस स्थानकातही रविवारी प्रवाशांची प्रचंड गर्दी दिसून आली. इचलकरंजी, जयसिंगपूर, कोल्हापूर, सांगली यासह ग्रामीण भागांत जाणाऱ्या फलाटवर महिला भगिनींसह नागरिकांची दिवसभर गर्दी उसळली होती. यामुळे एसटी बस स्थानकातील कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ होत असल्याचे दिसून आले. गेल्या आठवडाभरापासून एसटीला अधिकच गर्दी दिसून येत असल्याने महामंडळाच्या उत्पन्नात चांगलीच भर पडली असल्याचे दिसून येते.

# कृषी विक्रेत्यांचा उद्या राज्यव्यापी संप

■ टाकवडे,ता.२६(प्रतिनिधी)-

**शिरोळ तालुक्यातील सर्व कृषी विक्रेत्यांनी राज्यव्यापी कृषी विक्रेत्यांच्या संपात सहभागी होऊन पाठिंबा देण्याबरोबरच संप यशस्वी करण्याचे आवाहन तालुका कृषी कीटकनाशक बी बियाणे आणि विक्रेता असोसिएशनच्या बैठकीत करण्यात आले आहे. टाकवडे येथे ही बैठक झाली.**

साथी पोर्टलच्या माध्यमातून बियाणे विक्री करणे शक्य होत नाही व ही बाब अन्यायकारक आहे. कृषी सेवा केंद्रावरती लादण्यात येत आहे असे मत व्यक्त करत कृषी सेवा केंद्रधारकांनी २८ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी बंद पुकारला आहे. साथी ॲप वर बियाणे कंपन्यासह घाऊक व किरकोळ बियाणे विक्रेत्यांना नोंदणीची सक्ती करण्यात येत आहे. बियाणे हंगाम हा ठराविक महिन्याचा असतो. बियाण्यांची पोर्टलवर नोंद करणे सहज शक्य होत नाही. गोडावून मधून बियाणे शेतकऱ्यांना सहज उपलब्ध करून देता येत नाही. त्यामध्ये बराच वेळ जातो. यासह इतर अडचणी आहेत. त्यामुळे पोर्टलला कृषी विक्रेत्यांचा विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यातून सर्व कृषी विक्रेत्यांनी आपली दुकाने बंद ठेवून राज्यव्यापी बंद यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# निजामअली म्हाबरी यांचे निधन

इचलकरंजी,ता.२६-



**येथील इचलकरंजी नगरपालिका शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक हाजी निजामअली म्हाबरी ( वय ७५) यांचे निधन झाले.म्हाबरी हे मूळचे कवठेसार (ता.शिरोळ) गावचे होते.ते इचलकरंजीतील इंदिरा कॉलनीत वास्तव्यास होते.**

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,सुना,मुलगी,जावई,नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# इम्रान खान संदर्भातील याचिकेवर ४ नोहेंबरला सुनावणी

इस्लामाबाद,ता.२६ -

**माजी पंतप्रधान इमरान खानच्या सोशल मीडिया अकाउंट 'एक्स' बंद करण्याच्या मागणीसंदर्भातील याचिकेवरील सुनावणी ४ नोव्हेंबरला निश्चित केली आहे.**

७३ वर्षीय इमरान खान गेल्या दोन वर्षांपासून अनेक प्रकरणांमध्ये तुरुंगात आहे. इस्लामाबाद हायकोर्टकडून जारी केलेल्या कारण सूचीनुसार न्यायमूर्ति अरबाब मोहम्मद ताहिर या याचिकेवर सुनावणी करतील.न्यायालयाने पाकिस्तान तहरीक-ए-इंसाफचे संस्थापक इमरान खान, नॅशनल सायबर क्राईम एजन्सी, तुरुंग अधीक्षक आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस जारी करून त्यांचे लिखित उत्तर मागवले आहे. ही याचिका एका नागरीकाने वकिल जफरुल्लाहच्या माध्यमातून दाखल केली आहे.याचिकेत म्हटले आहे की, इमरान खान 'एक्स' अकाउंटवरून बेकायदेशीर आणि भडकाऊ संदेश प्रसारित करत आहेत, ज्यामुळे सार्वजनिक अस्थिरता निर्माण होऊ शकते आणि कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो.

# गोपाळ बदनेला पोलीस कोठडी

**(पान १ वरून)**आल्याचे सांगितले. माझ्या ड्युटीमध्ये आरोपी वैद्यकीय चाचणीसाठी का आणता? असे म्हणत महिला डॉक्टर आणि बदनेमध्ये वाद झाला होता. एवढेच नाही तर २५ जूनला दोघांनी एकमेकांविरोधात तक्रारी देखील केल्या होत्या. फलटण पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीना वैद्यकीय चाचणीसाठी नेल्यावर माझ्या ड्युटीमध्ये आरोपी का आणता यावरून महिला डॉक्टरने बदनेशी वाद घातला होता. मात्र त्यावेळी बलात्काराची तक्रार करण्यात आलेली नाही, असे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादात म्हटले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून बदने पोलिसांना गुंगारा देत होता. त्याच्या शोधासाठी फलटण आणि सातारा स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके बीड, पुणे, पंढरपूर या ठिकाणी शोध घेत होती. पण तो काही पोलिसांच्या हाती लागला नाही.गोपाळ बदने फलटणहून पंढरपूरला गेला होता. तिथून तो सोलापूरला गेला. पुढे सोलापूरहून बदने बीडला आपल्या घरी गेला. दरम्यानच्या काळात बदने सोलापूरमधील काही पोलिसांच्या संपर्कात असल्याचे समोर आले.

पोलिसात हजर न झाल्यास बडतर्फ करण्याची तंबी बदनेला मिळाली होती. नोकरीतून बडतर्फ होण्याच्या भीतीनेचं बदने फलटण पोलिसांना शरण आल्याचे बोलले जात आहे. फरार असताना गोपाळ बदने पंढरपुरात थांबला होता. त्याच्या मोबाईल फोनच्या लोकेशनवरून पोलिसांनी आता पंढरपुरातील लॉज आणि हॉटेल्सची झाडाझडती सुरु केली आहे, या काळात गोपाळ बदने कुणा-कुणाच्या संपर्कात होता.त्याला फरार होण्यात कुणी मदत केली याचा शोध पोलिसांनी सुरु केला आहे.

**बदने ढसाढसा रडला..**

**सरेंडर झाल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत पीएसआय बदने याने तोंड उघडले. तो तपास अधिकाऱ्यांसमोर ढसाढसा रडल्याची माहिती आहे. त्याने आपण महिला डॉक्टरवर कसल्याही प्रकारे अत्याचार केला नाही, असे पोलिसांना सांगितले आहे. शिवाय त्याने इतरही काही गोष्टी पोलिसांना सांगितल्या. पण संबंधित डॉक्टरसोबत त्याचे काही संबंध होते का? किंवा दोघांच्या संमतीने लैंगिक संबंध ठेवण्यात आले होते का? याबाबत जेव्हा त्याच्याकडे चौकशी करण्यात आली. त्याबाबत बदनेने मौन बाळगल्याचे समजते.**

दै. महासत्ता, इचलकरंजी.
सोमवार, ता. २७ ऑक्टोबर २०२५

## पिकअप व दुचाकी अपघातात युवकाचा मृत्यू

मिरज,ता.२६ (प्रतिनिधी) –

**सुभाषनगर रोडवरील रत्नागिरी नागपूर महामार्गाच्या ब्रिज खाली कोंबड्या भरून जाणाऱ्या पिकअप व दुचाकी वाहनाची झालेल्या अपघात एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला. जखमीवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे. इर्शाद रियाज मगदूम (वय ३२ रा. मुजावर गल्ली) असे मृताचे नाव आहे.**

टाकळीकडून सुभाषनगरकडे जाणाऱ्या रत्नागिरी नागपूर महामार्गाच्या सर्व्हिस रोडवरील ब्रिजवळ झालेल्या अपघातात मिरजेतील इर्शाद रियाज मगदूम (वय ३२ रा. मुजावर गल्ली) याचा जागीच मृत्यू झाला. मोटार सायकल च्या मागे बसलेला आयराप शोकत देसाई (रा.मुजावर गल्ली) हा जखमी झाला .

## मेट्रो हायटेक को.ऑप. टेक्स्टाईल पार्क लिमिटेड, इचलकरंजी.

कागल,हातकणंगले फाईव्ह स्टार एमआयडीसी मधील टेक्स्टाईल युनिटमध्ये खालीलप्रमाणे जागा त्वरीत भरावयाचे आहेत.

### अकौंटंट पाहिजे

| अ.नं | शैक्षणिक पात्रता | जागा |
|---|---|---|
| १ | **वाणिज्य शाखेचा पदवीधर** इन्कम टॅक्स/जीएसटी/टिडीएस रिटर्न इ. माहिती असणे आवश्यक आहे. संगणकाचे ज्ञान व मराठी व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक आहे. तसेच अकौंटींग Tally Prime Silver Version5 Data येणे आवश्यक आहे. | २ |
| २ | **चार चाकी वाहनाकरीता अनुभवी ड्रायव्हर पाहिजे** | १ |

तरी इच्छुक उमेदवारांनी बायोडाटा व अर्जासह खालील नंबरावर संपर्क साधावा किंवा ई–मेल करावा. **metrohtpl@yahoo.co.in**

* संपर्क *

मो.नं. : रोहित मोळे – **8496896396** (कागल एमआयडीसी)

मो.नं. : महेश गंथडे – **8390701857** (इचलकरंजी ऑफिस)

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



**मा. श्री. सुनिल सातगोंडा पाटील**

सन्मती सहकारी बँकेचे संस्थापक चेअरमन व सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा क्षेत्रातील मार्गदर्शक, आमचे परममित्र श्री. सुनिल सातगोंडा पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- प्रकाश मोरे
- अमृतमामा भोसले
- राजू बोंद्रे
- नितेश उर्फ गोट्याभाऊ पोवार

इचलकरंजी.

## जीवेत शरदः शतम्!





श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे

आमचे जिवलग मित्र मा. श्री. सुनिल सातगोंडा पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

मा. श्री. सुनिल सातगोंडा पाटील

**विठ्ठल पुंडलिक चोपडे**
**माऊली प्रतिष्ठान, इचलकरंजी.**

## जन्मदिनाच्या शिवमय भगव्या शुभेच्छा...!



# मोहन (दादा)

**मा. श्री. मोहन पां. मालवणकर (दादा)**

शिवसेना कोल्हापूर जिल्हा संघटक

अ. शासकीय सदस्य मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना इचलकरंजी, विधानसभा.

* शुभेच्छुक *

संतोष मुरदंडे (दादा) अनंत रुगे, मनोज ठोके, राजेश मालवणकर, संग्राम जाधव, चंद्रकांत कोष्टी, आनंदा खोद्रे, सचिन सौंदलगे. उमाकांत रुगे, प्रथमेश लाटणे.

**टिप : सायंकाळी ७.०० नंतर मोहनदादा मालवणकर जनसंपर्क कार्यालय मंगळवार पेठ, येथे शुभेच्छा स्विकारतील.**

## जीवेत् शरदः शतम् !



| धडाडीचे आमदार | अभ्यासू नेतृत्व | आशिर्वाद | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| आमदार राहूल प्रकाशराव आवाडे | मा.श्री.स्वप्निल प्रकाशराव आवाडे<br>चेअरमन, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह. बँक | मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा) | मा. श्री. प्रकाशराव आवाडे (आण्णा) |



आमचे मार्गदर्शक, सन्मती सहकारी बँकेचे चेअरमन, माजी नगरसेवक, पक्षप्रतोद,
डीकेटीई संस्थेचे विश्वस्त, श्री वर्धमान पतसंस्था व श्री बालाजी पतसंस्थेचे संचालक,
कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर साखर कारखान्याचे संचालक,
बाहुबली विद्यापीठ संचलित सन्मती विद्यालय तारदाळचे चेअरमन,
पॉवरलूम डेव्हलपमेंट अँण्ड एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलचे माजी चेअरमन व संचालक,
दि इचलकरंजी को–ऑप इंडस्ट्रियल इस्टेटचे संचालक,
विविध सामाजिक, बँकींग, क्रिडा, शैक्षणिक कार्यातील हसतमुख व्यक्तीमत्व

**मा. श्री. सुनिल सातगोंडा पाटील (दादा)**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



मा. श्री. सुनिल सातगोंडा पाटील (दादा)

| किंग्स रिडस् | तुळजाई टेक्स्टाईल्स | विजया कॅटरर्स | क्रिस्टल लिनन स्टोअर्स | मुकुंद ओझा | चौगुले स्वीट मार्ट |
|---|---|---|---|---|---|
| प्रो. मुद्दसर पाटील | बापू बोराडे | प्रो. शितल भरते | प्रो. हरीहर व गजानन होगाडे | आर्किटेक्चर | |

■ संपादकीय ■

# भ्रष्टाचाराचा भस्मासूर

नोकरशाहीतील भ्रष्टाचार संपण्याचे स्वप्न पाहणे सोडूनच दिलेले बरे. हा भ्रष्टाचार संपणारच नाही, निदान काही प्रमाणात नियंत्रित तरी होऊ शकेल याचीही आता हमी देता येत नाही. दर दोन-पाच दिवसांनी भ्रष्टाचाराचे एखादे गंभीर प्रकरण धक्कादायक पद्धतीने समोर येते. त्यातील छाप्यात मिळालेली रोकड आणि अन्य सामग्री पाहिली की डोळे पांढरे होण्याची वेळ येते. गेल्याच आठवड्यात अशाच दोन केसेस उघड झाल्या. यातील एक पंजाबमधील तर एक आसामच्या गुवाहाटीतील आहे. पंजाबमध्ये पोलीस महानिरीक्षकाचा प्रताप समोर आला आहे. भंगार व्यावसायिकाकडून यांनी आठ लाख रुपये लाच मागितली होती. बरे ती एकदाच मागितली नव्हती, तर दरमहा ही रक्कम हप्ता म्हणून ठरवली गेली होती. त्यात भुल्लर नावाचे हे महाशय गोत्यात आले. त्यांच्यासाठी वसुली करणाऱ्यालाही अटक करण्यात आली. साडेसात कोटी रोकड, स्थावर मालमत्तांचे ५० पेक्षा जास्त दस्तावेज, अनेक पॉश गाड्या आदी अगदी सुरुवातीच्या टप्प्यात उघड झाले आहे. अजून अंतर्गत तपासणी, बँक लॉकर वगैरे पाहणी व्हायची होती. विशेष म्हणजे भुल्लर महाशय राज्याचे माजी महासंचालक यांचे पुत्र आहेत. त्यामुळे ते खानदानी रईस आहेत. यात आता त्यांची भ्रष्टाचाराची संपत्ती किती आणि वडिलोपार्जित मिळालेली संपत्ती किती हा घोळ पुढे होईलच. आपल्याला कायद्याकडून न्याय मिळेल असा ठाम विश्वास महानिरीक्षकांनी व्यक्त केल्याची बातमी आहे. ज्या प्रकारे त्यांची वसुली सुरू होती त्यावरून त्यांना रोखणारे कोणीच नव्हते हे उघड आहे. त्यांना स्वत:ला कशाचे भय नव्हते. 'आपणच कोतवाल असल्यावर भीती कोणाची' असला हा मामला. 'काय झाडी, काय डोंगर' या महाराष्ट्रातील सत्तांतर नाट्यातील गाजलेल्या गीतामुळे प्रसिद्धीस आलेल्या गुवाहाटीतही रस्ते बांधणी विभागातील अधिकाऱ्याने जमवलेली माया अशीच डोळे फिरवणारी. त्यांचे तीन-चार राज्यांत फ्लॅट अथवा घरे आहेत आणि दिल्ली परिसरातही ९ सदनिका असल्याची माहिती समोर आली. त्यांनीही बांधकामाच्या संदर्भात प्रमाणपत्रे देताना लाचेची मागणी केल्याचे बातम्यांमध्ये म्हटले आहे. जर अशा मागण्या करून आणि त्याद्वारे स्वत: लाभार्थी होऊन बांधकाम पूर्णत्वाची अथवा गुणवत्तेची प्रमाणपत्रे दिली जात असतील, तर बांधकाम सुरू असतानाच किंवा बांधकाम पूर्ण झाल्याच्या काही महिन्यांनी पूल कोसळत असतील तर त्यात आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. लोकांचे जीव गेले तरी आपले घर भरले पाहिजे ही पैशाची हाव याच्या मुळाशी आहे. बहुतेक राज्यात गेल्या वर्षभरात बांधकाम पूर्ण झालेले आणि काही बांधकाम सुरू असलेले पूल कोसळले आहेत. त्याच्या बातम्या वर्षभर आपण पाहिल्या आहेत. त्यात काही शेकडो लोकांचे बळी गेले आहेत. त्यात पुढे केवळ त्या ठिकाणचे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कलगीतुरा रंगल्याचेच तेवढे दिसले. नंतर काय झाले हे सगळे पडद्यामागेच राहिले. अगदी दिवाळीच्या तोंडावर विषारी कफ सिरप पिल्याने २५ चिमुरड्यांचा मृत्यू झाला. गेलेली सर्व मुले सहा वर्षांच्या आतील होती. त्यांच्या पालकांचे दु:ख ज्यांच्या भ्रष्टाचारामुळे हा प्रकार घडला ते कधीच समजू शकणार नाहीत. त्यांच्या डोळ्यावर भ्रष्टाचाराचा पडदा पडलेला आहे. केवळ बाबू अर्थात सरकारी कर्मचारीच भ्रष्टाचार करतात असे नाही तर राजकारण्यांपासूनच ते झिरपत खाली आहे. एकमेका सहाय्य करू या न्यायाने सगळी यंत्रणा चालते आणि त्यांनी ती पूर्ण पोखरून टाकली आहे. भ्रष्टाचार ही अत्यंत गंभीर समस्या असल्याचे आपण कित्येक दशकापासून ऐकतो आहोत. या विरोधात आमच्या सरकारचे धोरण शून्य सहिष्णुतेचे असल्याचे सत्ताधारीही सवयीने म्हणत असतात.'गरिबी दूर करू' या नाऱ्यासारखाच भ्रष्टाचाराचाही नारा अंगवळणी पडला आहे. पूर्वी परवाना पद्धत होती. नियमातून पळवाट काढून देण्यासाठी किंवा नसलेले काम नियमात बसवण्यासाठी भ्रष्टाचार व्हायचा असे म्हणतात.नियम जटील असल्यावरसुद्धा भ्रष्टाचाराला आमंत्रण मिळते असे म्हणतात. तथापि,आता नियमात असलेले काम मंजूर होण्यासाठीही पैसा द्यावा लागतो हे कारवाईनंतरच्या अनेक प्रकरणांची माहिती घेतल्यावर समोर आले आहे. नोकरशाहीकडे असलेले अधिकार,त्यांचा अपारदर्शकपणा, विवेकशून्यता आणि संवेदनहीनता ही भ्रष्टाचाराची मुळे आहेत. याची झळ ज्या पीडिताला बसते त्याची इतकी दमछाक झालेली असते की तो तक्रार करायलाच धजावत नाही. बरे त्याने तक्रार केलीच तर पुढे पळवाटा आणि चोरवाटाही अनेक असल्यामुळे कायद्यावर विश्वास असून कायदा आपल्याला न्याय देईल असे निर्लज्जपणे दोषी व्यक्तींकडूनच ऐकवले जाते. भ्रष्टाचार हा केवळ राजकीय अथवा प्रशासकीय क्षेत्रापुरता मर्यादित नाही. तो सर्वत्र पसरला आहे आणि खासगी क्षेत्रातही त्याचा शिरकाव झाला आहे. भ्रष्टाचार देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला बाधक आणि मारक ठरतो.

# शक्तीपीठ मार्गाचे आव्हान

**शक्तीपीठ प्रकल्प हा धार्मिक पर्यटन आणि राज्यातील संपर्क सुविधा वाढविणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. नागपूर ते गोवा हा मार्ग अनेक जिल्ह्यांमधून जाणार असल्याने पर्यटन, व्यापारी देवाण-घेवाण आणि स्थानिक रोजगारनिर्मितीसाठी तो लाभदायी ठरेल मात्र धाराशिवमध्ये काही ठिकाणी स्थानिक पातळीवर विरोध झाल्याने त्याचा आदर ठेवत सरकारने मार्गात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.**

सरकार कोणावरही अन्याय करणार नाही. शक्तीपीठ मार्गाचे नवे सरेखन सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांमधून नेण्यात येईल ज्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचा शक्तीपीठाशी थेट संपर्क प्रस्थापित होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नागपूर ते गोवा या प्रस्तावित शक्तीपीठ मार्गाबाबत निर्माण झालेला वाद आणि विरोध लक्षात घेता राज्य शासनाने या मार्गाचे सरेखन (अलाइनमेंट) बदलण्याचा निर्णय घेतला आहे. शक्तीपीठाला स्थानिक जनतेचा विरोध कमी तर राजकीय नेत्यांचा विरोध अधिक आहे त्यामुळे राज्य सरकारने नागपूर ते गोवा शक्तीपीठ मार्गाचे संरेखन बदलण्याचा निर्णय घेतला असून नवा मार्ग सोलापूर आणि सांगलीतून जाणार आहे. चंदगड येथे एका आमदाराच्या नेतृत्वाखाली सुमारे ५०० शेतकऱ्यांनी मोर्चा काढून मार्ग त्यांच्या भागातून नेण्याची मागणी केली होती. त्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री म्हणाले, शेतकऱ्यांचा हा उत्साह पाहून आम्ही त्या दिशेने मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला आहे. सरकार विकास कामांबाबत लोकांची मते ऐकते आणि योग्य ती सुधारणा करते. प्रकल्पाला सुरुवातीला विरोध होणे ही नवीन गोष्ट नाही.

शक्तीपीठ मार्गाच्या नव्या आराखड्यामुळे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या तिन्ही भागांमधील संपर्क अधिक सुकर होईल. या मार्गावरील धार्मिक स्थळे, पर्यटन केंद्रे आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडले जातील. महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा शक्तीपीठ महामार्ग आता एक पाऊल पुढे सरकला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही गावांनी सुरुवातीला विरोध केला होता मात्र आता हा विरोध मावळला



आहे. या महामार्गाला सिंधुदुर्ग जिल्ह्यात विशेषत: बांदा येथील भाजपच्याच कार्यकर्त्यांनी मोठा विरोध केला होता. महसूलमंत्री बावनकुळे यांनी आंबोली परिसराचा दौरा केला आणि स्थानिकांशी संवाद साधला त्यानंतर होणारा विरोध मावळला. महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देणारा हा महत्त्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग राज्यातील १२ जिल्ह्यांतील ३९ तालुके आणि ३७० गावांमधून जाणार आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्यातील पवनार ते गोवा पत्रादेवीपर्यंतचा १८ तासांचा प्रवास आता केवळ ८ तासांत पूर्ण होण्याचा दावा सरकारने केला आहे.

या महामार्गामुळे धार्मिक पर्यटनालाही चालना मिळणार आहे. कारण हा महामार्ग तुळजापूर, कोल्हापूर आणि माहूर यासारख्या १८ प्रमुख धार्मिक स्थळांना जोडणार आहे. शक्तीपीठ महामार्गासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ३८ कि. मी. लांबीच्या आणि १०० मीटर रुंदीच्या जमिनीचे संपादन करण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ३८० हेक्टर जमिनीची आवश्यकता असून भूमी अभिलेख विभागाने मोजणी प्रक्रिया सुरू केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हा महामार्ग सावंतवाडी तालुक्यातील गेळे, आंबोली, वेर्ले, पारपोळी, नेणे, फणसवडे, उडेली, धारपी, तांबोळी, असनिये, डेगवे, बांदा आणि दोडामार्ग तालुक्यातील फुकेरी गावांमधून जाणार आहे. शक्तीपीठ महामार्गाचे काम गतिमान झाले असले तरी प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाबाबत काही नवीन मुद्दे समोर आले आहेत. आंबोली व

दैनंदिनी

गेळे गावांमधील कबुलायतदार गावकर जमीन क्षेत्रातील काही जमिनीचे संपादन होणार आहे. या संपादित जमिनीचा मोबदला कोणाला मिळणार हा विषय महत्त्वाचा आहे. या जमिनी शासन व वन विभागाच्या नावावर असल्या तरी त्यांच्यावर स्थानिक लोकांचा पिढीजात मालकी हक्क आहे त्यामुळे या जमिनींच्या भूसंपादनानंतर लोकांना योग्य नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी गावकरी करत आहेत. या महामार्गामुळे थेट गोव्याला फायदा होईल, असे बोलले जात असताना आ. दीपक केसरकर यांनी एक वेगळाच प्रस्ताव मांडला आहे. हा महामार्ग थेट गोवा राज्यातील बंदराला न जोडता तो रेडी बंदरला जोडण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे कोकणाला अधिक फायदा होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. सुरुवातीला या महामार्गात कोल्हापूर जिल्ह्याचा समावेश होता पण तेथील विरोधामुळे जिल्ह्याला या प्रकल्पाच्या भूसंपादनातून वगळण्यात आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हा महामार्ग दऱ्याखोऱ्यातून जात असल्याने त्याचा बराचसा भाग भुयारी मार्गातून असेल असे बोलले जात आहे त्यामुळे या नैसर्गिक परिसराला कमीत कमी कशी हानी होईल ते पाहिले जात आहे. बांदा बाजारपेठेतील नुकसान टाळण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावर मळगाव येथे भुयारी मार्ग काढून तो रेडी बंदर आणि रेडी रेक्स सागरी महामार्गाला जोडल्यास कोकणाला अधिक लाभ मिळेल, असे आ. केसरकर यांनी म्हटले आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा,अशी जनतेची इच्छा आहे.

# अल्पभूधारक शेतकरी,शेतमजुरांचा चिंताजनक संघर्ष



**महाराष्ट्र ही भूमी निसर्गाने अपार वैविध्याने समृद्ध केलेली आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा, कोकणचा समुद्रकिनारा, विदर्भाचा काळा मातीचा पट्टा आणि मराठवाड्याची शुष्क मैदाने यांमुळे या राज्याची कृषीसंस्कृती वेगळ्या छटा घेऊन समोर आली आहे. शतकानुशतके लोक शेतीवर अवलंबून राहिले, शेतकऱ्यांच्या घामाच्या थेंबांतून अन्नाची श्रीमंती निर्माण झाली, परंतु गेल्या काही दशकांत हवामानातील बदल, अनियमित पाऊस, दुष्काळ आणि आता अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तींचा जो खेळ सुरू झाला आहे, त्याने कृषिप्रधान समाजाचे मूळच हादरवून टाकले आहे.**

गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये झालेल्या सततच्या आणि अनियमित अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झाले, घरे उद्ध्वस्त झाली, जनावरे वाहून गेली, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर वर्गाच्या जगण्यावर गंभीर परिणाम झाला. हे संकट केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक स्तरावरही विनाशाची लाट निर्माण करते.भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, मागील दोन वर्षात महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये. हवामान बदलाच्या जागतिक प्रवृत्तीमुळे पावसाचे स्वरूप अधिक अस्थिर झाले असून काही दिवसांत महिनाभराचा पाऊस पडतो, तर नंतरचा काळ कोरडा जातो.या असंतुलनाचा सर्वात मोठा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसतो, कारण त्यांच्याकडे साठवण, पिकवण आणि जोखमीशी सामना करण्याची क्षमता मर्यादित असते,तर शेतमजूर वर्ग तर अधिक बिकट परिस्थितीत असतो, कारण त्यांची जमिन स्वतःची नसते, त्यामुळे पिक नष्ट झाल्यावर उत्पन्न आणि काम दोन्ही संपते.

महाराष्ट्रातील सुमारे ७५ टक्के शेतकरी अल्पभूधारक असण्याची शक्यता असून त्यांची संपूर्ण अर्थव्यवस्था पावसावर अवलंबून असते.ग्रामीण अर्थव्यवस्थेत अल्पभूधारक शेतकरी हा 'उत्पादनाचा कणा' आहे, तर शेतमजूर हा 'कामगाराचा आत्मा', आणि या दोघांशिवाय ग्रामीण समाजाचे चक्र टिकत नाही. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे नुकसान म्हणजे शेतमजुरांची बेरोजगारी, आणि शेतमजुरांची बेरोजगारी म्हणजे गावातील खरेदी-विक्रीचे थांबणे, परिणामी संपूर्ण ग्रामीण बाजारपेठ ठप्प होते.अतिवृष्टीमुळे शेतकरी कुटुंबातील कामाचे वाटप, निर्णयप्रक्रिया, स्त्री-पुरुष भूमिकांचे संतुलन आणि सामाजिक संबंध बदलतात. महिलांवर दुहेरी ताण येतो; एकीकडे घर सांभाळायचे, मुलांचे शिक्षण, आजारपण सांभाळायचे,तर दुसरीकडे शेतातील संकटात मजुरी करून जीविकोपार्जन करायचे. अनेक ठिकाणी स्वयंसेवी संस्थां उभ्या राहून आर्थिक आधार निर्माण करत आहेत, परंतु प्रयत्न अपुरे आहेत. तसेच,अतिवृष्टीग्रस्त भागांत स्थलांतर वाढते आहे, अनेक शेतकरी आणि शेतमजूर आपली गावं सोडून शहरांकडे मजुरीसाठी निघाले आहेत. स्थलांतरामुळे ग्रामीण सामाजिक संरचना कमकुवत होते, गावांतील सामाजिक एकोपा,परंपरा आणि लोकजीवनाचे सांस्कृतिक स्वरूप ढासळत आहे. अतिवृष्टी आणि त्यानंतरची आर्थिक हानी शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम करते.राज्यातील आत्महत्येचे प्रमाण वाढण्यामागे हवामानाशी संबंधित संकट एक महत्त्वाचे कारण आहे. जेव्हा शेतकरी पिकावर घेतलेले कर्ज फेडू शकत नाही, तेव्हा त्याला समाजातील अपमान, आर्थिक ताण आणि नैराश्य यांचा सामना करावा लागतो. शेतमजूर वर्ग मात्र सतत 'आजचे जेवण, उद्याचे काम'या संघर्षात अडकलेला राहतो. राज्य शासनाने

## निसर्गाच्या असंतुलनाचा जीवनमानावर मोठा परिणाम

नुकसानभरपाई, पीकविमा योजना, आणि पुनर्वसन यांसारखे उपाय केले असले तरी अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत यांचा लाभ पूर्णपणे पोहोचत नाही, कारण शासकीय आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांत मोठी तफावत दिसते. समाजशास्त्रीय विश्लेषण सांगते की, सामाजिक न्यायाचा अर्थ फक्त आर्थिक मदतीत नाही, तर शेतकऱ्यांच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारात आहे. अल्पभूधारक आणि शेतमजूर या वर्गांना 'साहाय्य घेणारे' नव्हे, तर 'निर्मिती करणारे' घटक म्हणून ओळखले पाहिजे.ग्रामीण विकासाच्या धोरणांत त्यांच्या सामाजिक अस्तित्वाचा आदर राखून निर्णय घ्यायला हवेत. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये झालेल्या अतिवृष्टीने हा पाया धूसर झाला आहे; पिकांचे संपूर्ण नुकसान, जमिनीच्या सुपीक थराचा क्षय, घरांची हानी आणि उत्पन्नात घट या घटनांनी ग्रामीण समाजावर गंभीर धक्का दिला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे दोन ते तीन हेक्टर शेतीक्षेत्र असते आणि या क्षेत्रावर झालेल्या पावसामुळे मका, सोयाबीन, भात, कापूस, ऊस यासारख्या पिकांचे नुकसान झाले. शेतकरी पीकविमा, कर्जफेडीची योजना आणि सरकारी मदतीवर अवलंबून असतो; तथापि, योजनांचा कार्यान्वयन विलंबाने किंवा अपूर्ण पद्धतीने होत असल्यामुळे त्याला कर्जाचा फटका, साठवणुकीच्या खर्चात वाढ,आणि उत्पन्नातील घट यांचा सामना करावा लागतो.शेतमजूर वर्गाचे उत्पन्न पूर्णपणे पिकावर अवलंबून असल्याने पिके नष्ट झाल्यानंतर रोजंदारी थांबते, परिणामी घरगुती अन्नसुरक्षा धोक्यात येते. आर्थिक संकट, मानसिक ताण,कुटुंबातील मतभेद, सामाजिक प्रतिष्ठेवरील परिणाम हे सर्व एकत्रितपणे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर संक्रामक परिणाम करतात. बेरोजगारी, स्थलांतर, मुलांचे अर्धवट शिक्षण, आरोग्याची अपुरी काळजी, महिला शेतमजूरांवरील दुहेरी ताण या सर्वांनी ग्रामीण सामाजिक रचना ढासळवली आहे. पूर्वी गावोगावी संकटाच्या वेळी लोक एकत्र येत,आपले संसाधने, श्रम आणि अनुभव वाटायचे,परंतु आता प्रत्येक कुटुंब स्वतःच्या अस्तित्वासाठी इतके गुरफटले आहे की, सामूहिक प्रयत्न कमी झाले आहेत तरीही काही सकारात्मक बदल दिसतात, जसे की महिला बचत गट, युवा मंडळे,स्वयंसेवी संस्था या माध्यमातून सामाजिक एकत्रिकरण टिकवले जाते.

अतिवृष्टीग्रस्त अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजूर यांचा अनुभव हे दाखवतो की, नैसर्गिक आपत्ती फक्त आर्थिक संकट निर्माण करत नाही, तर मानसिक आरोग्य, सामाजिक संरचना, कौटुंबिक जीवन, जीवनमूल्ये आणि भविष्यातील जीवनशैली यावर खोलवर परिणाम करतात. आर्थिक मदत, मानसिक आधार, सामाजिक सहकार्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि सामाजिक न्याय या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करूनच ग्रामीण समाज पुन्हा सशक्त, टिकाऊ आणि निसर्गाशी सुसंवाद राखणारा बनू शकतो. अतिवृष्टीग्रस्त अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजूर यांचा संघर्ष केवळ आर्थिक नाही, तर तो जीवनाच्या प्रत्येक स्तराशी निगडीत आहे. ■ **डॉ.राजेंद्र बगाटे**

## वाचकांचा पत्रव्यवहार

### महामार्गादरम्यान सोयी-सुविधा निर्माण करणे आवश्यक

नुकत्याच पार पडलेल्या दिवाळी सण साजरा करण्यासाठी राज्यातील शहरवासी आणि ग्रामवासी आपापल्या गांवी तसेच पर्यटनासाठी बाहेर पडलेल्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. सरकारांकडून लांबच लांब महामार्ग बांधले जात आहेत. ते देखील अपुरे पडल्याची जाणीव यानिमित्ताने प्रवास करणारे प्रवासी आणि प्रशासकीय अधिकारी यांना झाली असावी. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मुंबई-पुणे जुना महामार्ग, लोणावळा, खेड शिवापूर, सोलापूर, कोल्हापूर, पुणे नाशिक मार्ग या शहरात आणि शहरातून बाहेर निघण्यासाठी वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. वाहनांच्या हॉर्न्सचे आवाज आणि प्रत्येक वाहन चालकांची आपले वाहन पुढे नेण्याची स्पर्धा यामुळे प्रवासी आणि वाहनचालक यांमध्ये अस्वस्थता जाणवून येत होती. तेव्हा असे दिसून आले की वाहनांचा सुकाळ हा सोयीचा नसून गैरसोयीत भर पाडणारा देखील असतो.ज्या प्रवासाला नेहमीच्या वेळेत साधारणपणे दहा बारा तास लागत असत त्याच मार्गाच्या प्रवासाला आता पंधरा ते अठरा तास लागत होते. महामार्गांच्या दुतर्फा ना पिण्याच्या पाण्याची सोय ना शौचालयांची सोय. टोल नाक्यांवरसुद्धा हीच परिस्थिती. त्यात फास्ट टॅगच्या/स्कॅनिंगच्या अडचणी. कुठे रस्त्याच्या कामांमुळे रस्ता बंदची नामुष्की, तर कुठे एकाच लेनने दुतर्फा वाहतूक करण्याचा त्रास. पण दिवाळी, होळी असे सण नोकरदारांना आपल्या मूळ गावी, नोकरीच्या ठिकाणी जाणे भागच पाडते त्यामुळे तो प्रवास टाळता येत नाही मात्र दिरंगाई होतेच. प्रवास राज्यांतर्गत असो किंवा आंतरराज्य प्रवास असो, प्रवासादरम्यान अधिक सोयी निर्माण करण्याची आत्यंतिक गरज असल्याची जाणीव असल्याचे स्पष्टपणे लक्षात येते. प्रशासकांनी त्या अडचणी शक्यतो लवकरात लवकर दूर कराव्यात, अशा अपेक्षा प्रवासी करत आहेत.

■ **स्नेहा राज**

## जीवघेणे संशयाचे भूत

वृत्तपत्रात एकाच दिवशी मन सुन्न करणाऱ्या दोन घटना वाचनात आल्या. एक घटना मुंबईतील काळाचौकी परिसरात घडलेली. सकाळी साडेनऊच्या सुमारास एका तरुणाने त्याचीच प्रेयसी असलेल्या तरुणीवर भररस्त्यात सपासप वार करून तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला आणि नंतर तोच सुरा स्वतःच्या गळ्यावर फिरवून स्वतःही आत्महत्या केली. तर दुसऱ्या एका घटनेत पिंपरी-चिंचवड शहरातील एका सामाजिक कार्यकर्त्याची त्याच्याच पत्नीने कापडाने गळा आवळून हत्या केली. या दोन्ही घटना समाजमनाला हादरवणाऱ्या होत्या. दोन्ही घटनेत हत्या झालेली व्यक्ती आणि हत्या करणारे दोघेही एकमेकांच्या अत्यंत जवळचे होते. मुंबईतील घटनेत जीव गेलेले प्रेमी युगुल होते ज्यांचा नुकताच ब्रेकअप झाला होता, तर पिंपरी चिंचवडमधील दोघे एकमेकांचे पती-पत्नी होते. एकमेकांवर कधीकाळी जिवापाड प्रेम करणारे, एकमेकांसोबत आयुष्य काढण्याच्या आणाभाका घेणारे आणि सुखी संसाराची स्वप्ने पाहणारी ही जोडपी यांच्यामध्ये नक्की काय बिनसले की ज्यामधून जोडीदाराचा जीव घेण्याइतपत टोकाचे पाऊल उचलले गेले. अर्थात दोन्ही घटनांमध्ये एक सामायिक बाब होती ती म्हणजे संशय. मुंबईतील मनीषा यादव आणि सोनू बरई दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम होते; मात्र काही दिवसांपासून मनीषा इंस्टाग्रामवर दुसऱ्या एका तरुणाला फॉलो करू लागल्याने मनीषा आणि सोनू यांच्यात वाद होऊ लागले. आठवडाभराच्या वादानंतर दोघांनी ब्रेकअप केले; मात्र त्यानंतरही मनात राग ठेवून सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या सोनुने मनीषावर जीवघेणा हल्ला केला. सोनूच्या मनात संशयाचे विष चढल्याने त्याने हा टोकाचा निर्णय घेतला. पिंपरी चिंचवड येथील घटनेत सुद्धा संशय हाच या घटनेमागील मुख्य सूत्रधार होता. परिसरात सामाजिक कार्यकर्ता म्हणून ख्याती असलेल्या आनंद भोईरला पत्नी चैत्रालीच्या चारित्र्यावर संशय येऊ लागला ज्यामुळे पती पत्नीमध्ये वाद होऊ लागले. घटनेच्या दिवशीही पहाटे अडीच - पावणेतीनच्या सुमारास दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. ज्यामध्ये रागाच्या भरात चैत्राली हिने आनंद याच्या गळ्याभोवती कापड आवळून त्याची हत्या केली. दोन्ही घटनांत निर्माण झालेले संशय किती खरे आणि किती खोटे याचा शोध पोलीस घेतीलच. मात्र केवळ संशयाने तिघांचे नाहक जीव मात्र गेले.

■ **जगन घाणेकर**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**सोमवार,ता.२७.१०.२०२५** विक्रम संवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सरे दक्षिणायणे, शरद ऋतो, कार्तिक मासे, शुक्ल पक्षे, षष्ठी तिथी, अहोरात्र, मूळ नक्षत्र, १३.२८ नंतर पूर्वाषाढा नक्षत्र, धनुरास, अतिगंड योग, ७.२७ नंतर सुकर्मा योग, कौलव करण, १९.०६ नंतर तैतिल करण, दिनमान ११.३०, सुर्योदय ६.३२, सुर्यास्त १८.०२ (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी ७.३० ते ९, घबाड षष्ठी, षष्ठीची वृद्धि, घबाड १३.२८ नंतर मंगळ वृश्चिक राशीत १५.४४ वाजता.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-पैश्याची कमतरता आज घरात कलहाचे कारण बनू शकते अश्या स्थितीमध्ये आपल्या घरातील लोकांसोबत विचारपूर्वक बोला आणि त्यांचा सल्ला घ्या.

**वृषभ**-आज तुम्ही केलेले शारिरीक बदल यामुळे तुमचे व्यक्तीमत्व निश्चितपणे खुलून दिसेल.अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. तुम्ही आज आनंदात रहाल.

**मिथून**-तुमचा आनंदी उत्साही स्वभाव इतरांना आनंद देणारा असेल. हुशारीने गुंतवणूक करा. तुमच्या जवळचे कुणीतरी अंदाज करता येणार नाही अशा मूडमध्ये असेल.

**कर्क**-आरोग्य चांगले राहील. पैसे मिळविण्याच्या नव्या संधी लाभदायक असतील. दिवसाच्या उत्तरार्धासाठी उल्हासित करणाऱ्या आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाची व्यवस्था करा.

**सिंह**-शारीरिक सुदृढतेसाठी विशेषत: मानसिकदृष्ट्या कणखर बनण्यासाठी ध्यानधारणा आणि योगासने करा. शंकास्पद आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या.

**कन्या**-तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती. आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**तुळ**-आपल्या मुलांच्या कामाचा तुम्हाला अपरिमित आनंद होईल. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टीमध्ये खूप पैसा खर्च करू शकता परंतु, तुमचा आर्थिक पक्ष आज मजबूत राहील.

**वृश्चिक**-तुमच्या जवळच्या व्यक्ती तुमच्या खाजगी आयुष्यात अडचणी निर्माण करतील. प्रेम हे वसंत ऋतूसारखे असते. आज अचानक अडचणींचा सामना करावा लागेल.

**धनु**- कार्यालयात असलेल्या तणावांमुळे तुम्ही किंचित चिडचिडे बनाल. काहीजणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल, तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल.

**मकर**- व्यवसाय-धंद्यात उधार मागण्यासाठी आलेल्या लोकांकडे निव्वळ दुर्लक्ष करा. मित्र आणि अनोळखी यांच्यातील फरक ओळखण्याची सावधानता बाळगा.

**कुंभ**- घरातील गरजांना पाहून आज तुम्ही आपल्या जीवनसाथी सोबत काही किंमती वस्तू खरेदी करू शकता ज्यामुळे आर्थिक परिस्थिती थोडी बेताची होऊ शकते.

**मीन**-आज तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल. सर्वसाधारणपणे लाभदायक दिवस आहे.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# जिल्हा बँक अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार

## इच्छुकांच्या नावांमध्ये वाढ; जारकीहोळी बंधूंची भूमिका निर्णायक ठरणार

बेळगाव,ता.२६(प्रतिनिधी)-

**बेळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या (बीडीसीसी) निवडणुकीत जारकीहोळी बंधूंनी अखेर सत्ता काबीज केली आहे.बँकेच्या १६ पैकी तब्बल १२ जागा जारकीहोळी बंधूंच्या पॅनेलकडे आहेत. मात्र, अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार, याबाबत जिल्ह्यात उत्सुकता निर्माण झाली आहे. इच्छुकांची नावे वाढत असल्याने त्यातून मार्ग काढण्याची कसरत जारकीहोळी बंधूंना करावी लागणार आहे.**

जिल्ह्याच्या राजकारणाला महत्वाची कलाटणी जिल्हा बँकेच्या माध्यमातून मिळते.परिणामी, जारकीहोळी बंधूंनी बँकेची निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. भाजप, काँग्रेसमध्ये कार्यरत असणाऱ्यांना एकत्र करुन निवडणूक लढविली.त्यांना अपेक्षित यशही मिळाले.जारकीहोळी कुटुंबातील दोघांना संचालकपदाची संधीही मिळाली. बँकेच्या निवडणुकीतून कुटुंबाची दुसरी फळी राजकारणात सक्रिय झाली आहे. निवडणुका पार पडल्यानंतर आता अध्यक्षपदाचा मुद्दा कळीचा बनला



आहे.निवडणूक प्रचारकाळात जारकीहोळी बंधूंनी सातत्याने अध्यक्षपदाचा मान हा लिंगायत समाजातील संचालकांना देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. परिणामी, लिंगायत समाजातील संचालकांची अध्यक्षपदी वर्णी लागणार हे जवळपास निश्चित आहे. सध्या लिंगायत समाजातील माजी खास.अण्णासाहेब जोल्ले, आम.गणेश हुक्केरी, विरुपाक्ष मामनी, आम.चन्नराज हट्टीहोळी यांची नावे अध्यक्षपदासाठी चर्चेत

**उपाध्यक्षपद कुणाला मिळणार याचीच चर्चा**

जिल्हा बँकेचे अध्यक्षपद लिंगायत समाजातील संचालकांनाच देण्यात येईल, अशी भूमिका जारकीहोळी बंधूंनी सातत्याने मांडली आहे. त्यामुळे, अध्यक्षपद लिंगायत संचालकाला मिळणार, हे निश्चित आहे. परंतु, उपाध्यक्षपद कुणाला मिळणार, याबाबत चर्चा रंगली आहे. अध्यक्षपद चिकोडी विभागाला,तर उपाध्यक्षपद बेळगाव विभागाला देण्याची प्राथमिक चर्चा झाल्याचा दावा करण्यात येत आहे.यातून सौंदत्तीचे आमदार विश्वास वैद्य यांचे नाव आघाडीवर आहे. त्याचबरोबर खानापूरचे माजी आमदार अरविंद पाटील यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे.

आहेत.यातून एकाची निवड करताना जारकीहोळी बंधूंना कसरत करावी लागणार आहे. सारेच नेते राजकारणात तोलामोलाचे असल्याने त्यातून अध्यक्षांची निवड करताना कसोटी लागणार आहे.बँकेत १६ संचालकपदासाठी निवडणुक झाली. त्यापैकी ९ जागा बिनविरोध जाहीर करण्यात आल्या. सात जागांसाठी रविवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. सायंकाळी निकाल जाहीर झाले. परंतु, काही सभासदांनी न्यायालयात धाव घेतल्याने चार जागांचे निकाल जाहीर झालेले नाहीत.याबाबत २८ रोजी न्यायालयात सुनावणी होणार आहे.काही दिवसांतच अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छुकांनी आतापासून मोर्चेबांधणी सुरू केली आहे.परंतु, अंतिम निर्णय जारकीहोळी बंधूंचा असेल.विरोधी पॅनेलमधील आमदार लक्ष्मण सवदी, माजी खासदार रमेश कत्ती यांचीही भूमिका महत्वाची ठरणार आहे. बँकेला १०६ वर्षांचा इतिहास आहे.१० लाखांहून अधिक शेतकरी,ग्राहक बँकेशी निगडित आहेत.उलाढाल ७ हजार कोटी इतकी आहे. यामुळे बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाला फार महत्व आहे. परिणामी इच्छुकांनी कंबर कसली आहे.

# बेनाडी-कुन्नूर रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

## सार्वजनिक बांधकाम खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष

कोगनोळी,ता.२६(प्रतिनिधी)-

**गेल्या सहा महिन्यांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे बेनाडी मल्लिकार्जुन नगर वसाहत ते आडी माळ परिसरातील रस्त्याची अक्षरश: चाळण झाली आहे. केवळ अर्धा किलोमीटर रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असल्यामुळे वाहनधारक हैराण झाले आहेत. या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष झाल्याने वाहनधारकांसह नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

सहा महिन्यांपूर्वी आडी माळ ते कुन्नूर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम झाले आहे. त्यापुढे आडीपर्यंत हा रस्ता होणार होता. पण सततच्या पावसाचे कारण सांगून रस्त्याचे काम थांबविण्यात आले आहे. आता पाऊस थांबून महिना झाला तरीही पुन्हा रस्त्याचे काम सुरु झालेले नाही. मध्यंतरी पडलेल्या पावसामुळे या रस्त्यावर चिखल होऊन वाहने घसरण्याच्या घटना घडल्या आहेत. सध्या चिखल कमी झाला



बेनाडी-कुन्नूर रस्त्यावर पडलेले खड्डे.

असून वाहनांच्या वर्दळीमुळे धुळीचे साम्राज्य पसरत आहे.

रस्त्यावर वाहतूक वाढली असून या आंतरराज्य मार्गावर कुन्नूर, मांगूर, यळगूड, हुपरी, रेंदाळ, रांगोळी, इचलकरंजी, पट्टणकोडोली, कोल्हापूर या भागातील दुचाकी व चारचाकी वाहनांची रोजच वाहतूक होते. परंतु खड्ड्यांच्या मालिकेमुळे दररोज अपघाताच्या घटना घडत आहेत.ग्रामीण भागात रस्त्याचे जाळे विणण्याचे शासनाचे धोरण असले तरीही नादुरुस्त रस्ते तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. आडी माळ क्रॉस ते आडी मल्लिकार्जुन डोंगरापर्यंत रस्त्यावर खड्ड्यांची मालिका निर्माण झाली आहे. त्यामुळे दिवसा व रात्री या रस्त्यावरुन ये-जा करणे धोक्याचे ठरत आहे. या रस्त्यावरील खड्डे मुजविण्याची मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. संबंधितांनी तात्काळ खड्डे मुजवून वाहनधारकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# कर्नाटकातील कारखान्यांनी दर जाहीर करूनच तोडणी करावी

## रमेश पाटील;आज साखर कारखाना,प्रांत व तहसीलदारांना निवेदन देणार

कारदगा,ता.२६(प्रतिनिधी)-

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी ३७५१रुपये दराची मागणी केली आहे. हीच आमची देखील मागणी आहे. आज शेतकरी संकटात आहे. शेतकरी जगला तरच देश वाचणार आहे. आपल्या न्याय हक्कासाठी शेतकऱ्यांनी संघटीत होणे गरजेचे आहे. कर्नाटकातील साखर कारखान्यांनी देखील ३७५१ रुपये दर जाहीर करुनच ऊसतोड करावी.**

यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना, जय किसान शेतकरी संघटना व कर्नाटक राज्य रयत संघटना कर्नाटकातील साखर कारखाना प्रशासन, तहसीलदार व प्रांताधिकारी यांना सोमवार ता.२७ रोजी निवेदन देणार असल्याचे प्रतिपादन जयकिसान शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रमेश पाटील यांनी केले.

ते भोज (ता.निपाणी) येथे



भोज येथील आयोजित जिल्हास्तरीय शेतकरी मेळाव्यात बोलताना जयकिसान शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रमेश पाटील व्यासपीठावर शिवगोंडा पाटील,राजू खिचडे व इतर प्रमुख मान्यवर.

जयकिसान शेतकरी संघटना, स्वाभिमानी व कर्नाटक राज्य रयत संघटना यांच्यावतीने आयोजित केलेला जिल्हास्तरीय शेतकरी मेळाव्यात बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवगोंडा पाटील हे होते. स्वागत शिवगोंडा पाटील यांनी केले. शेतकरी नेते राजू खिचडे म्हणाले, साखर कारखाने दर निश्चिती न करताच ऊसतोड करीत आहेत. याचे कारण शेतकरी संघटित नाही त्यामुळे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असा मूलमंत्र दिला आहे पण आपण शिकलो पण, संघटित आणि संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर उतरत नाही तोपर्यंत तुमच्या कोणत्याच मालाला योग्य भाव मिळणार नाही. त्यासाठी संघर्षासाठी शेतकरी तयार झाले पाहिजेत, असे सांगितले.

यावेळी तात्यासाहेब केस्ते, प्रमोद पाटील, बंटी पाटील, डॉ.सुदर्शन मुराबट्टे, शितल सोबान, अण्णासाहेब भोसले, दरीखान स्वामी, राजू कडोले, शिवगोंडा पाटील, पोपट गेबीसे, तात्यासाहेब बसन्नावर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी पंकज तिपणन्नावर, राहुल घाटगे, प्रतीक पाटील, प्रकाश तारदाळे, सतीश पोमाई, रमेश मालगावे, सुभाष चौगुले, शितल बागे, धन्यकुमार चौगुले, विद्याधर नेजे, जितेंद्र टाकळे, मनोज कोणापन्नावर, बाळगोंडा पाटील, प्रकाश गेबिसे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. शितल बागे यांनी आभार मानले.

# संग्गोळी रायण्णा सर्कल विकासासाठी ३.२५ कोटी निधी

## लक्ष्मणराव चिंगळे

निपाणी,ता.२६(प्रतिनिधी)-

**निपाणी कोटलगी मार्गावर निपाणी कोर्टाजवळ असलेल्या क्रांतीवीर संग्गोळी रायण्णा सर्कलचा विकास करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री तथा जिल्हा पालकमंत्री सतिश जारकिहोळी यांनी सार्वजनिकबांधकाम विभाग खात्यातून ३ कोटी २५ लाख रूपये मंजूर केले असल्याची माहिती चिकोडी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, बुडा अध्यक्ष व धनगर समाजाचे जेष्ठ नेते लक्ष्मणराव चिंगळे यांनी दिली.**

तसेच शहराला ऐतिहासिक महत्व करून देणारा बेळगांव जिल्ह्यातील सर्वात मोठा क्रांतीवर संग्गोळी रायण्णांचा १५ फुटी पुतळ्याचे लवकरच अनावरण करण्यात येणार असल्याचे



निपाणी येथे पत्रकार परिषदेत बोलताना लक्ष्मणराव चिंगळे बाजूस उपस्थित धनगर समाजातील मान्यवर.

सांगितले.

निपाणी शासकिय विश्रामधामात आयोजीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्यातून निपाणीत प्रवेश करताना पहिलाच असणारा सर्कलचे क्रांतीवीर संग्गोळी रायण्णा नामकरण झाले आहे. या ठिकाणी भव्य पुतळा निर्माण करण्याची आमच्या धनगर समाजाची अनेक वर्षाची मागणी होती. याप्रकरणी जिल्हा पालकमंत्री सतिश जारकिहोळी यांच्याकडे पाठपुरावा केल्याने २२ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत याप्रकरणी मान्यता देवून या सर्कलच्या विकासासाठी ३ कोटी २५ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामधून या ठिकाणी पूर्ण रस्ता विकसीत करून चांगल्या प्रकारचे सर्कल निर्माण करण्यात येणार आहे.तसेच या ठिकाणी ३६ लाख रूपये खर्चातून १५ फुटी संग्गोळी रायण्णाचा पुतळा उभारण्यात येणार असून पुतळा निर्माण कामालाही प्रारंभ करण्यात आला आहे. हा पुतळा राज्यातील सर्वात मोठा पुतळा ठरणार असून निपाणी भागाच्या इतिहासातील ऐतासिक क्षण ठरणार आहे. हे काम पुढील वर्षीच्या ऑगस्ट ते डिसेंबरपर्यत पूर्ण करून बेळगांव हिवाळी अधिवेशनच्या काळात मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांच्या हस्ते पालकमंत्री सतिश जारकिहोळी व मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन करण्यात येणार असल्याचे सांगून या कामी पीडब्ल्यूडीचे सेक्रटरी सत्यनारायण व अधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे सांगितले.

निपाणी धनगर समाजाचे अध्यक्ष आर.के.धनगर यांनी लक्ष्मणराव चिंगळे यांच्यामुळे पुतळा उभारणीचे काम होणार असल्याचे सांगितले. तर महादेव कौलापुरे यांनी वाळकी येथे २५ लाख रूपयांतून पुतळा उभारणीचे काम सुरू असल्याचे सांगितले. यावेळी सिद्धू नराटे, श्रीकांत बन्ने, राहूल ढोणे,सिद्राम पुजारी, सिंध्दलिंग पुजारी, एस.के.दिवटे, एम. वाय.गोकार, मल्लाप्पा बन्ने, रेवण्णा पुजारी, आर.ए बन्ने, संतोष हेगडे आदी उपस्थित होते.

# कोनवडे शाळेच्या नुतन इमारतीसाठी निधी मंजूर

कुर,ता.२६(वार्ताहर)-

**कोनवडे गावाचा शैक्षणिक दृष्ट्या तालुक्यात अग्रेसर म्हणुन नावलौकिक आहे. सध्या गावात सरकारी अधिकाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे व या सर्वांचा जिल्हा परिषदेच्या शाळेतच पाया घडला व यशस्वी झाले त्यामुळे जिल्हा परिषद शाळा टिकली पाहिजे.**

या लोकभावनेचा आदर करत, गावातील शैक्षणिक प्रगती लक्षात घेता,ग्रामपंचायत,शाळा व्यवस्थापन, ग्रामस्थांच्या मागणीनुसार जिल्हा परिषदेच्या विद्या मंदीर कोनवडे शाळेच्या नुतन इमारतीसाठी ५० लाखाचा निधी मंजुरीचे पत्र राज्याचे आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या माध्यमातून देत असल्याची घोषणा केडीसी बँकेचे संचालक प्रा.अर्जुन आबिटकर यांनी केली.

ते कोनवडे (ता.भुदरगड) येथील नाम.प्रकाश आबिटकर यांच्या



कोनवडे : येथे ग्रामपंचायत नुतन इमारत भूमीपुजन प्रसंगी बोलताना प्रा.अर्जुन आबिटकर,मदन देसाई,कल्याण निकम,बाजीराव चव्हाण,सरपंच सुनिता कांबळे व सर्व सदस्य.

निधीतून मंजुर नुतन ग्रामपंचायत इमारतीच्या भूमीपुजन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.प्रदीप पाटील यांनी स्वागत, तर बी. एस.पाटील यांनी प्रास्ताविक केले.यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, कोनवडे गावच्या सर्वांगीण विकासासाठी नामदार प्रकाश आबिटकर हे सदैव प्रयत्नशिल असूनगावातील प्रलंबित कामे येत्या काळात टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील. नुतन ग्रामपंचायत इमारतीच्या वाढीव कामासाठीही वाढीव निधीची तरतूद केली जाईल.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य मदन देसाई, माजी बाजार समिती संचालक कल्याण निकम यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास बाजीराव चव्हाण, कृष्णात खतकर, सरपंच सुनिता कांबळे, यांच्यासह स्थानिक गटप्रमुख, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. संजय पाटील यांनी आभार मानले.

# कागलमध्ये साकारले आकर्षक सेल्फी पॉईंटस्

कागल,ता.२६(प्रतिनिधी)

**कागल शहरात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या संकल्पनेतून शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी व शहर स्वच्छ राहण्यासाठी नगरपरिषदेच्यावतीने ठिकठिकाणी आकर्षक सेल्फी पॉईंटस् साकारण्यात आले आहेत. यापूर्वी कचऱ्याचे ढीग साचणाऱ्या पाच ठिकाणी हे साकारण्यात आले आहेत. त्यामुळे शहर स्वच्छ राहण्यासही मदत होणार आहे. या उपक्रमामुळे शहराला एक नवे सौंदर्य लाभले आहे.**

शहरातील प्रत्येक विभागातील सामाजिक, सांस्कृतिक, तसेच ओळख दर्शवणारे घटक लक्षात घेऊन हे सेल्फी पॉईंटस् उभारण्यात आले आहेत.ज्या भागात ज्या समाजाचे, संघटनेचे किंवा स्थानिक परंपरेचे प्राबल्य आहे. त्याच्याशी निगडित संदेश आणि



कागल-रिंग रोडवर माधव हॉस्पिटल जवळ स्वच्छतागृहाच्या समोर असा सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे .

प्रतिकात्मकता या सेल्फी पॉईंट्समध्ये दिसते. ज्या ठिकाणी कचरा पडतो व अस्वच्छता असते अशी ठिकाणे निवडून हे सेल्फी पॉईंट उभे करण्यात आले आहेत. त्यामुळे शहर स्वच्छ राहण्यासाठीही मदत होणार आहे.

या उपक्रमातून कागलची सामाजिक एकता, प्रगतीशील विचार आणि सौंदर्यदृष्टी अधोरेखित झाली आहे. विविध रंगसंगती, आकर्षक लाईटिंग, स्थानिक घटकांचा वापर आणि जनसंपर्क वाढविणारी रचना यामुळे हे ठिकाण आता नागरिकांचे आवडते ''फोटो स्पॉट'' ठरणार आहेत. नगरपरिषदेच्यावतीने उभारण्यात आलेल्या या सेल्फी पॉईंट्समुळे कागल शहर अधिक आकर्षक बनले आहे.

## थोडक्यात



बारवाड पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेले वारकरी.

### टाळ मृदुंगाच्या गजरात बारवाड दिंडी पंढरपुरास रवाना

बारवाड,ता.२६(वार्ताहर)-

**श्री विठ्ठल रुक्मिणी वारकरी सांप्रदाय मंडळ बारवाड यांच्यावतीने ता.२४ ऑक्टोंबर ते ३ नोव्हेंबरअखेर कार्तिक वारी पायी दिंडी सोहळा काढण्यात आला असून हा दिंडी सोहळा टाळ मृदुंगाच्या गजरात रामकृष्ण हरीच्या जयघोषात पंढरपूरकडे रवाना झाला.**

प्रारंभी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात वीणा पूजन व पंचपती करून दिंडी सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.दिंडी सोहळा गावातील प्रमुख मार्गावरून कारदगा, बोरगाव, कुरुंदवाड, शिरोळ, कळंबी, तानंग फाटा, कुची, जूनोणी, वाटंबरे, सांगोला, खर्डी मार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.या दिंडी सोहळ्याचे हे १९ वे वर्ष असून हा दिंडी सोहळा हभप गुरुवर्य राणोजी वास्कर महाराज पंढरपूर व हभप कै.रामचंद्र भिवसे महाराज हंचिनाळ यांच्या कृपाशीर्वादाने व हभप दत्तात्रय साळुंखे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघाला.वारकरी व भाविक विठुरायाच्या नामाचा जयघोष करत मार्गस्थ झाले.

### उमेश फडी यांचा प्रामाणिकपणा

संकेश्वर,ता.२६(प्रतिनिधी)-

**संकेश्वर युनियन बँकेतून वृध्दाप पेन्शनचे पैसे घेऊन कणगला गावाकडे परतणाऱ्या महादेव फटिंगे यांचे १६०० रुपये, आधार कार्ड, पॅनकार्ड बसपास हरविले होते.त्यानंतर आजोबांनी बराच वेळ बाजारात शोध घेतला तरीही पैसे, महत्वाची कागदपत्रे कांही मिळाली नाहीत.त्यामुळे हताश होऊन घराकडे परतले.**



येथील श्री दुर्गामाता सौहार्द सहकारी संस्थेचे पिग्मी कलेक्टर उमेश फडी यांना जुमा मशीद समोरच्या रस्त्यावर आधार कार्ड व १६०० रुपये पडलेले दिसून आले.

त्यांनी आधारकार्डवरील कणगला येथील पत्ता पाहून अशोक हिरेकोडी यांचेशी संपर्क साधत आजी-आजोबांचे आधारकार्ड, पॅनकार्ड,बस पास मिळाल्याचे सांगून त्यांना पाठवून देण्याविषयी सांगितले.उमेश फडी यांनी आजोबा महादेव फटिंगे यांना हरविलेले पेन्शनचे १६०० रुपये,आधार कार्ड,पॅनकार्ड बस पास सुपुर्द केले.

# जि.प.निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकून काँग्रेसचा अध्यक्ष करूया

## आम.सतेज पाटील; गुडाळ येथे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न

शिरगाव,ता.२६ (प्रतिनिधी) -

**कोण गेले हे महत्वाचे नाही , या मातीतील प्रत्येक माणसाच्या हृदयात काँग्रेस कोरली आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणूकीत काँग्रेसच्या सर्वाधिक जागा निवडून आणून काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष करूया, स्वर्गीय माजी आम.पी.एन. पाटील यांचे स्वप्न साकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी केले .**

गुडाळ (ता.राधानगरी) येथे आगामी जिल्हा परिषद व पंचायत निवडणूकीच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या राधानगरी तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते . अध्यक्षस्थानी खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती हे होते . प्रारंभी काँग्रेसचे जेष्ठ नेते



गुडाळ येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना आम.सतेज पाटील व्यासपिठावर खास.छत्रपती शाहू महाराज व उपस्थित प्रमुख मान्यवर.

स्वर्गीय माजी आम.पी. एन . पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराज , छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी पुढे बोलताना सतेज पाटील म्हणाले,या मातीतील प्रत्येक माणसाच्या मनात काँग्रेस कोरली आहे. विधानसभेत महाविकास आघाडीला फटका बसला त्याला अनेक कारणे आहेत. ज्या दिवशी विधानसभेचा निकाल लागला त्या टक्केवारीच्या पाच टक्केही सत्ताधाऱ्यांमध्ये उत्साह दिसून येत नव्हता. तेथून शंकेची पाल चुकचुकली होती. युतीतील पक्ष मनाने नाहीत तर ईडीमुळे एकत्र आले आहेत .आम्ही तीन तालुक्याचा आढावा घेतला.खासदार शाहू महाराज छत्रपती म्हणाले , सतेज पाटलांनी सध्या आक्रमक भूमिका घेतली आहे. निवडणूकीच्या काळात झालेला घोळ समोर आला आहे. त्यामुळे आपण सर्वांनी दक्ष राहून काम करणे गरजेचे आहे. काँग्रेस पक्षाने अनेक चढउतार बघितले आहेत. त्यामुळे सध्याच्या कठीण काळात देखील काँग्रेसचे कार्यकर्ते कट्टर राहतील यात शंका नाही.गोकुळचे संचालक अभिजित तायशेटे म्हणाले, राधानगरी तालुका काँग्रेस पक्षाला बळ देणारा आहे. छत्रपती शाहू महाराज व सतेज पाटील जो निर्णय घेतील त्याला पाठिंबा देतील.राधानगरी तालुकाध्यक्ष हिंदूराव चौगले यांनी जनता काँग्रेस पक्षाच्या पाठीशी ठाम असल्याचे नमूद केले.

यावेळी गोकुळचे संचालक आर.के मोरे, बिद्रीचे संचालक राहूल देसाई ,सत्यजित जाधव , सदाशिवराव चरापले,नितीन पाटील, अभिजित पाटील,दत्तात्रय पाटील यांची भाषणे झाली. मेळाव्याला ए.डी. पाटील, सुप्रिया साळोखे, वैभव तहसिलदार, सुशिल पाटील सुधाकर साळोखे, पांडूरंग भांदीगरे, तौफिक मुलानी, मधूकर रामाणे आदी उपस्थित होते .

**स्वबळावर मैदान मारायची तयारी ठेवा**

या सभेत काही कार्यकर्त्यांनी आगामी निवडणूकीत आघाडी करण्याबाबतचा उल्लेख केला.यावेळी सतेज पाटील यांनी आपल्या भाषणात याबाबत बोलताना म्हणाले, आघाडीची चर्चा आताच करू नका, एकदा मैदानात उतरलो तर मैदान स्वबळावर मारायची तयारी ठेवा,आपल्याला भिती बाळगायची गरज नाही.कोण गेला यापेक्षा काँग्रेसचा झेंडा फडकला हे महत्वाचे आहे. कारण इथल्या कणाकणात काँग्रेस आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**२ बीएचके** नवीन तयार फ्लॅट त्वरीत विकणे आहे. मथुरानगर, सांगली रोड, इचलकरंजी. संपर्क– ९४२२०४३८३६

**मेन्स वेअर–**शर्ट, जीन्स, फॉरमल पॅन्ट, टीशर्ट सर्व नवीन व्हरायटी शांती गारमेंट, गुरू चित्रमंदिर जवळ, इचलकरंजी. ७०२०१५५७६६

**जमीन विकणे आहे–** तिळवणी, ता. हातकणंगले येथे एस.टी. स्टॅण्डजवळ, स्वमालकीची ११ गुंठे शेतजमीन विकणे. संपर्क– ९१३०५९३४७४.

**इचलकरंजी लक्ष्मी इंडस्ट्रिजजवळ** रोडटच पावणे पाच गुंठे जागा विकणे आहे. संपर्क– ९५११७४५८५९, ९३७३६४४०६४

**१० पैसे पिकाने** ३३ पीसी माल चालवणे आहे. ६८ इंच मागवाल्यांनी संपर्क साधावे. संपर्क– ९९७०६३७०७०

**विद्यार्थी हॉस्टेल व** कॅन्टींगसाठी इन्व्हेस्टर पाहिजे व जेव्हीसाठी जागा देणे आहे. संपर्क– ८७८८२२९१६५.

**कोरोचीमध्ये फॉर्म** हाऊस प्लॉटींग मधील लाईट, पाणी, मोठी झाडे असणारे ५ गुंठे व १० गुंठे फार्म हाऊस प्लॉटस् विकणे आहेत. संपर्क– ९३७०१४१५०५.

**शहापूर येथे** २५.५०X ७८ कलेक्टर एन.ए. प्रॉपर्टी विकणे आहे. संपर्क– ९८३४४०७४७७.

**रेंदाळ गावामध्ये** सर्व सोयीनियुक्त कलेक्टर एनए प्लॉट विकणेचे आहे व कबनूरमध्ये २१ गुंठे शेती विकण्याची आहे. संपर्क– ९७६४९७८६००, ८०८७८०५७९१

**कोरोचीमध्ये** कलेक्टर एनए बिगरशेती प्लॉटस ११५० ते १४०० स्क्वे. फूटापर्यंत विकणे आहे. भैरवनाथ केअर हॉस्पिटलजवळ, कोरोची. संपर्क–९७६६७०४७७६, ९५५२७५७१८४

**२ बीएचके फ्लॅट विकणे–**लिफ्ट, २४ तास पाणी, सोलरसह, रेडी पझेशन स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८९०११६१६१

**जुने व नवीन** पॉवरलूम घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशीन, डक्टींग घेवू व देवू. संपर्क–८३१७२९१००८

## विवाह विषयक

**वधु पाहिजे–** वर मराठा ३६, अपेक्षा, घटस्फोटीत, विधवा, रिलेशनशीप सहचारिणी वधुनी स्वत: संपर्क करा. मो. ९३५९१८२५७१.

## आरोग्य विषयक

**मानसिक आजार–** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क–८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## कर्ज विषयक

**होमलोन मॉरगेज** चालू कर्ज कमी रेटने एनए असो नसो मराठा, ओबीसी सबसिडी फक्त असेसमेंट, फाळावर पण करू. ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५

**लोन सेटलमेंट–** लोन कितीही असू दे कमी बजेटमध्ये अर्जंट सेटलमेंट करून देवू. (तारण लोन) (पर्सनल लोन अर्जंट करू) संपर्क– ९४०५५४४९०१

**होमलोन १०.२५ %** व्याजदराने कमीत कमी कागदपत्रामध्ये लोन करून मिळेल. आवास योजना सह. संपर्क– ९७६४९७००९२.

**असिसमेंट उतारा** व घरफाळा पावतीवर तारण किंवा होमलोन करून मिळेल. संपर्क– ९७६४९७००९२.

## * नोकरी विषयक *

**CNC/VMC** ऑपरेटर पाहिजेत. २ CNC ऑपरेट करायला मिळतील. १५०००/– ८ तास. Sc Industries लिंबू चौक. 8308813314

**टेक्स्टाईल विव्हिंग** क्षेत्रातील नामांकित कंपनीमध्ये फॅब्रिक डिस्पॅच विभागासाठी अनुभवी उमेदवार आवश्यक आहे. शैक्षणिक पात्रता : टेक्स्टाईल डिप्लोमा किंवा पदवी (B.Tex.) पगार : १५,००० ते १८,०००, इचलकरंजी संपर्क : ८३७८८६९८७८

**टेक्स्टाईल विव्हिंग** क्षेत्रातील नामांकित कंपनीमध्ये PPC विभागासाठी अनुभवी उमेदवार आवश्यक आहे. शैक्षणिक पात्रता : टेक्स्टाईल डिप्लोमा किंवा पदवी (B.Tex.) पगार : १८,००० ते २०,०००, इचलकरंजी, संपर्क: ८३७८८६९८७८

**Required** Accountant for all Textile Manufacturing Company Having Good Knowledge in Excel, Tally and Inventory Khabani Software, Minimum 1 year. Experience Required. Female Candidate will Be Preferred Contact- 9913611881

**सेल्समन व हेल्पर–** पुरूष/महिला कामगार पाहिजेत. विजय मेटल, मेन रोड, इचलकरंजी. फोन– ९४२२०४४९४३

**अर्जंट कामगार पाहिजे.** पंचगंगा सर्व्हिसिंग सेंटर, येथे अनुभवी ११५००/– शिकाऊ–९०००/– प्रामाणिक, गरजू, स्टेशन रोड, माणिक स्टिलसमोर.

**सीएनसी ऑपरेटर पाहिजेत.** आकर्षक पगार+ईएसआयसी सुविधा. संपर्क–पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. फोन– ९९७०५७८१०८, ९८८१२३१०८५

**ऑफिस कामासाठी** सुशिक्षित दिवाणजी पाहिजे व निर्व्यसनी सुशिक्षित ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ७०६६८५७३४०, ९४२२०४८६९०

**पाहिजे.** तारदाळ येथील एअरजेट व रॅपिअर लूम युनिटकरीता अनुभवी व हुशार दिवाणजी पाहिजे. बायोडाटा व्हॉटस ॲप करणे. संपर्क– ९८२२५९७७५०

**अर्जंट पाहिजे.** नाष्टा सेंटरसाठी कुक व वेटर पाहिजे. जोडीने असेल तर प्राधान्य. संपर्क– ९९७०७६५१८४–अ. लाट.

**फ्लिपकार्टमध्ये** इचलकरंजी व आसपासच्या भागात डिलीव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क– ९९६०४९१५८७

**बारसाठी** अनुभवी मॅनेजर व वेटर पाहिजेत. संपर्क–९८५०५९६९६५, ७५८८६२०५०५

**लॅबमध्ये कलेक्शनसाठी** (एमएलटी/डीएमएलटी) मुले/मुली पाहिजे. अनुभवींना प्राधान्य. समक्ष भेटा. श्री बालाजी लॅब, पाटील ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपादनगर, इचलकरंजी.

**Hiring For PPC Planning** Person Airjet Looms in Textile office, Minimum 5 to 6 years experience. Yarn Purchase/Sizing Tippan/ Beam Planning/Fabrics Costing Knowledge Person. Must Preferable, Send Resume Whatsapp- 9793616655, Kismat Group.

**एअरजेट कारखान्यामध्ये** डिस्पॅच यार्न हिशोब ठेवण्यासाठी अनुभवी दिवाणजी पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. गट नं. ९२३, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट रोड, हातकणंगले, किस्मत ग्रुप. ९९२२८६६६५५

**पाहिजेत.** रिशेप्सनिस्ट–कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. * मेडिकल ऑफिसर (BAMS, BHMS) * OT असिस्टंट * X-Ray टेक्निशियन. Nursing स्टाफ. (ANM/GNM) समक्ष भेटा. पत्ता– पाटील ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपादनगर, इचल.

**गोडाऊन किपर पाहिजे.** सिमेंट गोडाऊनसाठी व इतर मटेरियल, आकर्षक पगार. संपर्क– ९३२५८४०१४८

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**फार्मासिस्ट पाहिजे.** फ्रेश/अनुभवी डी.फार्मा, एम. फार्मा, आकर्षक पगार+इन्सेन्टीव मिळेल. संपर्क– ९३२५८४०१४८

**मार्केटिंग व अकौटींग** कामासाठी विवाहीत लेडीज/जेंटस पाहिजेत. संपर्क–समर्थ ट्रेडर्स, बावणे गल्ली, गर्ल्स हायस्कूलसमोर, इचलकरंजी. फोन–९२२५२५९९६६, (वेळ ९.३० ते १)

**कॅफेमध्ये कामासाठी** लेडीज/जेन्टस पाहिजे. कामाची वेळ–१० ते ६, ५ ते ११. संपर्क– ७७४१०७२५०८, ९९२२१६६७०२

**पाहिजेत.** बी.कॉम/बीबीए लेडिज बॅक ऑफिससाठी व पॅकिंगसाठी १२ वी पास मुलगा. (कोरोची) संपर्क– ९७६६८०३४७६

**शुध्द शाकाहारी हॉटेलमध्ये** चपातीसाठी/भांडीकामासाठी लेडीज पाहिजे. संपर्क–८९७५६९८४७४/ ७९७२१२१६५५

**कार मेकॅनिक पाहिजेत.** फोर व्हीलर वर्कशॉपसाठी अनुभवी हुशार मेकॅनिक पाहिजे. संपर्क– ९८२२४३३४२६

**दवाखान्यात डे/नाईटसाठी** सिस्टर पाहिजेत. संपर्क–प्रफूल्ल नर्सिंग होम. मो. ८८३०२१८३१७

**डॉमिनोज पिझ्झा–**कामगार पाहिजेत. डिलीव्हरी बॉय, आकर्षक पगार. संपर्क–९५२९२१५७४०, ८३९०३६१११४

**गारमेंटमध्ये** शिलाई कामासाठी गरजू लेडीज भरती सुरू आहे. संपर्क– ८२०८११५००६

**कपड्याच्या शोरूममध्ये** मुले सेल्समन पाहिजेत. पत्ता–जुन्या नगरपालिकेसमोर, इचलकरंजी. फोन–८६६८९४५३५५

**अनुभवी व्हीएमसी** ऑपरेटर व सुपरवायझर पाहिजेत. आकर्षक पगार, गणेश नगर, ७ वी गल्ली, इचलकरंजी. फोन–९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८

**खंजीरे इंड. इस्टेट** गणेश नगर येथे ऑफिस व गोडाऊन कामासाठी मुलगा पाहिजे. शिक्षण–१० वी, १२ वी. पगार–८ ते १० हजार. संपर्क– ९९२१०२३९३९. (भेटणेची वेळ– सायं. ४ ते ६)

**होगाडे ड्रायव्हिंग स्कूलमध्ये** ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. स्थानिकांना प्राधान्य. संभाजी चौक, इचलकरंजी. फोन–९८९०८३४६२७

**Ladies Teachers** are required for play Class. Nursery, Junior K.G., Senior K.G. and Ladies P.E. teacher. Contact- 9890618297

**घरकामासाठी बाई पाहिजे.** स्वयंपाक व केरकचरा. पत्ता– महासत्ता चौक, इचलकरंजी. संपर्क–९६३५७५७३३३, ७४०४९३७२७३

**मिलींग व सरफेस** ग्रायडिंग मशिनवर अनुभवी ऑपरेटर पाहिजेत. पगार– १५ ते १८ हजार. पत्ता–कोरोची. संपर्क–८६०००९११२४

**स्त्री/पुरूष** ऑफिस कामासाठी पाहिजे. स्थानिक, १२ वी पास, संगणकीय ज्ञान. संपर्क–आनंदी एजन्सीज, मंगलमुर्ती टॉकीज समोर, इचल.

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ३५ बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायभिमुख प्रशिक्षण Tally & GST, Graphic Design, Ms-Office, Advance Excel कोर्सेसना शासनमान्य ISO Certificate नाममात्र नोंदणी फी, युनिव्हर्स कॉम्प्युटर. संपर्क– ९०७५७८११७७.

**त्वरीत हेल्पर पाहिजेत.** काच कारखान्यात कामासाठी संपर्क– ९५५२२७४०४०

**हॉस्पिटलमध्ये रिशेप्सनिस्ट पाहिजे.** कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. स्वामी समर्थ हॉस्पिटल, विवेकानंद कॉलनी, पंचवटी टॉकीजशेजारी, इचलकरंजी.

**इचलकरंजी मधील** नामांकित कॅफे रेस्टॉरंटमध्ये पार्टटाईम, फूलटाईम, अनुभवी व फ्रेशर कामगार पाहिजेत. संपर्क–७०२०२४५६७२– इचलकरंजी.

**वरूटे मिरची मसाला सेंटर,** गांधी कॅम्प येथे जेंटस व लेडीज कामगार पाहिजे. संपर्क–९८५०८७२५८७

**सुवर्ण पेढीमध्ये** सुशिक्षित, बँकिंग नॉलेज/कॉम्प्युटर ऑपरेटर, सेल्समन, सेल्सगर्ल पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य. फ्रेशही चालतील. ओळखपत्रासह समक्ष भेटा. श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवॉल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

**एअरजेट कंपनीमध्ये–**कामगार पाहिजेत. हेल्पर–२, विव्हर–४, बिमगेटर–४, टेकलर–२, मास्टर– १. मो. ९०११०९९०२६

**डी.टी.पी. ऑपरेटर पाहिजे.** प्रिटींग प्रेसमधील कामाचा अनुभव. कोरल ड्रॉ व फोटोशॉप कामाचा अनुभवी असणे आवश्यक. संपर्क– ९८२३७१९७१२

**डीकेटीईजवळ** कॅफेकरिता कुक पाहिजे. संपर्क–८०१३०१९६९६

**टेक्स्टाईल पेढी** ऑफिस कामासाठी दिवाणजी व होंडा सिटी गाडीवर अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटा– संभाजी चौक, किरण गॅस एजन्सीसमोर, चंद्रा बिल्डींग, इचलकरंजी. ९९२२५५९९१९

**GST व Income Tax** चे अनुभव असलेले अकौटंट पाहिजे. भेटा–संभाजी चौक, किरण गॅस एजन्सीसमोर, चंद्रा बिल्डींग, इचलकरंजी. ९९२२५५९९१९

**त्वरीत सिक्युरीटी** गार्ड नेमणे– पार्वती इंडस्ट्रिज, शहापूर खंजिरे इंडस्ट्रिज, आवाडे पार्क, येथे ८ तास, १२ तास. संपर्क–एस.एम.एस. सिक्युरीटी. फोन–८३०८५०६७९६, ९५११७५९६७६

**एअरजेट कारखान्यामध्ये** दिवाणजी पाहिजे. सूत व कापडाचे काम करण्यासाठी भेटण्यासाठी वेळ सायं. ५ ते ७. पत्ता–८/१७२, बोहरा मार्केट. संपर्क–९३७१०४९३७८

**इचलकरंजी येथे** प्रोसेसमध्ये कलर व केमिकल देण्यासाठी कामगार पाहिजेत. आकर्षक पगार, ८ तास/ १२ तास. मो. ८२७५०७९६२१

**कंपनीमध्ये साफसफाई** कामासाठी कामगार पाहिजेत. पगार–१०,००० ते १२,००० टाईम ९ ते ६. मो. ८८५७९४०५९५, ८७९६५०९६३१

**२४ एअरजेट लूमसाठी** कामगार मॅनेजमेंट करणे आणि कापड गोडावून मॅनेजमेंटसाठी अनुभवी दिवाणजी पाहिजे. संपर्क– ७७४३८४०५८५

**हॉटेलमध्ये कामासाठी** अनुभवी व शिकाऊ वेटर, किचन हेल्पर पाहिजेत. कोरोची. मो. ९८२३१५९०९६, ९१३००५९०९६

**एअरजेट युनिटसाठी** दिवाणजी/ सुपरवायझर पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. के.ए.टी.पी. हातकणंगले. फोन–९९२१७७९८८१

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड** व सुपरवायझर भरणे ८ तास ड्युटी कबनूर व लक्ष्मी इंडस्ट्रीज. संपर्क– ९६०४६३९१०३, ७७७४९३६४३९.

**अकौंटंट फुलटाईम** शिकाऊ/ अनुभवी लेजर कटींग ऑपरेटर वेल्डर, शिटमेटल, हेल्पर कामगार पाहिजेत. समर्थ लोहार, गंगानगर, कबनूर. मो. ८६०५६८१५६३.

**गोमटेश एंटरप्रायजेस** कंपनीसाठी ऑनलाईन युपीएस इन्व्हर्टर सर्व्हिस टेक्निशीयन पाहिजेत. आयटीआय इलेक्ट्रॉनिक्स, एक ते दोन वर्षे अनुभवी प्राधान्य. संपर्क– ९४२२५८२५१०.

**एचएमसी/व्हीएमसी**/व्हीटीएल ऑपरेटर जागा–०६ ईपीएफ व ईएसआयसी सुविधा उपलब्ध. समर्थ मेटॅलर्जीकल्स् युनिट–३, तारदाळ. संपर्क– ७०५८५८४२३९, ९९२२९३०७६५.

**ॲकॅडमीसाठी शिक्षक** पाहिजेत – विज्ञान, इतिहास, गणित व असिस्टंट टिचर. वेळ– ८ ते २. संपर्क– ९६२३५०४४३२.

**प्लंबिंग आणि** सॅनिटरी वेअर दुकानात कामगार पाहिजे. संपर्क– ९८२२४६५६६४, ९४२२०४४५४९.

**हॉस्पिटलमध्ये मेडिकल** ऑफिसर व ओटी असिस्टंट पाहिजेत. संपर्क– सुनिलदत्त अर्थोपेडिक सेंटर, महासत्ता चौक, इचलकरंजी.

**Looking For** MBA/BBA & Graduate Experienced Candidates For Sales Of Industrial Gloves & Garments. Call :- 7745083311. (FIELD SALES)

**पार्वती इंडस्ट्रीज़** मागील बाजूस नामांकित कंपनी मध्ये PRODUCTION SUPERVISOR & QUALITY SUPERVISOR शिलाई, पॅकिंग, व हेल्पर कामाकरिता मुले मुली लेडीज पाहिजेत. मो. ७७४५०८३३८८, ८४८३००१७९१.

**नादब्रम्हा इडली** पार्ट टाईम/ फुल टाईम कामासाठी मुले व मुली पाहिजेत. मो. ७२४९४६६६६८.

**पाहिजेत–** अनुभवी सीएनसी व्हीएमसी ऑपरेटर, सुपरवायझर पाहिजेत. पत्ता– संत मळा, इचलकरंजी. मो. ८२०८१६७९०८, ९७६३४०००४०.

**पाहिजेत–** लेडीज/जेंटस् कॉम्प्युटर ऑपरेटर आणि अकौंटसाठी १, ऑफिस कामासाठी ३ जागा. संपर्क– श्री गारमेंटस् साखरपे हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी. मो. ८९५६८८७७७१.

**नाष्टा सेंटरमध्ये** टेबल सर्व्हिससाठी जेंटस् कामगार पाहिजे. कामाची वेळ– ७.३० ते २. ९८८१९८२२९५. पगार– ६५००.

**खानावळीत भाकरी** व भांड्यासाठी लेडीज पाहिजेत. पत्ता– सावली सोसायटी, शहापूर. संध्या ६ ते १२. ९८८१९८२२९५.

**परमीट रूम** बिअरबारसाठी अनुभवी वेटर व साफसफाई कामगार पाहिजेत. संपर्क– ९७६७४९९५४०.

**नामवंत हॉस्पिटलमध्ये** केसपेपर काढण्याकरीता लेडीज व जेंटस् कामगार पाहिजेत. साजणी, रूई, कबनूर, तिळवणी या परिसरातील पाहिजेत. संपर्क– ७६६६४९५६३५.

**घर कामासाठी** लेडीज– राजवाडा परिसरात छोट्या कुटुंबासाठी घरकामासाठी लेडीज पाहिजे. संपर्क– ८१८००४६०६०, मॅसेज करावा.

**इंजिनिअरींग वर्कशॉपसाठी** वेल्डर व हेल्पर पाहिजेत. संपर्क– ९१४६७२७१११, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे–** फॅमिली कारसाठी अनुभवी लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ९७६६३७७३७३, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत–** व्हीएमसी ऑपरेटर– ३ जागा, लेथ मशिनवर टर्नर– २ जागा. हेल्पर– ३ जागा. पुरूष/महिला, फुल/ पार्ट टाईम. आकर्षक पगार. संपर्क– ९८३४१८१०१६.

**पाहिजेत–**दत्तनगर शहापूर येथील नामांकीत कंपनीकरीता १)सीएनसी /व्हीएमसी ऑपरेटर– ५ जागा. अनुभवी–२ वर्ष किंवा फ्रेशर, २) हेल्पर – २ जागा. संपर्क– ७०२८३९२६९६, ८८८८२०११५३.

**कार्यालयामध्ये** मॅनेजमेंट व देखरेखीसाठी कामगार हवा आहे. अर्जासह भेटा. मो. ८६२३९१७४७१.

**व्हेज नॉनव्हेज** हॉटेलसाठी चपाती व मोरी कामासाठी लेडीज व किचन हेल्पर व रोटीवाला पाहिजे. यड्राव फाटा, इचलकरंजी. मो. ८७६७६५९३३८.

**होलसेल औषध दुकानासाठी** १० वी/ १२ वी उत्तीर्ण तथा अकाऊंटसाठी मुल–मुली आवश्यक. पत्ता– सुशिल फार्मा एलएलपी नाईट कॉलेजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२.

**हॉटेल अनिल बुगड** घरगुती मांसाहारी खानावळ येथे वाढपी कामगार, सफाई कामगार पाहिजे. संपर्क– ७२७६१९४३५६.

**नामवंत शोरूममध्ये** कायमस्वरूपी साफसफाईसाठी लेडीज व हेल्पर कामासाठी मुले पाहिजेत. आकर्षक पगार. प्रत्यक्ष भेटा– ८६०३१५१५१५.

**जेंटस् कामगार पाहिजे–** टु व्हिलर आवश्यक. संपर्क– ९६३१३१६०३०, इचलकरंजी.

**अकौंटींग झालेले** किंवा शिकत असलेले मुले/मुली, बिग बझारजवळ, ऑफिस कामासाठी हवे आहेत. पार्ट टाईम कामासाठी. संपर्क– ८९५६१८१८६८, ७०५८५९९४४६.

**पीएलजी सायझिंग** युनिटमध्ये कामासाठी बॅक सायझर व वार्पिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत. संपर्क– ९२८४३८९४१३, प्राईड इंडियाजवळ, तारदाळ (इचलकरंजी).

**लेडीज कॉम्प्युटर** ऑपरेटर पाहिजे. संपर्क– ९६३१३१६०३०. इचलकरंजी.

**दुकानात कामासाठी** मुली/मुले पाहिजेत. अनुभवी/ शिकाऊ. संपर्क– सालासर ट्रेडींग एजन्सी, चिप्रे हॉस्पिटलजवळ, कागवाडे मळा, इचलकरंजी. मो.९३७२२८१०२६, ९४२२५८१०२६.

**ऑफिस कामासाठी** मुली पाहिजेत. पद सेल्स असिस्टंट व डाक्युमेंट करीता. आकर्षक पगार. लिंबू चौक, इचलकरंजी. मो. ९२८४००७४०४.

**पेट्रोल पंपावर** जेंटस्/ लेडीज अनुभवी कामगार पाहिजेत. आकर्षक पगार. मध्यवर्ती ठिकाणी. संपर्क– ९४२२५१५०७६, ७७५५९१५०७६.

**इचलकरंजीमध्ये** शुध्द शाकाहारी हॉटेलसाठी मॅनेजर, शेफ, रोटीवाला, वेटर २ कॅप्टन पाहिजे. अनुभवींना प्राधान्य. मो. ८५५२८२४१८९.

**नामांकीत फर्टीलायझर** कंपनीमध्ये माल वाहतुकीसाठी तसेच फोर व्हिलर गाडीसाठी अनुभवी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ८४८४९६९१०८.

**पाहिजेत–** इचलकरंजी स्थित नामांकीत कंपनीकरीता १) ड्रायव्हर– ट्रान्सपोर्ट लायसन आवश्यक. २) हेल्पर– (महिला/ पुरूष) १० वी/१२ वी पास/ नापास, ३) सफाई कामगार (महिला /पुरूष) व इतर लाभ. संपर्क– ७७६७९०६३६३, वेळ सकाळी ९ ते सायं.६.

**व्हीएमसी ऑपरेटर** पाहिजेत– ११/ २४२ भारत पेट्रोलियम पंपासमोर, ईदगाह मैदानजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९८२२७६६७६२, ९८२३२१६०००.

**सिक्युरिटी गार्डस् व लेडी** गार्ड पाहिजेत. इचलकरंजी, नांदणी, पार्वती इंडस्ट्रीज, जयसिंगपूर करीता ड्युटी ८ व १२ तास आकर्षक पगार मो. ९०२१५५६१००, ९५२९५४५४६८.

**केप शॉपसाठी** फुल टाईम स्टाफ हवा आहे. केक करणाऱ्या आणि सर्व्हिस करणाऱ्यांनी संपर्क साधावा. वेळ–सकाळी १० ते दुपारी २ आणि सायं. ५ ते रात्री १०. संपर्क– ९७६४४६४७५५.

**अण्णास फॅशन या** शॉपमध्ये सेल्ससाठी मुले/मुली पाहिजेत. पगार ८०००–१००००/–. पत्ता– अण्णाज फॅशन, यड्राव फाटा, इचलकरंजी. मो. ८८८८९३२७२७.

**ड्रायव्हींग व गोडावून** कामासाठी कामगार पाहिजेत. जे.पी. सिंघवी, सुंदर बागेजवळ. संपर्क– ९४२२४१४३८५.

**लेडीज कामगार पाहिजे–** मगदूम आयुर्वेदीक क्लिनिक गांधी पुतळा, इचलकरंजी येथे हुशार व गरजू लेडीज किंवा मुलगी नेमणे आहेत. संपर्क– ७३८५११२०३९.

**कामगार पाहिजेत–** हॉटेल दामिनी हुपरी, वेटर–४, स्वच्छता कामगार –२, राहण्याची जेवणाची उत्तम सोय आहे. कामाची वेळ– सकाळी १० ते दुपारी ३, संध्या ६ ते रात्री ११. फुल टाईम १२०००, वेटर पार्ट टाईम– ६००० वेटर, तंदुरी रोटीवाला– १८००० फुलटाईमासाठी, स्वच्छता कामगार फुल टाईम ११०००, पार्ट टाईम ५०००. संपर्क– ९१७५२१०९९९.

**इचलकरंजी येथे** नामांकीत टेक्स्टाईल ट्रेडींग कंपनीमध्ये खालील जागा अर्जंट भरणे आहेत. १) दिवाणजी (PPC) –स्त्री/पुरूष, २) दिवाणजी (Dispatch)– पुरूष, ३) डाटा ऑपरेटर– स्त्री/ पुरूष, टेक्स्टाईल क्षेत्रात किमान २ ते ३ वर्षे अनुभव आवश्यक, कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक. प्रत्यक्ष भेटा– सावंत टेक्स्टाईल्स्, कन्या कॉलेजसमोर, ऐतवडे हॉस्पिटल शेजारी, इचलकरंजी. वेळ– १० ते १२.

**बिल्डींग मटेरियल** होलसेल सप्लायच्या मार्केटिंगसाठी सेल्सपर्सन पाहिजे. शिक्षण – १२ वी पास, साईट व्हिजीट व रिटेरल व्हिजीट संपर्क – ९५०४१११७७१.

**परमिट रुम** बियरबारमध्ये पूर्णवेळ/ पार्टटाईम वेटर कामगार पाहिजेत. यड्राव फाटा, इचलकरंजी. मो. ९४२२०४३९४६, ७०२००२२९७६.

**पीयुसी करिता** कॉम्प्युटरचे ज्ञान व १२ वी शिक्षण झालेला चार चाकी गाडी येणारा मुलगा पाहिजे. संपर्क– श्री बालाजी ड्रायव्हींग स्कूल, इचलकरंजी. मो. ८१८००३२००५.

**ऑफीस कामासाठी** १२ वी, टायपिंग ३० व संगणक ज्ञान असणारी मुलगी पाहिजे. श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, इचलकरंजी. मो. ८१८००३२००५.

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत–**एका नामवंत कंपनीमध्ये सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. पगार १३१७३ रु. सुविधा – प्राविडंड फंड, आठवडा सुट्टी. ठिकाण– गंगानगर, कामाची वेळ– १२ तासाची राहिल. संपर्क– ८३१८८०५६८५.

**प्रोफेशन सलून** (पार्लर)साठी सर्व कामे येणारे मुली व मुले पाहिजेत. रोहित सर. संपर्क– ८२०८७०९९७४.

**हॉटेलसाठी** वेटर पाहिजेत. संपर्क– ९५९५२७४५२७, ८८०६४८४९१९.

**लाइटींगसाठी** डेकोरेशनसाठी कामगार पाहिजेत. संपर्क– ९९२१६५५७१८.

**नामांकित टेक्स्टाईल** कंपनीमध्ये अनुभवी अकौंटंट पाहिजे. मो. ९४०४४०९११७.

**सिनेमा तिकीट** बुकींगासाठी महिला कामगार पाहिजे. पंचवटी चित्रमंदिर आकर्षक पगार.संपर्क– ९६२३१५०१०३, ९३२५३९७७११.

**झेरॉक्स सेंटरमध्ये** लेडीज ऑपरेटर पाहिजे. संपर्क– ८३०८४७११५५.

**व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत–** पॅटर्न शॉपकरीता व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. संपर्क– लक्ष्मी इंडस्ट्रीज हातकणंगले. मो. ७०५७६४९६९६, ८८३०८५९१९६.

**स्पायसर वायडिंग** मशिनवर हुशार व अनुभवी ३ कामगार व १ दिवाणजी पाहिजे. संपर्क– ९५९५१७९२९२, ८८८८४९९५५८.

**पेट्रोल पंपावर** डे व नाईटसाठी जेंटस्/ लेडीज कामगार पाहिजे. संपर्क– ७९५६२४७७८५, ७५५९२४७७८५.

**सुत पेढीवर ऑफिसबॉय** पाहिजे. १) सूत पेढीवर ऑफिसबॉय पाहिजेत. अनुभवी २ ते ३ वर्षे शिक्षण– बी.कॉम. पत्ता– हाय चॉईस यार्न डिस्ट्रीब्युटर्स, १२/६९३, राजाराम रोड, इचलकरंजी.मो. २४३१४५२, २४३३६३९.

**क्लार्क पाहिजे–** बँकेचे सर्व कामे करणारा सूत पेढीवर क्लार्क पाहिजे. अनुभव ४ ते ५ वर्ष. शिक्षण– बी.कॉम. पत्ता– हाय चॉईस यार्न डिस्ट्रीब्युटर्स, १२/६९३, राजाराम रोड, इचलकरंजी.मो. २४३१४५२, २४३३६३९.

**गरजू निर्व्यसनी** ड्रायव्हर पाहिजे– ऑफिस कामासाठी ऑफिस बॉय मुलगा पाहिजे. कुरियर वाटण्यासाठी मुलगा पाहिजे. संपर्क– ८८०५२३२६०६.

**पाहिजेत–** टेक्स्टाईल फर्ममध्ये कामासाठी रिशेप्सनिस्ट लेडीज पाहिजे. टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक. कामाची वेळ ९.३० ते ७.३०. संपर्क– ८७६७५९१५४९, इचलकरंजी.

**डाटा एंट्री** व सुपरवायझर कामासाठी कोरोची व हातकणंगलेमधील स्थानिक कामगार पाहिजे. पत्ता– रघुजानकी मंगल कार्यालयसमोर, कोळसा कारखाना, मो. ९४२३०४०१९३.

**ज्वेलर्समध्ये** मुली/महिला स्टाफ पाहिजे. संभाषण कौशल्य आवश्यक, आकर्षक पगार + इन्सेटीव्ह, संपर्क – ९४२३३१७१११.

**वायरमन पाहिजे** – शिकाऊ किंवा अनुभवी संपर्क – ९६५७६४३८१८.

**सुमित मिल्समध्ये** कामगार भरती चालू आहे. १) साडी डिपार्टमेंट – १० जागा (सेल्सपर्सन + हेल्पर) २) रेडीमेड ड्रेसेस डिपार्टमेंट – ६ जागा (सेल्सपर्सन+हेल्पर)३) गोडावून–४ जागा (२ जेंटस् + २ लेडीज) ४) बिलींग डिपार्टमेंट – २ जागा + रिसेप्शनिस्ट १ जागा भरणे आहे. संपर्क – सुमित फॅशन मिल्स, महेश बँक शेजारी, साखरपे हॉस्पिटल रोड, इचलकरंजी. मो. ८००७९१४००८.

**कामगार पाहिजे** – किराणा दुकानात काम करणेसाठी त्वरीत कामगार पाहिजे. संपर्क – मे. निटवे ॲण्ड सन्स, खंजिरे मळा, इचलकरंजी. मो. ९०२८८०१००८.

**पार्वती मशिन सेंटर** एमआयडीसी हातकणंगले येथे अनुभवी व फ्रेश अर्जंट भरणे आहे. १) जॉब इन्स्पेक्टर–२, २) शिफ्ट सुपरवायझर – २, ३) CMM Operator & Quality DOC. – १,संपर्क – ८६२३०३०१७४.

**सिक्युरिटी भरती** इचलकरंजी जे. के. नगर, यड्राव फाटा, कोरोची, कबनूर येथे ८ तास, १२ तास सिक्युरिटी गार्ड भरती सुरु. शिक्षण १० वी. मो. ८१७७९८६२३३, ९५२९९६७०४७.

**मातोश्री इंजिनिअरिंग** कबनूर सीएनसी/व्हीएमसी साठी अनुभवी सुपरवायझर, जेन्टस्/लेडीज ऑपरेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क – ९७६७००४७२८, ८१५२९२५६७१.

**हातकणंगले,** आळते, नेज इंडस्ट्रियलमध्ये सिक्युरिटी गार्ड भरण्याचे आहेत. आकर्षक पगार भेटेल. मो. ९१३०३९११९०७, ९८३४५७४९०६.

**नामवंत कंपनीमध्ये** जेन्टस्/लेडीज कामगार पाहिजे. शिक्षण – १० वी, १२ वी कोणतीही पदवी, ड्युटी ८ तास, १२ तास, आकर्षक पगार पीएफ/ईएसआय व इतर सुविधा. संपर्क – ७२१८८९५६३०, ८३९०६७६४८४.

**वर्कशॉपमध्ये** कामगार पाहिजे. वेल्डर, शिटमेटल, हेल्पर, ऑफीसबॉय. संपर्क – ९४२२४२८५१०.

**सीएनसी/व्हीएमसी** अनुभवी ऑपरेटर पाहिजेत. जागा–१० व अनुभवी सिक्युरिटी वॉचमन पाहिजे जागा–६, आकर्षक पगार, संपर्क – ७८४१९११२९६.

**पाहिजेत** – नवजीवन डेअरी व बेकरीसाठी ड्रायव्हर व सेल्समन २ जागा, मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह बीबीए/एमबीए २ जागा टेली कॉलर १ जागा, संपर्क – ९६५७०२८८८०.

**साईट सुपरवायझर** पाहिजे – १ ते २ वर्षाचा अनुभवी (डीसीई) स्वत:ची टू व्हिलर आवश्यक. इचलकरंजी परिसर. संपर्क – ९८२३०९६७२०.

**मसाले व ड्रायफ्रुटस्** दुकानामध्ये कामाकरिता मुली पाहिजेत. संपर्क – ९७९४७५५७११.

**हॉस्टेलमध्ये** चपाती बनवण्यासाठी व स्वच्छता, भांडीसाठी महिला पाहिजेत. तसेच वेटर कामासाठी लेडीज/जेन्टस् पाहिजेत. संपर्क – ८१७७८०१९६९.

**१ रिसेप्शनिस्ट** आणि २ आया बाई पाहिजेत. संपर्क – आई मॅटर्निटी होम, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९०२८२३५७०५.

**अर्जंट नेमणे आहे.** फोर व्हिलर मेकॅनिकल्स, डेंटर, पेंटर, कॉम्प्युटर ऑपरेटर (टॅली येणे आवश्यक आहे) सर्व्हिसिंगसाठी कारवर लेडीज/जेन्टस् अनुभवींना प्राधान्य. संपर्क – मारुती ऑर्थोराईज्ड सर्व्हिस स्टेशन, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९६३७९५१७५६.

**कारखान्यासाठी** कॉम्प्युटर शिकलेला दिवाणजी पाहिजे. संपर्क – हर्षित, मो. ९५१८७२७३०४.

**टर्नर, ड्रिलर** शिकावू मुले पाहिजेत. एस्. आर. एस. एंटरप्रायजेस, लोकमान्य नगर, साईनाथ वजन काटा, कोरोची. संपर्क – ८४२१४१११८४.

**एमआयडीसी** यड्राव/तारदाळ मधील नामवंत कंपनीसाठी कामगार पाहिजेत. आयटीआय डिप्लोमा– फ्रेशर, १० वी व १२ वी अनुभवी – सीएनसी,व्हीएमसी ऑपरेटर, किमान ४० जागा त्वरीत भरायच्या आहेत. वेतन – १४००० ते १५००० पर्यंत. मो. ९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८.

**तारदाळ हातकणंगले** येथील इंडस्ट्रियलमध्ये एका नामांकित कंपनीत कामगार भरती चालू आहे. हाऊस किपिंग – २०, पेन्टशॉप हेल्पर–१०, ब्लास्टर–१०, सिक्युरिटी गार्ड – १०, ईएसआय/ पीएफ/कँटीन सोय, मो. ८८८८६६१२७०, ९८३४५७४९०६.

**हॉस्पिटल इक्वीपमेंटस** बनवण्याकरीता हेल्पर $CO_2$, ऑरगॉन वेल्डींग मेन मिस्त्री, भरती सुरू आहे. अनुभवींना प्राधान्य, इचलकरंजी. संपर्क– ९०२१२०२७३१

**पार्वती इस्टेटमधील** टेक्स्टाईल ट्रेडींग फर्ममध्ये अनुभवी पीपीसी इनचार्ज ०१, वायडिंग दिवाणजी ०१, डिस्पॅच – डेटा एन्ट्री ऑपरेटर ०१, अकाऊंट असिस्टंट ०१, संपर्क – ७७२००१८४०६.

**पार्वती इस्टेट** जवळील टेक्स्टाईल मिलमध्ये अनुभवी सायझिंग दिवाणजी पाहिजे. तसेच एयर जेट लूम व्हिवर १०, बॅक सायझर ०५, हेल्पर ०६, प्रोसेस हेल्पर ०४, महिला कामगार ०४, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क – ७७२००१८४०६.

**अनुभवी व निर्व्यसनी** ड्रायव्हर पाहिजे. संपर्क – ७७२००१८४०६.

**पाहिजेत** – नामांकित शिक्षण संस्थेमध्ये ऑफीस बॉय कम क्लार्क पाहिजेत. संपर्क – ७७२००१८४०६.

**सिक्युरीटी गार्ड पाहिजेत.** १२ तास, डे/नाईट शिफ्टसाठी आकर्षक पगारासह इचलकरंजी व कोरोची. संपर्क–९३२६६३३४४५, ९०२१३१२५२४

**पाहिजेत.** फिटर, हेल्पर, खाता हेल्पर. संपर्क–मर्दा प्रोसेस, उत्तम टॉकीजमागे, इचलकरंजी.

**साईट सुपरवायझर पाहिजे.** टू व्हिलर आवश्यक. अनुभवींना प्राधान्य. संपर्क–९८५०१९४३५०, इचलकरंजी परिसर.

**कामगार पाहिजे.** फूलटाईम व हाफटाईम ४ ते ९. संपर्क– राजेश किराणा, जवाहर बेकरीजवळ, मोठे तळे, इचलकरंजी. ९४२१२८८८२६

**लॉजिंग हाऊसकिपींगसाठी** महिला किंवा पुरूष कामगार पाहिजेत. संपर्क–७०६६११४६९५

**पाहिजेत.** शिटमेटल मेस्त्री/अरगॉन वेल्डर/$CO_2$ वेल्डर/हेल्पर, पाऊडर कोटींगसाठी कोटर. संपर्क–विशाल इंडस्ट्रिज, खोतवाडी– ९१४६७६९६९६, ८९९९५००७७३

## * भाड्याने देणे/घेणे *

**व्यंकटराव हायस्कूलजवळ** ८०० स्क्वे. फूट पहिला मजला, बँक, क्लासेस, पतसंस्था व ऑफिसेस इत्यादीसाठी भाड्याने देणे आहे. संपर्क–९३७१५१२६००

**भाड्याने देणे–** मेन रोडवर १६X१६ स्क्वे. फूट व १०X२५ स्क्वे. फूट व पोटमाळा १८० स्क्वे. फूट सर्वसोयीनियुक्त. संपर्क–चैतन्य आयुर्वेदिक दवाखाना, थोरात चौकच्या पुढे, शहापूर. ९४२००१०१५०, ९१७५१०६८२९

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे. पत्ता– इंदिरा हौसिंग सोसायटी स्वामी अपार्टमेंट, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८८१२२२२४३, ७०५८७२५७०१.

**भाड्याने देणे–** २०X३० व ३०X३० चे गोडावून एकत्रित अथवा वेगवेगळे भाड्याने देणे. आयजीएम हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी. फोन–९८९०६८८९३४

**भाड्याने देणे–** १ बीएचके रूम सर्व सोयीनियुक्त किरण गॅसमागे, लंगोटे मळा, २ री गल्ली, अर्जुन कदम– ९४२३२६७३२१

**शेतजमीन भाड्याने पाहिजे–** इचलकरंजी परिसर, कोरोची, खोतवाडी परिसर किंवा कोल्हापूर येथे २ ते ५ एकर.संपर्क– ९२२६०४२४२०.

**हॉल भाड्याने** देणे आहे– ८०० स्क्वे. फुट इंडस्ट्रीयल इस्टेट, ईदगाह मैदान मागे, इचलकरंजी. मो. ७२१८१२१११७.

**खोतवाडी आरोही** बारला लागून गाळा भाड्याने देणे आहे. मेन रोड समोरील. संपर्क– ८९५६१८१८६८, ७०५९५९९४४६.

उर्वरित छो.जा. पान ७ वर

**✲ पान १ वरून ✲**

**३ बीएचके ग्राऊंड** फ्लोअर सर्व सोयीनियुक्त २४ तास पाणी,फ्लॅट भाड्याने देणे. संपर्क- ९३७०९४४४६४.

**सुंदर बागेजवळ** अक्षय अपार्टमेंट मधील ऑफिस भाड्याने देणे आहे. (फर्निचर तयार आहे). संपर्क- ८९५६१८१८६८, ७०५८५९९४४६.

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी १ रूम भाड्याने देणे आहे. घोरपडे नाट्यगृहजवळ, इचलकरंजी. मो. ८८८८२२८०५२.

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. पहिला मजला जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ८४८५८९५९९५.

**सर्व सोयीनियुक्त** गोडावून भाड्याने देणे आहे. गारमेंट व इतर व्यवसायासाठी. संपर्क- ९५९४७५१२०१

**भाड्याने देणे-**१५०० स्क्वे. फुट रोडटच १९ एच.पी. लाईटसह सीएनसी, व्हीएमसी, गारमेंट, गोडाऊनसाठी भाड्याने देणे. घोडकेनगर. देसाई- ९८२२१११२९०.

**गाळा भाड्याने** देणे आहे- गांधी कॅम्प मेन रोड, बिरेश्वर पत संस्थेच्या खाली ९X१६. संपर्क- ९५११२९७८६५.

**शेड भाड्याने देणे-** २८X६० सर्व सोयीनियुक्त आरसीसी ५ एचपी लाईटसह ज्ञानेश्वरनगर, तारदाळ. संपर्क-९५५२९१६८६५

**चालू स्थितीतील हॉटेल** भाड्याने देणे आहे. भंडारे पेट्रोल पंपासमोर, हातकणंगले. संपर्क-९७६३४७७७९९

**हॉटेलसाठी भाड्याने देणे आहे.** दामोदर पेट्रोल पंपासमोर, हातकणंगले. संपर्क-९७६३४७७७९९

**१५०० स्क्वे. फूट** शेड भाड्याने देणे आहे. मु.पो. माणगाव. संपर्क- ९०१११७५२५१, ९८८१८६३४६३

**शेड भाड्याने देणे-** ६५० स्क्वे. फूट मासिक भाडे-५०००, गोडाऊन, गारमेंटसाठी देणे. जवाहरनगर, इचलकरंजी. ८७८८१६२२६७

**बोअरवेल विषयक**

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. संपर्क- ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

**चौगुले बोअरवेल-** ४३ वर्षांची अखंड परंपरा आमचेकडे १ दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरींग करून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल व रिपेअरी करून मिळेल. संपर्क-डॉ. संजय चौगुले-९३२५१४६८८४, ९४०४७४६८८४

**श्री सिध्देश्वर बोअरवेल-** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल मारू मिळेल. संपर्क- ७७७५९३७५७२, ८५५४९८४५६३

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर-** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९९६०१०५४२१

**शैक्षणिक**

**शेअर मार्केट बेसिक** ते ॲडव्हान्स माफक फीमध्ये परफेक्ट शिका, प्रॉफीट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर, इचलकरंजी. मो. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१.


# विविध क्षेत्रात कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे अष्टपैलू नेतृत्व सुनिल पाटील

**राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या कार्य कर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटविणारे, पण प्रसिध्दीपासून अलिप्त राहणारे अनेकजण आहेत. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून जीवनात सुस्थिर झाल्यानंतर सामाजिक बांधिलकी जोपासणारे मोजकेच असतात. त्यामध्ये सुनिल सातगोंडा पाटील या नांवाचा नामोल्लेख झालाच पाहिजे. सामाजिक आणि राजकीय यांचा समन्वय साधत सर्वसामान्यांचा प्रतिनिधी अशी ओळख निर्माण केलेले सुनिल सातगोंडा पाटील यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा हा थोडक्यात आढावा....**



कर्नाटकातील सिदनाळ या गावातील सातगोंडा पाटील हे उदरनिर्वाहाच्या निमित्ताने वस्त्रनगरी इचलकरंजीत आले. याठिकाणी त्यांनी यंत्रमागांना बिमे पुरविण्याचे काम सुरु केले. सातगोंडा आणि सुवर्णा या दाम्पत्याच्या पोटी २७ ऑक्टोबर १९६४ रोजी सुनिल पाटील यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने सुनिल पाटील यांनीही हलाखीच्या परिस्थितीत मिळेल ते काम करत वडीलांना हातभार लावला. त्यांना बालपणापासून कबड्डी आणि खो-खो ची आवड होती. त्यातूनच त्यांनी या दोन्ही क्रीडा प्रकारात आपला ठसा उमटविला. कॉलेज जीवनात असताना त्यांच्यावर एनएसयुआय संघटनेच्या अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली. या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि हळूहळू त्यांचा राजकीय क्षेत्रात प्रवेश झाला. सन २०११ च्या इचलकरंजी नगरपालिकेच्या निवडणुकीत ते पहिल्यांदा नगरसेवक बनले. त्यानंतर सन २०१६ मध्येही त्यांना दुसऱ्यांदा लोकप्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली.

दरम्यानच्या काळात ते सामाजिक कार्यात अग्रेसर झाले, विविध संस्थांच्या संचालक पदाची जबाबदारी ते सध्याही सांभाळत आहेत. सन्मती सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून कार्य करताना वस्त्रनगरी असलेल्या इचलकरंजीतील वस्त्रोद्योगाला चालना देण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहेत. काळानुरूप अत्याधुनिकतेकडे वळण्यासाठी त्यांनी वस्त्र उद्योजकांना प्रोत्साहन व सहकार्य केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना पॉवरलूम डेव्हलपमेंट ॲन्ड एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल अर्थात पिडीक्सिल च्या चेअरमनपदाची धुरा सोपविण्यात आली. या संधीचा उपयोग त्यांनी वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्न केला. त्यातूनच दोनवेळा आंतरराष्ट्रीय पातळीवर बायर ॲन्ड सेलर मीट प्रदर्शन भरविले. या माध्यमातून देशातील कापड निर्यातीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. तर सन्मती बँकेच्या माध्यमातून यंत्रमागधारकांसह महिला बचत गटांना प्रोत्साहन देऊन त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले.

सामाजिक क्षेत्रातही ते सदैव अग्रभागी राहिले. येणाऱ्या प्रत्येकाला सहकार्य करण्याचा त्यांचा प्रयत्न बळ देणारा होता. त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपल्या खेळातून नांवलौकिक निर्माण केला. सध्या उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन आणि आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी ते झटत असतात.अनेक खेळाडूंना शासकीय सेवेत जाण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आणि आज विविध पदावर शहरातील खेळाडू कार्यरत आहेत.

सन्मती सहकारी मल्टिस्टेट बँकेचे चेअरमन, डी.के.टी.ई. संस्थेचे विश्वस्त, श्री वर्धमान पत संस्था, श्री बालाजी पत संस्था संचालक, सन्मती विद्यालय तारदाळचे चेअरमन, क. आ. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक यासह अनेक संस्थांमध्ये ते कार्यरत आहेत. अशा या प्रसिध्दीपासून अलिप्त राहून सतत मदतीसाठी धडपडणाऱ्या व्यक्तीमत्वाला वाढदिवसानिमित्त दीर्घायुरारोग्य लाभो हीच प्रार्थना आणि पुढील वाटचालीसाठी सदिच्छा...!

**महेश राजाराम कुंभार**
**बोर्ड सेक्रेटरी - सन्मती सहकारी बँक**

# जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द होणार

पुणे,ता.२६-

**पुण्यातील जैन बोर्डिंग ट्रस्ट बरोबर केलेला व्यवहार रद्द करण्याचा निर्णय बिल्डर विशाल गोखले यांनी घेतला आहे. जैन बोर्डिंगच्या जागेचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून तापला होता.माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. याशिवाय स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी देखील हा विषय लावून धरला होता.**

या व्यवहारातून बाहेर पडण्याचा गोखले यांनी निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेताना नैतिकतेच्या मुद्द्यावर व्यवहारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचं गोखले याचं ईमेल मध्ये म्हणणं आहे. याशिवाय जैन धर्मियांच्या भावना दुखवायच्या नव्हत्या, असंही विशाल गोखले यांनी म्हटलं आहे. आवाहनानंतर गोखले यांच्याकडून जैन बोर्डिंग ट्रस्ट सोबत झालेला व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. व्यवहार रद्द करण्याच्या निर्णयाची माहीती राजू शेट्टी यांना कळवली गेली असल्याची माहिती आहे. दरम्यान, गोखले बिल्डर जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द करण्यासंदर्भात अर्ज देण्याची शक्यता आहे. शेट्टी यांनी दुपारी ८६ हून अधिक जैन संस्था, संघटनांची बैठक झाली.

**धंगेकर आज जैन बोर्डिंगला भेट देणार**

रवींद्र धंगेकर हे उद्या जैन बोर्डिंगला भेट देणार आहेत. यावेळी ते जैन मुनींचे आशीर्वाद घेणार आहेत.धंगेकर यांनी २७ ऑक्टोबरपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यापूर्वीच बिल्डर विशाल गोखलेंकडून जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

# सीपीआर ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्स व शेंडा पार्कातील ऑडिटोरीएमचे आज लोकार्पण

कोल्हापूर, ता.२६(प्रतिनिधी) -

**कोल्हापुरातील छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय म्हणजेच सीपीआर हे जणू गोरगरीब रुग्णांची आरोग्यवर्धिनीच. सोमवारी २७ रोजी सीपीआरमधील अत्याधुनिक एम. आर. आय., सी. टी. स्कॅन, मॅमोग्राफी आणि अल्ट्रा सोनोग्राफी सुविधांचे लोकार्पण होणार आहे.**

मंत्री हसन मुश्रीफ, आम. राजेश क्षीरसागर, आम. अमल महाडिक, आदिल फरास यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. यावेळी सीपीआरमधील अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्स व शेंडा पार्कातील ऑडिटोरीएमचेही लोकार्पण होणार आहे.

सी. पी. आर. मधील हा कार्यक्रम दुपारी अडीच वाजता तर शेंडा पार्कातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय नगरीमध्ये



कार्यक्रम दुपारी तीन वाजता होणार आहे.

आत्तापर्यंत सीपीआरमध्ये एमआरआय मशीनच नव्हते. त्यामुळे एम. आर. आय. करण्यासाठी रुग्णांना खाजगी सेंटरची वाट धरावी लागायची. यामध्ये बारा ते पंधरा हजार खर्चाचा बोजा रुग्णांवर पडत असे. तसेच; सिटीस्कॅन मशीनही एकच होती. त्यामुळे; सिटी स्कॅनिंगसाठी प्रतीक्षा करावी लागायची. यापुढे एकाच छताखाली अत्याधुनिक एम. आर. आय., सी. टी. स्कॅन, मॅमोग्राफी आणि अल्ट्रा सोनोग्राफी सुविधा मिळणार आहेत. दरम्यान; नव्यानेच बांधलेल्या अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्सचेही आज लोकार्पण होणार आहे.

हे सर्वात चांगल्या प्रतीचे सर्वोत्कृष्ट एम. आर. आय. मशीन सिमेन्स या जगप्रसिद्ध जर्मन कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान रुग्णसेवा निदानासाठी अत्यावश्यक चाचणी करता येणार आहे.



रुग्णाचा खाजगी दवाखान्यामध्ये होणारा बारा ते पंधरा हजार खर्च वाचणारशासकीय दरानुसार रू. दोन हजारांमध्ये अल्पदरात ही सुविधा मिळणार आहे. सिमेन्स या जगप्रसिद्ध जर्मन कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान

१२८ स्लाईसचे सर्वात अत्याधुनिक सी. टी. स्कॅन मशीनआधीचे एक व नवीन एक अशा दोन सी. टी. स्कॅन मशीनमुळे रुग्णांची प्रतीक्षा संपणार आहे.रूग्णांचा खाजगीमध्ये होणारा चार ते पाच हजार रुपये खर्च वाचणार आहे.शासकीय दरानुसार रू. साडेतीनशे इतक्या अत्यल्पदरात ही सुविधा मिळणार आहे. आत्याधुनिक मॅमोग्राफी व अल्ट्रा सोनोग्राफी मशीन्स लवकरच रुग्णसेवेत रुजू होत आहेत.

रुग्णांवरील शस्त्रक्रियांसाठी उच्च तंत्रज्ञानयुक्त अत्याधुनिक व सर्व सोयीसुविधा युक्त मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स कॉम्प्लेक्स शस्त्रक्रियेनंतर होणारा जंतुसंसर्गाचा धोका नाहीसा होणार आहे.

# नृसिंहवाडीत सुट्टीमुळे भाविकांची मोठी गर्दी

नृसिंहवाडी,ता.२६(वार्ताहर)-

**दीपावली सण संपला असून नृसिंहवाडी येथे सुट्टी निमित्ताने येणाऱ्या पर्यटकांची गर्दी वाढत आहे. येथील मंदिर परिसर मोबाईल सेल्फी ग्रुप फोटोचा स्पॉट बनत चालला आहे. येथील दत्त मंदिर चोहोबाजूने उघडे असून मंदिरासमोर वाहणारी कृष्णा नदी तसेच येथील संगम घाटाचा नजारा भाविकांना आकर्षित करताना दिसत आहे. दीपावली पाडवा तसेच सुट्टीच्या निमित्ताने असंख्य भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यामुळे संपूर्ण पार्किंग व्यवस्था कोलमडून गेली होती.**

अनेक भक्त पर्यटकांनी येथील मंदिरासमोरील कृष्णा नदीत स्नान करण्याचा आनंद लुटला. मोबाईलवर सेल्फी फोटो काढत असताना नदीच्या पाण्याचा अंदाज येत नाही. यामुळे पाण्यात बुडण्याचा धोका निर्माण होत आहे. येथील नदी काठावर असलेले सुरक्षा रक्षक डोळ्यात तेल घालून नजर ठेवत असताना या सेल्फी घेणाऱ्या पर्यटकांना अटकाव केला तर वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत.

सोशल मीडियावर येणारे या क्षेत्राचे व्हिडिओ व भक्त परिवाराला येणारी या क्षेत्राची अनुभुती या कारणाने येथे गर्दी वाढत आहे. येथील पुजारी मंडळींकडून होणारी भोजन व्यवस्था, येथील बासुंदी व कृष्णा काठची वांगी, कवठाची बर्फी प्रसिध्द आहे.

भाविक मोठ्याप्रमाणात याची खरेदी करतात. पोर्णिमा व सुट्टीच्या दिवशी येथे नित्य नियमाने अनेक भक्त दर्शनासाठी येतात. यामुळे मोठी गर्दी झाली होती. परिणामी वाहन पार्किंगची समस्या निर्माण होताना दिसत होती.

दरम्यान, पुढील आठवड्यात तुळशी विवाह आहे. यानंतरही येथे भक्त विवाह सोहळा, उपनयन सोहळा निमित्त येतात. नदीमध्ये स्नान करताना तसेच नदीकाठ परिसरात मोबाईलवर फोटो काढत असताना एखादी दुर्घटना घडू शकते. तेव्हा मंदिर परिसर हा सेल्फी पॉईंट बनू नये यासाठी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# संताजी घोरपडे कारखाना विनाकपात ३४०० दर देणार : मंत्री हसन मुश्रीफ

## १२ वा गळीत हंगाम शुभारंभ; ८ लाख टन गाळपाचे उद्दीष्ट

से. कापशी, ता.२६ (वार्ताहर)-

**सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना उचल प्रतिटनाला विनाकपात ३४०० रुपये देणार असल्याची घोषणा मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली. साखर कारखान्याच्या बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ झाला. या हंगामात आठ लाख टन ऊस गाळपाचा संकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले.**

बेलेवाडी काळम्मा (ता.कागल) येथे सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याच्या बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ ऊसमोळी टाकून वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, गोकुळचे माजी अध्यक्ष रणजितसिंह पाटील, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, कारखान्याचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ आदींच्या हस्ते झाला.

यावेळी मंत्री. मुश्रीफ म्हणाले, घटतच चाललेले एकरी ऊस उत्पादन ही चिंतेची बाब आहे. आम्ही कारखान्याची विस्तारवाढ करणार आहोत. परंतु; ऊस कुठून आणणार, असा सवाल करतानाच ते पुढे म्हणाले, कमीत कमी दिवसात जास्तीत जास्त गाळप करणे हाच एकमेव पर्याय आहे. साखर कारखानदारी प्रतिकूल परिस्थितीतून जात आहे असे सांगताना ते म्हणाले, एफआरपी वाढते परंतु; साखरदर वाढत नाही.

गळीत हंगाम अवघे १०० दिवस चालतो हे साखर कारखान्यांना परवडणारे नाही. कामगारांच्या बहुतांशी मागण्या पूर्ण केल्या असल्याचे सांगून मुश्रीफ म्हणाले, त्रिपक्षीय करारानुसार दहा टक्के पगारवाढही लागू करणार आहोत.



**सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याच्या बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ करताना मंत्री हसन मुश्रीफ, रणजीत पाटील, भैय्या माने, नविद मुश्रीफ व इतर मान्यवर.**

केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने म्हणाले, सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याची उभारणी सभासद शेतकऱ्यांच्या जिद्द आणि संघर्षातून झालेली आहे. या कारखान्याने चांगला दर,रोजगार,नावलौकिक वेगळेपण आणि नाविन्यता जपलेली आहे.

कारखान्याचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ म्हणाले, या हंगामात आठ लाख टन गाळप, अडीच कोटी लिटर्स इथेनॉल उत्पादन आणि आठ कोटी युनिट्स वीज निर्मिती ही उद्दिष्टे आहेत.

शेतकऱ्यांनी पिकविलेला सर्वच्या सर्व गाळपासाठी कारखान्याकडे पाठवून सहकार्य करावे.

यावेळी व्यासपीठावर गोकुळचे माजी अध्यक्ष रणजिसिंह पाटील, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने, गोकुळचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ, वसंतराव धुरे, सतीश पाटील- गिजवणेकर, सूर्यकांत पाटील, शशिकांत खोत, दिनकरराव कोतेकर, विकास पाटील, बाळासाहेब तुरंबे, पै. रवींद्र पाटील, आर. व्ही. पाटील, शामराव पाटील, संजय चितारी, मारूतराव घोरपडे, रणजीत सूर्यवंशी, मयूर आवळेकर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक जनरल मॅनेजर संजय शामराव घाटगे यांनी केले. सूत्रसंचालन विशाल बेलवळेकर यांनी केले. आभार संतोष मोरबाळे यांनी मानले.

# शेतकऱ्याची आठ लाखाची फसवणूक : दोघांवर गुन्हा

सांगली, ता.२६(प्रतिनिधी)-

**गळीत हंगामाकरिता ऊसतोडणी मजूर पुरविण्याची हमी देवून मिरज तालुक्यातील समडोळी येथील शेतकऱ्याची ८ लाख ४० हजार रुपयांना फसवणूक करण्यात आली आहे. शेतकऱ्याकडून एकूण १७ लाख रुपये उकळून त्यापैकी ८ लाख ६० हजार रुपयांची रक्कमेची परतफेड करुन उरलेली रक्कम परत देण्यास नकार देणाऱ्या दोघांवर सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये अंकुश मधुकर गेजगे (वय ३५), दिलीप मधुकर गेजगे (२५) या संशयितांचा समावेश आहे.**

मिरज तालुक्यातील समडोळी येथील भाऊसो लक्ष्मण देसाई यांना उसतोडीकरीता मजूरांची गरज होती. ही माहिती संशयित अंकुश आणि दिलीप गेजगे यांना मिळाली. दोघांनी भाऊसो देसाई यांच्याशी परिचय वाढवून विश्वास संपादन केला. यानंतर त्यांना मजूर पुरविण्याचे आश्वासन दिले.

सन २०२४-२५ या गळीत हंगामाकरिता १९ एप्रिल २०२५ पासून वेळोवेळी बँकेच्या माध्यमातून तसेच रोखीचे ११ लाख ७५ हजार रुपये दिले. १२ जून रोजी या संदर्भात नोटरी करण्यात आली. यानंतर व्यवहारापोटी फिर्यादी भाऊसो देसाई यांनी संशयित गेजगे बंधूंना ५ लाख २५ हजार रुपये वेळोवेळी बँकेच्या माध्यमातून दिले. त्यानंतर संशयितांनी भाऊसो देसाई यांच्याकडे काम करुन त्यातील ८ लाख ६० हजार रुपयांची परतफेड केली.

# इचलकरंजीत जुगार अड्ड्यावर धाड; बाराजणांवर कारवाई

## साडेपाच लाखाचा मुद्देमाल जप्त

इचलकरंजी,ता.२६-

**सांगली रोडवरील पाटील मळ्यात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने धाड टाकली. यामध्ये बाराजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत रोख एक लाख,एक हजार रकमेसह चार लाख ५५ हजाराचे दहा किंमती मोबाईल आणि जुगार साहित्य असा एकूण ५ लाख ५६ हजार ६०० रूपयांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.**

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी कि, पाटील मळ्यात बेकायदेशीर जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने धाड टाकली. याप्रसंगी इम्तियाज इक्बाल खतीब (रा.हेर्ले), कौस्तुभ किरण हजारे (रा.तारदाळ), गणेश संजय झुंजकर (रा.विक्रमनगर, शहापूर), संजय अंतू सावंत (रा.विक्रमनगर, कोल्हापुर), लियाकत इब्राहिम शेख (रा.आळते), चाँद मेहबूब जमादार (रा.आभारफाटा, रूई), चेतन विजय कोईक (रा.रिक्रेशन हॉलजवळ, इचलकरंजी), संजय परशुराम कांबळे (रा.कोरोची), गणेश लक्ष्मण पसारे (रा.जाधववाडी-कोल्हापूर) यांचेसह अन्य दोघे अशा बाराजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**हातकणंगले नगरपंचायत, हातकणंगले**

**जाहिर फेर ई - निविदा सूचना क्र.०६/२०२५-२६**
**बांधकाम, पाणी पुरवठा व विद्युत विभाग**

मुख्याधिकारी, हातकणंगले नगरपंचायत हातकणंगले जि.कोल्हापूर हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे सन २०२४-२५ अंतर्गत ब - १ कामे करुन देणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत अनुभवी मक्तेदार यांचेकडून नगरपंचायत अंतर्गत रस्ते, गटर्स, विंधन विहीर व हायमास्ट करणे इ. अनुषंगिक विकास कामांची जाहिर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरची ई निविदा व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- २७-१०-२०२५ रोजी दुपारी २.०० वाजलेपासून ते दिनांक- ०४-११-२०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल व निविदा सादर करणेची अंतिम मुदत दिनांक ०४-११-२०२५ सायं. ६.०० वाजेपर्यंत असेल. सदर ई - निविदा उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करता येईल.

सही /-
**(वि.वि.पाटील)**
मुख्याधिकारी,
हातकणंगले नगरपंचायत, हातकणंगले

**राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लि., राजारामनगर**
**ता. वाळवा, जि. सांगली**
ISO:9001:2015
फोन : ०२३४२-२२०८६१ ९९७०९००१०१ ते १०३ व ९९७०९००११०

**बगॅस विक्री टेंडर नोटीस**

गळीत हंगाम २०२५-२०२६ मधील उत्पादीत बगॅस खालील तपशिलाप्रमाणे विक्री करणेचा असून बगॅस विक्री टेंडर फॉर्म साखराळे युनिटच्या स्टोअर विभागाकडून टेंडर फॉर्म फी रु.५००/- व टेंडर डिपॉझिट करिता रू. २५०००/- भरून मिळतील. तरी इच्छुक टेंडर धारकांनी दि. २७-१०-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत टेंडर फॉर्म भरून देवून दुपारी २.०० वाजता मिटींगला हजर राहणेचे आहे. टेंडरमध्ये मालाचे मूळ दर द्यावेत. नियमाप्रमाणे असणारे सर्व टॅक्सेस ज्यादा आकारले जातील. ज्यांना टेंडर मंजूर होईल त्यांनी ताबडतोब २५% रक्कम भरणेची आहे. टेंडर स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

| युनिट | तपशिल | मे. टन |
|---|---|---|
| १) कारंदवाडी यु.नं. ३ | १) नवीन बेल्ड बगॅस | अंदाजे ५००० |
| | २) नवीन लुज बगॅस | अंदाजे १००० |

राजारामनगर
दिनांक : २५/१०/२०२५

**आर. डी. माहुली** कार्यकारी संचालक
**विजय बळवंतराव पाटील** व्हा. चेअरमन
**प्रतिक जयंतराव पाटील** चेअरमन

**जाहीर नोटीस**

सर्वांच्या माहितीकरिता नोटीस देण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन :- मेट्रो हायटेक को. ऑप. टेक्सटाईल पार्क लि. मधील इंडस्ट्रीयल प्लॉट नं. टी ७ (पार्ट) या फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी मधील कसबा सांगाव, ता. कागल येथील औद्योगिक प्लॉट नं. १६३ क्षेत्र ३७१२८.६० चौ. फूट, प्लॉट नं. १६४ क्षेत्र ३३९१६ चौ. फूट व त्यामधील २१,१४५.३३ चौ. फूट शेड इमारत, प्लॉट नंबर १६५ व १६६ एकुण क्षेत्र ९०२०२.३२ चौ. फुटाची जागा व त्यातील शेड इमारत.

२) वर वर्णन केलेली मिळकती या माझे अशील मेट्रो हायटेक को. ऑप. टेक्सटाईल पार्क लि. यांनी उपभाडेकरू-सबलेसी नात्याने मे. काठमांडू ॲपरल प्रा. लि. यांना सभासद नात्याने मंजूर केलेले असून सदरच्या मिळकती या सौ. मनिषा किरण टेमकर यांच्या लाभातील इक्विटेबल मॉर्गेज व्यतिरिक्त निष्कर्जी व निर्वेध असल्याचे सांगून मे. काठमांडू ॲपरल प्रा. लि. तर्फे संचालक श्री. किरण टेमकर यांनी माझ्या अशिलांना परत हस्तांतरीत (Surrender) करण्याबाबत वाटाघाटी सुरू केलेल्या आहेत.

३) सबब वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणतेही बँकेचा अथवा अन्य वित्तीय संस्थेचा अथवा अन्य व्यक्तीचा अगर संस्थेचा तारण गहाण, वहिवाट, खरेदीकरार अथवा अन्य करार व तत्सम कोणताही कायदेशीर हक्क संबंध असल्यास ही नोटीस पोहोचल्यापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील पत्त्यावर संबंधित कागदपत्रांसह लेखी तक्रार नोंद करावी. अन्यथा सदर मुदतीनंतर सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचे मानुन माझे अशिल पुढील परत हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस.ता. २५/१०/२०२५

**ॲड. ए.टी.तांबे**
११ / २०६, स्टेशन रोड, इचलकरंजी.मो. ९४२२०४४७४७.

# अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## पावसाचा भात, भाजीपाला, सोयाबीनसह फळपिकांवर गंभीर परिणाम

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून भात, भाजीपाला, सोयाबीन आणि फळपिकांवर याचा गंभीर परिणाम झाला आहे.**



जिल्ह्याच्या पूर्वभागातील बहुंताशी तालुक्यात सद्या भात, भुईमुगाच्या शेंगा तसेच सोयाबीन काढणीचा हंगाम चालू असल्याने अचानकपणे आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पिकांच्या हानीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे.गेल्या मे महिन्याच्या मध्यापासून सुरु झालेला पाऊस अद्याप थांबायचे नांव घेईना झाला आहे. पावसाळ्यात किमान चार ते पाच वेळा पूरस्थिती निर्माण झाली होती. सततच्या संततधार पावसामुळे पिकांच्या वाढीवर मोठा परिणाम झाल्याचे मत अनेक शेतकरी व्यक्त करीत आहेत.ऑक्टोबरप्रारंभी काही काळ पावसाने उघडीप घेतल्याने पिकांची चांगली वाढ झाली व काही पिके काढणीला आली.सध्या भात व शेंगा काढणीचा हंगाम जोमात असताना अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे.अचानक आलेल्या पावसामुळे भात शेतातच झडू लागले आहे तर भुईमुगाच्या शेंगांना वारंवारच्या पावसामुळे शेतातच कोंब येऊ लागले आहेत. मुळात ग्रामीण भागात शेतीकामासाठी मजुर मिळत नाहीत,ही वस्तुस्थिती असून आता शेतीकामे घरच्या माणसांनाच करावी लागत आहेत, त्यातच निसर्गाचा असा फटका बसल्याने शेतकरी पुरता हैराण झाला आहे.

सततच्या मुसळधार पावसामुळे पिके झोडपली गेली असून भाताबरोबरच फुलकोबी, कोबी, मिरची, वांगी यांसारख्या भाजीपाला पिकांचेही मोठे नुकसान होऊ लागले आहे.वांगी,मिरची, टोमॅटो यांसारख्या पिकांमध्ये सड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतात पाणी साचल्यामुळे पुढील पेरणीस अडथळा निर्माण झाला आहे. दिवाळीच्या काळात विक्रीसाठी आणलेला शेतमाल भिजल्यामुळे आर्थिक नुकसान आणि सणाच्या आनंदावरही पाणी पडले आहे. ही परिस्थिती शेतकऱ्यांसाठी अत्यंत चिंताजनक आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तविल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.जिल्ह्याच्या पश्चिम भागातील शाहूवाडी, पन्हाळा, गगनबावडा अशा डोंगराळ व दुर्गम पट्ट्यात भातशेती हे मुख्य पीक आहे.अगोदरच वन्य प्राण्यांचा त्रास, वन्य प्राण्यांकडून नुकसानीचा सामना दररोज शेतकऱ्यांना करावा लागत आहे. वन्यप्राण्याच्या तोंडून काही शिल्लक राहिलेले पीक पदरात पडेल, अशी अपेक्षा असताना पुन्हा पावसामुळे जंगलातील प्राणी शेतात शिरले आणि पिकांचे नुकसान केले. स्थानिक शेतकऱ्यांनी वन विभागाकडे नुकसान झालेल्या शेतीपीकांच्या भरपाईची मागणी होऊ लागली आहे.

**आर्थिक नुकसान आणि मदतीची अपेक्षा**

शेतकऱ्यांना सरकारकडून नुकसान भरपाईची अपेक्षा आहे.परतीच्या पावसाचा धुमाकूळ असल्यामुळे आणि त्यामध्येच निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर मदत मिळेल का, याबाबत शेतकऱ्यांकडून शंका व्यक्त होऊ लागली आहे. पिकांच्या काढणीपासून ते चांगल्या पध्दतीने वाळवून घरापर्यंत घेवून जाणे या संपूर्ण प्रक्रियेमध्ये परतीच्या पावसाने अडथळा निर्माण होत आहे. शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अत्यंत कठीण आहे. स्थानिक प्रशासन आणि कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून मदतीसाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. शासकीय हालचाली वेगाने घडाव्यात हीच माफक अपेक्षा सध्या शेतकरी करत आहेत.

> परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे.हातातोंडाशी आलेले पीक वाया जात आहे, हे बघून वाईट वाटते. शासनही शेतकऱ्यांची फारशी दखल घेत नाही, अशी खंत शाहुवाडी तालुक्यातील शिंपे गावचे शेतकरी माणिकराज पाटील यांनी व्यक्त केली आहे.



## डांगेंच्या कार्याची दखल जनता नक्कीच घेईल-आम.आवाडे

कुरुंदवाड,ता.२६(प्रतिनिधी)-

**नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे यांनी शहराच्या विकासासाठी नेहमीच योगदान दिलेले आहेत त्यांच्याबरोबर मुलगा उदय डांगे,सून मनीषा डांगे देखील त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत.त्यांच्या कार्याची दखल शहरातील जनता नक्कीच घेतील यात शंका नाही,असे उद्‌गार आम.डॉ.राहुल आवाडे यांनी बोलताना व्यक्त केले.**

येथील काळाराम मंदिर चौकात रामचंद्र डांगे, मनीषा डांगे, उदय डांगे कुटुंबीयांच्यावतीने दिवाळी सणानिमित्त शहरवासियांना व नेते मंडळींना फराळाचे वाटपाचे निमंत्रण दिले होते .यावेळी आम.राहुल आवाडे बोलत होते. या फराळ वाटपासाठी माजी आम.सदाभाऊ खोत,माजी आम.प्रकाश आवाडे,संजय पाटील-यड्रावकर,गुरुदत्त शुगरचे माधवराव घाटगे,चंद्रकांत मोरे, मुकुंद गावडे,रमा फाटक अनिल सावकर,माद नाईक त्याचबरोबर शहरातील माजी नगराध्यक्ष,नगरसेवक, रमेश बुजुगडे,चंद्रकांत मोरे,दीपक गायकवाड,अजित देसाई यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



दिंडी प्रस्थानचे पूजन प्रसंगी संजय तेलनाडे, संतोष पाटील, दत्तोपंत जोशी व इतर प्रमुख मान्यवर.

## श्री महादेव मंदिर कार्तिक वारी पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

इचलकरंजी,ता.२६-

**इचलकरंजीचे येथील ग्रामदैवत महादेव मंदिर कार्तिक वारी दिंडी गावभाग श्री महादेव मंदिर येथून ता.२५ ऑक्टोंबर रोजी पंढरपूरकडे कार्तिक वारी करीता सकाळी रवाना झाली. यावेळी बऱ्याच वारकऱ्यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला.**

गेली ११ वर्षे भाविकांकरीता विनाशुल्क कार्तिक वारी पायी दिंडीचे आयोजन केले जाते. सदर दिंडी प्रस्थानचे पूजन माजी नगरसेवक संजय तेलनाडे,इचलकरंजी केमिस्ट असोसिएशन अध्यक्ष संतोष पाटील, दत्तोपंत जोशी, महेश जोशी,बाळासाहेब कलागते, प्रमोद बचाटे, शितल चौगुले, सचिन माळी,बाबासाहेब पाटील, किशोर पाटील या मान्यवरांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी बाळमहाराज तारदाळकर, सुधाकर गुरव, दिपक कमते, शितल सावर्डे, मधु गुरव,राजू सांदुगडे असे अनेक वारकरी उपस्थित होते.

## टेक्स्टाईल प्रोसेसिंग व्यवसायातील कामगारांना बोनस वाटप

इचलकरंजी,ता.२६-

**टेक्स्टाईल प्रोसेसिंग व्यवसाय आज मंदीच्या तडाख्यात आणि स्पर्धेच्या वातावरणात जात असताना कामगारांशी असलेले औद्योगिक संबंध हे शांततेचे आणि सौख्याचे असणे गरजेचे आहे. अशा औद्योगिक वातावरणामुळे उत्पादन वाढीला मिळणारे सहकार्य हे खऱ्या अर्थाने व्यवसायास पूरक असते आणि म्हणूनच कामगार वर्गाचा यंदाचा बोनस हा आम्ही २० टक्के इतका जाहीर करत आहोत अशा तऱ्हेचे विचार दि लक्ष्मी को-ऑप. प्रोसेसर्सचे चेअरमन मुकूंदराव फाटक यांनी दि लक्ष्मी को- ऑप. प्रोसेसर्स आणि राष्ट्रीय प्रोसेसिंग कामगार संघटना (इंटक) यांचा बोनस करार करताना काढले.**

सर्वात प्रथम स्वदेशी प्रोसेसर्स या संस्थेचा बोनस श्रीनिवासशेठ बोहरा यांनी सुमारे १५.५१ टक्के इतका जाहीर केला. स्वदेशीची सर्वात प्रथम बोनस देण्याची परंपरा त्यांनी कायम टिकवली. याबरोबरच अजित डाके यांनी रघुनंदन प्रोसेसचा बोनस १४.५ टक्के इतका जाहीर केला तर अमित विव्हींग मिल्स या संस्थेचा बोनस गिरीराज मोहता यांनी १२.५ टक्के इतका जाहीर केला. याबरोबरच अरविंद कॉटसिन म्हणजेच लक्ष्मीकांतशेठ मर्दा यांनी ८.५ टक्के इतका यंदाचा बोनस दिला तर राधामोहन प्रोसेसर्सचे विजय मेटे यांनी २० टक्के इतका बोनस दिला. निरनिराळ्या ठिकाणच्या चर्चा करणी प्रोसेस, मर्दा प्रोसेस, महेश प्रोसेस, युनिरोज टेक्स्टाईल्स म्हणजेच शहाजहान शिरगांवे, महेश मर्दा, हेमंतशेठ डोडीया आदी मंडळींनी बोनस दिले.याबरोबरच छोट्या अशा जवळजवळ २५ प्रोसेस आहेत. त्या ठिकाणी ८.३३ टक्के बोनसची प्रथा ही कायम राखली गेली.यामध्ये समाधानकारक बोनस सर्वेश्वर प्रोसेस, पपूशेठ राठी,गोपाळशेठ जोशी, शाम झंवर,शेखर कस्तुरे, संजय कुलकर्णी,सुभाष जोशी आदी प्रोसेसच्या मालकांनी दिवाळीपुर्वी सर्व कामगाराना बोनसचे वाटप केले.ही दिवाळी चांगली होण्याच्या दृष्टीने संघटनेचे नेते शामराव कुलकर्णी, शिवाजीराव भोसले, प्रदिप साहू, जयकुमार कांबळे आदींनी पूर्ण सहकार्य केले.

## शिकारमुक्त कोल्हापूर अभियानासाठी संपर्क साधावा

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)

**शिकारमुक्त कोल्हापूर अभियान राबवण्यासाठी आपल्या परिसरात अवैध शिकार होत असल्यास तसेच जंगल क्षेत्रात आग लावून वनसंपदेचे नुकसान करणे, वनक्षेत्रात विना परवाना अतिक्रमण करणे, मानव व वन्यजीव संघर्ष अशा बाबी निदर्शनास आल्यास वनविभागाच्या १९२६ या टोल फ्री क्रमांकावर अथवा नजीकच्या वनक्षेत्र कार्यालयाशी संपर्क साधावा.**

माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल तसेच योग्य तो सन्मान व बक्षीस देण्यात येईल,असे आवाहन उप वनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी जाहीर केले.

# पडसाळी लघू पाटबंधारे तलावाच्या सांडवा भिंतीला भगदाड

## पाटबंधारे खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष

बाजारभोगाव,ता.२६(प्रतिनिधी)-

**पन्हाळा तालुक्याच्या पश्चिम टोकावर वसलेला पडसाळी लघुपाटबंधारे तलाव म्हणजे जांभळी खोऱ्याचं जलहृदयच मानले जाते. हिरव्या शेतांची आस, शेतकऱ्यांच्या कष्टांची साथ आणि निसर्गाशी जुळलेलं एक अतूट नातं हे सर्व या तलावाभोवती गुंफलेलं आहे.**



पडसाळी तलावाच्या सांडवा भिंतीतून दगड पडत असल्याने धोका निर्माण झाला असल्याचे दिसत आहे.

उन्हाळ्याच्या तप्त दिवसातही परिसरातील शेतं हिरवीगार ठेवणारा आणि पिण्याच्या पाण्याची गरज भागवणारा हा तलाव जांभळी खोऱ्याचा खरा 'जीवनदायी श्वास' आहे. पण आज याच तलावाच्या सांडवा भिंतीला गंभीर भगदाड पडल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता पसरली आहे.तलावाच्या सांडव्याचे बांधकाम गेल्या काही वर्षांत खिळखिळे झाले आहे.दगडी बांधकामातील दगड निसटून भिंतीचा पाया कमकुवत झाला आहे. काही ठिकाणी मोठी भगदाडे पडल्याने पाण्याचा प्रवाह चुकीच्या दिशेने वाहू लागला आहे. ही स्थिती लक्षात घेतली नाही, तर पावसाळ्यात वाढलेल्या पाण्याच्या दाबामुळे सांडव्याचा भाग कोसळण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सन २०१९ मध्ये तब्बल वीस लाख रुपये खर्चून सांडवा दुरुस्तीचे काम पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले होते. मात्र, अवघ्या काही वर्षांतच पुन्हा भिंत खचू लागल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. 'दुरुस्तीचे काम जर नीट झाले असते तर आज सांडवा इतक्या लवकर धोकादायक स्थितीत पोहोचला नसता,' असा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. तलाव जून १९९७ मध्ये पूर्ण झाला असून, गेल्या दोन दशकांपासून जांभळी खोऱ्याला पाणीपुरवठा आणि सिंचनाची सोय या तलावामधून केली जाते. परिसरातील शेती, फळबागा आणि जनावरांची तहान भागवणारा हा तलाव ग्रामस्थांसाठी वरदान ठरला आहे.त्यामुळेच सांडव्यातील भगदाड ही केवळ दगडी भिंतीतील झीज नाही, तर लोकांच्या आशा आणि परिश्रमावर उठलेली एक भेग आहे.जर तातडीने दुरुस्ती केली नाही तर येत्या पावसाळ्यात मोठा अनर्थ होऊ शकतो, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.पाटबंधारे खात्याने या भागाची पाहणी करून तातडीने दुरुस्तीची कार्यवाही सुरू करावी, अन्यथा संपूर्ण जांभळी खोऱ्याची जलव्यवस्था धोक्यात येईल.

> सांडव्याचा भाग कोसळण्याची भीती

# जि.प.,पं स.निवडणूक कौलवकर गट ताकदीने लढणार

## धैर्यशील पाटील

भोगावती,ता.२६(प्रतिनिधी)-

**कौलव (ता.राधानगरी) येथे भोगावती साखर कारखान्याचे माजी चेअरमन धैर्यशील पाटील - कौलवकर यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत दादासाहेब पाटील (कौलवकर) गट ताकदीने लढणार असल्याचे प्रतिपादन केले.**



कौलव कै.दादासाहेब पाटील-कौलवकर गटाच्या मेळाव्याप्रसंगी बोलताना धैर्यशील पाटील-कौलवकर,प्रा.किसन चौगले व इतर.

कै. दादासाहेबांचे विचार घेऊन हा गट निवडणुकीला सामोरे जाणार आहे.कौलव येथे दादासाहेब पाटील-कौलवकर गटाचा मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी गोकुळचे संचालक प्रा. किसन चौगले होते.

प्रा. किसन चौगले यांनी यावेळी बोलताना सांगितले की, कै. दादासाहेब पाटील यांची विचारधारा घेऊन समविचारी गटाशी आघाडी करून ही निवडणूक लढवण्यात येईल.कार्यकर्त्यांचा आग्रह आणि गटाच्या अस्तित्वासाठी निवडणूक लढणे गरजेचेअसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मेळाव्यामध्ये प्रा. निवास पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले.विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. या मेळाव्यात प्रा.किसन चौगले,संजयसिंह कलिकते, डॉ.सुभाष पाटील, प्रा. निवास पाटील,सातापा पाटील, शहाजी कवडे,निवास पाटील, भगवान देवकर,शंकर बाबाजी पाटील,विश्वास पाटील,शहाजी पाटील,वसंत पाटील,सुजित पाटील, पप्पू कुलकर्णी,संजय डोंगळे, युवराज पाटील,तानाजी पाटील,भिकाजी चौगले,के.डी.भाटले,एस.एन.पाटील, अशोक भोपळे, सर्जेराव पाटील, धनाजी पाटील ,सुनील पाटील आदी उपस्थित होते.

## इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारी मागणीचे अर्ज दाखल करावेत-पाटील

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)

**आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी कोल्हापूर पश्चिम विभागातील ज्या इच्छुक उमेदवारांना पक्षाकडून उमेदवारी करायची आहे अशा इच्छुक उमेदवारांनी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालयाकडे विहित नमुन्यामध्ये अर्ज दाखल करावा, असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांनी केले आहे .**

या इच्छुक उमेदवारांची जिल्हा परिषद व पंचायत समिती निहाय माहिती संकलित करण्यासाठी भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस शिवाजी बुवा यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून या समितीमध्ये सरचिटणीस मेजर भिकाजी जाधव,डॉ.आनंद गुरव व अनिल देसाई यांचा समावेश करण्यात आला आहे .


श्रीहरी
शुक्रवार, ता.२४/१०/२०२५ पासून दुपारी १.०० वा.
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
थोडा थोडा प्यार
प्रौढांसाठी
सायं.४ व ७ वा.
बेहाल दिल
A A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २४ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमॅंटीक इंग्रजी चित्रपट
डिसीप्लॅन
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्र. २४ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज १ खेळ *१२ वा.
रोज ३ खेळ *३*६*९ वा.









५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
गर्दीचा ४ था आठवडा
आता पहा नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम मध्ये
रोज ४ खेळ *१२ *३ *६*९ वा.






कल्पना DOLBY DIGITAL QUBE CINEMA NETWORK
शनिवार ता. २५ पासून लेजर प्रोजेक्टरसहीत
आमच्या असंख्य सिनेरसिकांना दिपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा
रोज २ खेळ १२ * ३
रोज २ खेळ ६ * ९









गुरु
मंगळवार ता.२१ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व ९.३० वा.
दिवाळीचे बहुचर्चित जबरदस्त आकर्षण






रात्री भेडीया- मुंज्याच्या निर्मात्यांची सुपरहिट्ट भेट

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow






"थामा " (हिंदी )
11:00 AM, 01:00 PM
04:00 PM, 07:45 PM
10:15 PM
"कांतारा: चॅप्टर 1 " (हिंदी )
09:15 AM, 12:30 PM
02:00 PM, 03:30 PM
06:30 PM, 09:30 PM
10:30 PM
"एक दिवाने की दिवानियत" (हिंदी)
10:15 AM, 05:00 PM
07:15 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11






थामा (HIN) (U/A)
10.15am, 01.30, 04.30
07.30, 10.30pm
कांतारा २ (HIN) (U/A)
10.15am, 01.00, 04.15,
07.30, 10.40pm
एक दिवाने की दिवानियत (HIN) (A)
04.00, 10.00pm
प्रेमाची गोष्ट २ (MAR) (U/A)
01.00pm
कांतारा २ (KANNAD) (U/A)
06.45pm
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# केंद्राने साखरेच्या विक्री दरात वाढ करावी

## मानसिंगराव नाईक;विश्वास कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

शिराळा,ता.२६(प्रतिनिधी)-

**केंद्र शासनाने साखरेची कमीत कमी विक्री किंमत ४ हजार ३०० रुपये क्विंटल करणे गरजेची आहे तरच साखर कारखानदारी टिकेल, असे प्रतिपादन 'विश्वास'चे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी केले. यावर्षी सात लाख टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवून नियोजन केले आहे, असेही ते म्हणाले.**



विश्वासराव नाईक कारखान्याच्या गव्हाणीत उसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा प्रारंभ करताना पीर पारसनाथ महाराज, मानसिंगराव नाईक व संचालक मंडळ.

चिखली (ता.शिराळा) येथील विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखान्यात सन २०२५-२६ च्या गळीत हंगामाचा प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिराळा येथील महायोगी गोरक्षनाथ मठाचे मठाधिपती पीर पारसनाथ महाराज उपस्थित होते. अध्यक्ष श्री. मानसिंगभाऊ म्हणाले, केंद्र शासनाने सातत्याने उसाच्या किमान खरेदी दरात सतत वाढ केली आहे. त्या तुलनेत साखरेची किमान विक्री किंमत वाढ केलेली नाही. त्यामुळे उसाची किमान खरेदी किंमत, तोडणी व वाहतूक, साखर तयार करण्याचा प्रक्रिया खर्च पाहता साखरेचा विक्री दराचा मेळ बसत नाही. त्यासाठी साखरेचा किमान विक्रीचा दर चार हजार तीनशे रुपये करणे गरजेचे आहे, तरच साखर कारखानदारी टिकणार आहे.

ते पुढे म्हणाले, ऊस पिकाला साखर उतारा मिळण्यासाठी थंडी (हिवाळा) आवश्यक असतो. मात्र आजअखेर हिवाळ्याचा मागमूस नाही. 'विश्वास'ची आर्थिक स्थिती उत्तम असल्याने आम्ही शेतकऱ्यांचे हित डोळ्यापुढे ठेवून उसाची आधारभूत किमतीपेक्षा (एफ. आर. पी) जास्तीचा म्हणजेच ३ हजार २७५ रुपये दर दिला आहे. या गळीत हंगामात सात लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवून नियोजन केले आहे. नोंदीप्रमाणे तोडी देण्यात येतील. शिराळा व शाहूवाडी तालुक्यातील सभासद, ऊस उत्पादकांनी पिकवलेला सर्व ऊस कारखान्याकडे गाळपास पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी कार्यकारी संचालक अमोल पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. पीर पारसनाथ यांच्या हस्ते विधिवत वजन काटा पूजन करण्यात आले. त्यांच्यासह अध्यक्ष, संचालकांच्या उपस्थितीत गव्हाणीत उसाची मोळी टाकून सन २०२५-२६ च्या गळीत हंगामाचा प्रारंभ केला. यावेळी संचालक विराज नाईक, दिनकरराव पाटील, हंबीरराव पाटील, सुरेश चव्हाण, बाबासो पाटील, बाळासाहेब पाटील, संभाजी पाटील, सुरेश पाटील, शिवाजी पाटील, बिरुदेव आमरे, सुहास घोडे-पाटील, संदीप तडाखे, सुकुमार पाटील, तुकाराम पाटील, आनंदराव पाटील, यशवंत दळवी यांचेसह कोंडिबा चौगुले, कामगार संचालक दत्तात्रय पाटील, कामगार संघटनेचे अध्यक्ष टी. एम. साळुंखे, उपाध्यक्ष विजय पाटील, सरचिटणीस विजय देशमुख, खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते. कारखाना व्यवस्थापक दीपक पाटील यांनी आभार मानले.


कुंडल; क्रांती कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ करताना शरद लाड,आम. अरुण लाड यांसह प्रमुख मान्यवर.

# उच्चांकी दर देण्याची परंपरा कायम राखू-लाड

## क्रांती कारखान्याच्या गळीत हंगामाचा प्रारंभ

कुंडल,ता.२६(वार्ताहर)-

**क्रांती साखर कारखान्याने यंदा १२ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून, शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी भाव देण्याची परंपरा क्रांतीकडून कायम राखली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस क्रांतीस पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड यांनी केले.**

कुंडल (ता.पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याचा २४ वा गळीत हंगाम सुरू झाला. यावेळी संग्राम पाटील, ॲड. कुलदीप पाटील, आमदार अरुण लाड व शरद लाड यांच्या हस्ते हंगामाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी सुरेश दत्तू शिंदे व सौ. शारदा शिंदे यांच्या हस्ते विधिवत पूजन झाले. याप्रसंगी कारखान्याचे आजी-माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचेसह शेतकरी, सभासद उपस्थित होते. शरद लाड म्हणाले, कारखान्यामध्ये आधुनिकीकरणाचे काम सुरु असते. शिवाय गाळप क्षमता देखील वाढली आहे. कृत्रिम बुद्धीमतेच्या वापराने एकरी उत्पादन क्षमता वाढली आहे. बाहेरील जिल्ह्यात किंवा कर्नाटक राज्यात ऊस पाठवणाऱ्या शेतकऱ्यांनी यावेळी आपल्या सुख-दुःखात सहभागी असणाऱ्या,वेळेत ऊसतोडणी करून चांगला दर देणाऱ्या जिल्ह्यातील साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करावा. शेतकरी, अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्यानेच जिल्ह्यातील एक नामवंत असा आपला साखर कारखाना राज्य व देशपातळीवरील अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आला आहे. यापुढेही अशीच घोडदौड सुरु ठेवण्यासाठी एकजुटीने कार्यरत रहा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक कार्यकारी संचालक अप्पासाहेब कोरे यांनी तर शेवटी आभार संचालक जयप्रकाश साळुंखे यांनी मानले. सूत्रसंचालन पवन चव्हाण यांनी केले.

# राष्ट्रवादी अ.प.गट वगळता महायुती एकदिलाने लढणार

## आष्टा येथे स्थानिक नेत्यांच्या बैठकीत निर्णय

आष्टा,ता.२६(प्रतिनिधी)-

**आष्टा नगरपालिकेच्या होणाऱ्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आष्टा शहरातील महायुती व महाविकास आघाडीतील विविध पक्षाच्या प्रमुख स्थानिक पदाधिकाऱ्यांनी-कार्यकर्त्यांनी एकत्रित येत विकास आघाडीची मोट बांधली आहे.**

यामध्ये महायुतीतील भाजपा, एकनाथ शिंदे शिवसेना, रयत क्रांती, मनसे हे पक्ष असून यामध्ये महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उबाठा यांनीही सक्रिय सहभाग दर्शविला आहे. यामुळे आष्टा पालिकेची होणारी निवडणूक ही सत्ताधारी राष्ट्रवादी विरुद्ध अ. प. राष्ट्रवादी विरुद्ध महायुती आघाडी अशी तिरंगी होण्याची चिन्हे आहेत. आष्टा नगरपालिकेच्या होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर


आष्टा येथे पालिका निवडणुकीसाठी एकत्र आलेले स्थानिक नेते.

शहरातील विविध पक्षांच्या पदाधिकारी नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत भारतीय जनता पार्टी,शिवसेना शिंदे गट, आरपीआय, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, रयत क्रांती या महायुतीतील पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत नगराध्यक्ष पदासह सर्व जागांवर उमेदवार देण्याचा एकमुखी निर्णय घेतला. या बैठकीत काँग्रेसचे राहुल थोटे, उद्धव ठाकरे शिवसेनेचे पोपट भानुसे हे देखील सहभागी झाले होते. त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी आघाडीला समर्थन दिले. सर्वानुमते महायुतीतील अजित पवार गट वगळता सर्वांनी एकत्रित येत नगराध्यक्ष पदासह सर्व जागा एकत्रित लढण्याचा निर्णय झाला. बैठकीस भाजपाचे मंडलाधिकारी अमोल पडळकर, शिवसेनेचे वाळवा तालुका संघटक माजी नगरसेवक वीर कुदळे, शिवसेना वाळवा तालुका उपप्रमुख दिलीप करणे, आष्टा शहर प्रमुख राकेश आटुगडे, डॉ. नंदकिशोर आटुगडे,मनसेचे राजकुमार सावळवाडे, आरपीआयचे प्रदीप आवळे,रयत क्रांतीचे पांडुरंग बसूगडे, उद्धव ठाकरे सेनेचे पोपट भानुसे, काँग्रेसचे राहुल थोटे यांच्यासह भाजपाचे नरेंद्र घाटगे,विनोद बसुगडे,नगराध्यक्ष पदाचे इच्छुक संग्राम शिंदे, चिमण वाडेकर,श्रीराम ढोले उपस्थित होते.

बैठकीत आष्टा पालिकेची निवडणूक सत्ताधाऱ्यांना तोडीस तोड देण्यासाठी एकदिलाने संघटितपणे आणि ताकदीनिशी लढण्याचा निर्धार झाला. उमेदवारी कोणालाही मिळो सर्वांनी एकजुटीने लढण्याचा निर्णय झाला.

# शिरंबेत किल्ल्यांची प्रतिकृती पाहण्यासाठी गर्दी

कोरेगाव,ता.२६(वार्ताहर)-

**शिरंबे (ता.कोरेगाव) येथे बालगोपाळांसह युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात उभारलेल्या गडकोट किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती उभारल्या आहेत. त्या पाहण्यासाठी कोरेगाव तालुक्यातील इतिहास प्रेमी नागरिकांसह अबालवृद्धांची गेल्या दोन ते तीन दिवसांपासून गर्दी वाढू लागली आहे. यामुळे शिरंबे गावाला आता किल्ल्यांचे गाव म्हणून नव्याने ओळख निर्माण झाली आहे.**

कोरेगाव-रहिमतपूर रस्त्यालगत असलेल्या शिरंबे या गावामध्ये मागील सात वर्षांपासून अजिंक्य नवरात्र व गणेशोत्सव मंडळ, ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण मंडळ,ज्येष्ठ नागरिक, शिक्षक आदींचा पुढाकार व मार्गदर्शनाखाली गडकोट किल्ले


शिरंबे येथे उभारलेल्या किल्ल्यांची पाहणी करताना नागरिक.

उभारण्याच्या परंपरेने मूळ धरले आहे. यंदाही आठव्या वर्षी गावात लहान-मोठे २० ते २५ हुबेहूब व आकर्षक गडकोट किल्ले उभारले जात असून ते पाहण्यासाठी गर्दी वाढू लागली आहे. यंदा पवार ग्रुपने प्रतापगड, श्लोक गायकवाड यांनी प्रतापगड, जिवलग मित्र समूहाने सिंहगड कोंढाणा, सिद्धिविनायक फ्रेंड्स सर्कलने नळदुर्ग, छत्रपती संभाजी महाराज ग्रुपतर्फे आयुष गुरव यांनी पन्हाळगड, चिंतामणी गणेश मंडळाने अजिंक्यतारा, संग्राम गायकवाडने मुरूड जंजिरा, श्रेयस गायकवाड यांनी पन्हाळगड, वेदांत शिंदे यांनी सुवर्णदुर्ग, स्वराज भोसले यांनी प्रतापगड, साईराज भोसले यांनी अजिंक्यतारा,श्लोक भोसले यांनी राजगड, मानसी शेडगे यांनी मुरुड जंजिरा, नवसांस्कृतिक गणेश मंडळ मैत्री ग्रुपने सिंधुदुर्ग, सिद्धिविनायक ग्रुपने रायगड,अजिंक्य नवरात्र व गणेशोत्सव मंडळाने विजयदुर्ग,राजा शिवाजी मित्र मंडळाने मुरुड जंजिरा,श्रेयस भोसले यांनी प्रतापगड,युवराज भोसले यांनी भरतगड,आर्या भोसले यांनी प्रतापगड, शिवतीर्थ प्रतापगड संघाने प्रतापगड किल्ला हुबेहूब उभारला आहे.

दरम्यान, अजिंक्य नवरात्र व गणेशोत्सव मंडळाने शिरंबे गाव मर्यादित आकर्षक किल्ले उभारणी स्पर्धा जाहीर केली असून, विजेत्यांना प्रायोजकांच्या माध्यमातून रोख स्वरूपात बक्षीस सन्मानचिन्ह व सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# महाबळेश्वर येथे राज्यपाल देवव्रत यांचे स्वागत

महाबळेश्वर,ता.२६(वार्ताहर)-

**महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे राजभवन महाबळेश्वर येथे आगमन झाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.**

यावेळी पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, वाईचे उपविभागीय अधिकारी डॉ.योगेश खरमाटे, तहसीलदार सचिन मस्के, महाबळेश्वर पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय देशपांडे,पाचगणी पालिकेचे मुख्याधिकारी पंडित यांनीही राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे


महाबळेश्वर येथे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याशी चर्चा करताना जिल्हाधिकारी संतोष पाटील,पो.अधीक्षक तुषार दोशी व अन्य.

पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. राज्यपालांनी जिल्हाधिकारी संतोष पाटील आणि जिल्हा पोलीस अधिक्षक तुषार दोशी यांच्यासमवेत चर्चा केली. महाबळेश्वरला देश-परदेशातील पर्यटक येतात, त्यामुळे येथील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची सूचना त्यांनी केली. तसेच महाबळेश्वर परिसरातील शेतकऱ्यांनी अधिकाधिक जैविक शेतीकडे वळावे यासाठी प्रोत्साहन द्यावे, असेही राज्यपाल म्हणाले.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती उपस्थित होते.

# विकासाच्या जोरावर जिल्हा भगवामय करणार

## ना.शंभूराज देसाई

कराड ,ता.२६(प्रतिनिधी)-

**पाटण विधानसभा मतदारसंघातील काजारवाडी, डुबलवाडी, शिद्रुकवाडी येथील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला आहे. यापुढेही आणखी प्रवेश होणार असून, विकासाच्या मुद्यावर सातारा जिल्हा भगवामय करण्याचे काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही करत आहोत.**



कराड दक्षिणमधील इच्छुक नेत्यांशी प्राथमिक चर्चा झाली असून, त्यांचा ग्रीन सिग्नल मिळाला असल्याने तोही प्रवेश लवकरच होईल, असे पर्यटन तथा पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले.मंत्री देसाई कराड दौऱ्यावर आले असता शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी कराडमधील शिवसेना समर्थक नगरसेवक भाजपमध्ये जात आहेत? या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की, कराडमधील एकच नगरसेविका भाजपमध्ये गेल्या असून, बाकी सर्व नगरसेवक आमच्याबरोबर आहेत. तुम्ही एक नगरसेवक नेला तर आम्ही दोन नेऊ अशी आम्ही फोडाफोडीची स्पर्धा लावणार नाही. करायचेच म्हटले, तर ते मला अवघड नाही. परंतु महायुतीत ही स्पर्धा करायची नाही, आम्ही संयमी आहोत. मात्र मित्रपक्षांनी तशीच भूमिका राहिली, तर आम्हालाही आमच्या पद्धतीने भूमिका घ्यावी लागेल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जिल्ह्यात महायुती म्हणून एकत्र लढण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार प्राथमिक बैठकही झाली आहे. शक्य तिथे महायुती करण्याचा प्रयत्न आहे. मात्र यश आले नाही, तर मैत्रीपूर्ण लढू, परंतु वादविवाद, ओढाताणी, खेचाखेची नको , अशी पालकमंत्री म्हणून माझी भूमिका राहील, असेही त्यांनी सांगितले.फलटण अत्याचार प्रकरणी तपास सुरू असल्याने त्या गोष्टीवर बोलणे योग्य नाही. पोलीस अधिकाऱ्यांना योग्य सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्रीही यावर लक्ष ठेवून आहेत.

# शिराळा शहरासाठी १० कोटींचा निधी मंजूर- आम.सत्यजित देशमुख

शिराळा,ता.२६(प्रतिनिधी)-



**शिराळा नगरपंचायत हद्दीतील विकास कामांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने, महायुती सरकारच्या धोरणात्मक निर्णयामुळे १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सत्यजित देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.मंजूर कामे लवकरच सुरू होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.**

आमदार सत्यजित देशमुख म्हणाले, शिराळा येथे नाट्यगृह इमारत बांधणीसाठी ५ कोटी,शिराळा नगरपंचायत हद्दीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवन बांधकाम करणे १.७५ कोटी,शिराळा नगरपंचायत हद्दीत नगरवाचनालय इमारत बांधकाम करणे १.२५ कोटी,शिराळा नगरपंचायत हद्दीत माजी सैनिक भवन इमारत भवन बांधकाम करणे ५० लाख,शिराळा नगरपंचायत हद्दीत श्री. स्वामी समर्थ मंदिर परिसर विकसित करणे ५० लाख,शिराळा नगरपंचायत हद्दीत जुना औंढी रस्ता सुधारणा करणे ५० लाख,शिराळा नगरपंचायतसाठी कचरा प्रक्रिया व्हॅन युनिट (कचरा व्हॅन) उभारणे ५० लाख असे एकूण १० कोटी रुपये या विकासकामांसाठी मंजूर झाले आहेत.या कामांना लवकरच सुरुवात होईल.

## काँग्रेसचे ताकदीने काम करणार-थोरात

कराड ,ता.२६(प्रतिनिधी)-

**मी काँग्रेस पक्षाचा कराड उत्तरचा अध्यक्ष आहे. त्यामुळे काँग्रेस पक्ष सोडण्याचा कोणताही विचार माझ्या मनात नाही. मी काँग्रेस पक्षातच सक्रिय राहून काम करणार असल्याचे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे समर्थक माजी जिल्हा परिषद सदस्य निवास थोरात यांनी बोलताना व्यक्त केले.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांकडून पक्षप्रवेशासाठी चढाओढ सुरू आहे. कराड उत्तरमधील काही नेत्यांचीही नावे चर्चेत आहेत. मात्र कराड उत्तरमध्ये काँग्रेस पक्षाची ताकद वाढवण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. माध्यमांमध्ये मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार अशी माझ्या नावाची खोडसाळपणे चर्चा सुरू करण्यात आली आहे. मात्र, त्यामध्ये काहीही तथ्य नाही, असेही थोरात यांनी स्पष्ट केले.

# सांगली जिल्ह्यात प्रथमच सोनेरी चिखल्या पक्षाची नोंद

## आमणापूरचा कोंडार परिसर ठरतोय पाहुण्या पक्ष्यांचा हॉटस्पॉट'

भिलवडी,ता.२६(वार्ताहर)-

**सांगली जिल्ह्याच्या पक्षीवैभवात एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे. दरवर्षी हिवाळ्यात विविध स्थलांतरित पक्ष्यांचे स्वागत करणाऱ्या आमणापूरच्या कोंडार परिसरात, यंदा प्रथमच सोनेरी चिखल्या या दुर्मिळ हिवाळी पाहुण्या पक्षाची नोंद झाली आहे. पक्षीप्रेमींसाठी ही मोठी आनंदाची बातमी असून, या नोंदीमुळे कृष्णा नदीकाठचा हा भूभाग पक्षी स्थलांतर मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण म्हणून पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.**

### परदेशी पाहुण्या पक्ष्यांचे आमणापूरमध्ये आगमन

आमणापूर येथील पक्षीप्रेमी संदिप नाझरे यांच्या अथक निरीक्षणातून ही दुर्मिळ नोंद झाली आहे. कोंडार हा कृष्णा नदीकाठचा


आमणापूरच्या कोंडार परिसरात निदर्शनास आलेला सोनेरी चिखल्या पक्षी.

उथळ पाण्याचा भूभाग असून, तो परदेशी पाहुण्या पक्षांच्या भेटीसाठी प्रसिद्ध आहे. नाझरे यांनी यंदा सोनेरी चिखल्यासह, छोटा अर्ली, हिरवा तुतवार, कंठेरी चिखल्या, ठिपकेवाली तुतारी, ठिपकेदार तुतवार, पांढरा धोबी, पिवळा धोबी अशा अनेक परदेशी पाहुण्या पक्षांची नोंद घेतली आहे.तसेच या ठिकाणी स्थानिक पक्ष्यांमध्ये रंगीत करकोचे, खुल्या चोचीचे करकोचे, चमचे,ताम्रमुखी टिटवी, नदीसुरय, आयबीस, पारवे, होले, शेकाट्या, हळदी कुंकू बदक, पाणकावळे अशा अनेक पाणथळीच्या पक्ष्यांचा किलबिलाट सध्या या कोंडार परिसरात अनुभवास मिळत आहे. संदिप नाझरे यांनी बनवलेल्या कृष्णाकाठचे पक्षी जगत या माहितीपटामुळे हा आमणापूरचा कोंडार परिसर पक्षी निरीक्षणासाठी प्रकाशझोतात आला आहे.

### 'सोनेरी चिखल्या'ची माहिती

सोनेरी चिखल्या हा एक मध्यम आकाराचा, लांब पल्ल्याचा स्थलांतर करणारा पक्षी आहे. हा पक्षी त्याच्या पिसाऱ्यातील सोनेरी-पिवळसर ठिपक्यांमुळे ओळखला जातो. त्याचा मागील भाग गडद तपकिरी असून त्यावर सोन्यासारखे पिवळे ठिपके असतात. स्थलांतरादरम्यान आणि हिवाळ्यात हा पिसारा अधिक तपकिरी आणि सोनेरी दिसतो. हा पक्षी प्रामुख्याने आर्क्टिक टुंड्रामध्ये (उदा. सायबेरिया, अलास्का) प्रजनन करतो आणि हिवाळ्यात तो लांब पल्ल्याचा प्रवास करून दक्षिण आशिया,ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या उष्ण प्रदेशांमध्ये स्थलांतर करतो. दलदलीच्या भागात, चिखलात आणि उथळ पाण्यात तो आपली चोच खुपसून छोटे कीटक, किडे, अळ्या आणि छोटी जलचरे शोधून खातो. या पक्षाची सांगली जिल्ह्यात झालेली नोंद अत्यंत महत्त्वाची आहे, कारण त्यामुळे या कोंडार परिसराचे पक्षी-अधिवासाच्या संवर्धनाच्या दृष्टीने असलेले महत्त्व अधोरेखित होते.


बेळंकी येथील ९४ लाख रुपयाच्या विविध विकास कामांचे उद्घाटन करताना सुशांत खाडे व मान्यवर.

## बेळंकीत विकास कामांचे उद्घाटन

मिरज,ता.२६(प्रतिनिधी)-

**जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार डॉ. सुरेश खाडे यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर ग्रामीण भागातील विकासकामांचा धडाका सुरू केला आहे.**

बेळंकी येथील नागरीसुविधा, डी. पी. सी. २५:१५ आणि आमदार फंड या अंतर्गत तब्बल ९४ लाख रुपयांच्या ५ विकासकामांचा प्रारंभ सुशांत खाडे यांच्याहस्ते पार पडला.बेळंकी गावातील नागरिकांच्या मागणीप्रमाणे व या नागरिकांना सदरची कामे करून देण्याचे वचन दिल्याप्रमाणे आ. खाडे यांनी वचन पूर्तता केली असून ग्रामीण भागातील जनतेत समाधानाचे वातावरण आहे. यावेळी दौलत कांबळे, विजय पाटील, अभि गौराजे, डॉ. महेश शिंदे, नेताजी गडदरे, संभाजी गायकवाड, मयूर नाईकवाडे यांच्यासह भाजप पदाधिकारी,कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

# रुपया सावरण्यासाठी



अमेरिकेने भारताविरोधात लावलेले ५० टक्के आयात शुल्क आणि इतर कारणामुळे गेल्या दोन महिन्यापासून भारतीय रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत कमालीच्या वेगाने कमी होत आहे. त्यामुळे भारताच्या आयात– निर्यात संतुलनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व बँक गेल्या दोन महिन्यापासून प्रयत्न करत आहे.या प्रयत्नांचा भाग म्हणून ऑगस्ट महिन्यामध्ये रिझर्व बँकेने ७.७ अब्ज डॉलरची विक्री करून रुपयाचे मूल्य स्थिर करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले जाते. रिझर्व बँक परकीय चलनविषयक माहिती आपल्या वेबसाईटवर प्रत्येक आठवड्याला जारी करीत असते.

या आठवड्यात जारी केलेल्या माहितीनुसार ऑगस्ट महिन्यात रिझर्व बँकेने खरेदीपेक्षा जास्त डॉलरची विक्री केली. ऑगस्ट महिन्यात ७.७ अब्ज डॉलरची विक्री रिझर्व बँकेला करावी लागेल.

विशेष म्हणजे जुलै महिन्यात रिझर्व बँकेने केलेल्या डॉलरच्या विक्रीपेक्षा ही विक्री तीन पटीने जास्त आहे. जर रिझर्व बँकेने डॉलरची विक्री केली नसती तर रुपयाचा भाव आणखी कोसळला असता असते समजले जाते.

रिझर्व बँकेने जारी केलेल्या माहितीत आणखी एक बाब समोर आली आहे. ती म्हणजे जुलै आणि ऑगस्टदरम्यान रिझर्व बँकेने जरी ७.७ अब्ज डॉलरची विक्री केली असली तरी या दोन महिन्यात रिझर्व बँकेने एकही डॉलरची खरेदी केली नाही.

रुपयाच्या मूल्यासंदर्भात रिझर्व बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पत्रकारांनी वेळोवेळी विचारणा केलेली आहे. मात्र रिझर्व बँक रुपयाचे मूल्य कोणत्या पातळीवर असावे हे ठरवत नाही. रुपयाचे मूल्य अस्थिर झाल्यानंतर रिझर्व बँक रुपयाचे मूल्य स्थिर करण्यासाठी प्रयत्न करते, असे वेळोवेळी सांगण्यात आलेले आहे.

दरम्यान जागतिक व्यापार युद्ध आणि अमेरिकेने भारताविरोधात लावलेले आयात शुल्क या कारणामुळे भारतीय रुपयाचे अवमूल्यन चालूच आहे. ऑगस्ट महिन्यात रिझर्व बँकेने एवढ्या मोठ्या प्रमाणात डॉलरची विक्री करूनही रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत १.६ टक्क्यांनी कमी झाले आहे. सप्टेंबर महिन्यात रुपयाचे मूल्य त्याच वेगाने कमी झाले आहे. भारतीय शेअर बाजार आणि रोखे बाजारातून परदेशी संस्थागत गुंतवणूकदार परत जात आहेत, असे समजले जाते. त्यामुळे पुन्हा रुपयाच्या मूल्यावर दबाव येत आहे.



# दमदार परताव्यासाठी सोने-चांदी की निफ्टी?

## काय सांगतो गेल्या दशकभराचा लेखाजोखा

ऑक्टोबर महिन्यातील भारतीय शेअर बाजाराच्या भरारीने सर्वांनाच स्तीमित केले आहे. दुसरीकडे सोन्याने २० ऑक्टोबर रोजी प्रति १० ग्रॅम १,२७,२७० रुपये असा उच्चांकी भाव नोंदवला आहे. गेल्या दिवाळीत याच सोन्याचा भाव सुमारे ७८,४३० रुपये होता. म्हणजे केवळ एका वर्षात सोन्याने तब्बल ६२ टक्क्यांनी झेप घेतली आहे. २०२५ हे गेल्या दशकातील सर्वांत वेगाने वाढणारे वर्ष ठरले आहे. याच काळात चांदीने तर गुंतवणूकदारांना अधिकच आश्चर्याचा धक्का दिला. मागील वर्षी दिवाळीत प्रति किलो चांदीचा दर ९४,६३१ रुपये होता, जो आता १,५३,९८० रुपयांपर्यंत गेला आहे. म्हणजे जवळपास ६३ टक्के वाढ. सोन्यापेक्षा किंचित अधिक परतावा देत चांदीने या वर्षीचे 'उत्कृष्ट कामगिरीचे' पदक जिंकलं आहे.

या तेजस्वी धातूंच्या चमकदार आकड्यांच्या तुलनेत निफ्टी–५० निर्देशांकाने अधिक संयम दाखवला. गेल्या वर्षीच्या मूहूर्त ट्रेडिंगच्या वेळी निफ्टी २४,३०४ अंकांवर होता, तर यावर्षी तो २५,८४७ अंकांवर पोहोचला. म्हणजेच केवळ ६.३ टक्क्यांची वाढ निफ्टीमध्ये वर्षभराच्या काळात झाली आहे. अल्पकालीन दृष्टीने पाहता हे प्रमाण सोनं आणि चांदीच्या तुलनेत फिके वाटते, मात्र दीर्घकालीन चित्र थोडे वेगळे आहे.

गेल्या दहा वर्षांचा विचार केला, म्हणजे २०१५ ते २०२४ या काळात, निफ्टी–५० निर्देशांकाने तब्बल २११ टक्क्यांचा परतावा दिला आहे. त्याच कालावधीत सोन्याने २०८ टक्के तर चांदीने १७७ टक्के वाढ दर्शवली आहे. यावरून स्पष्ट होते की, अमूल्य धातूंचा बाजार अल्पावधीत चमकत असला तरी दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीने निफ्टी–५० अजूनही सर्वात विश्वासार्ह पर्याय ठरतो. सन २०२५ मध्ये मात्र परिस्थिती वेगळी राहिली. आर्थिक अस्थिरता, जागतिक राजकीय तणाव, तसेच मध्यपूर्वेतील संघर्षामुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षिततेकडे झुकणारी धोरणे अवलंबली. त्यामुळे 'सेफ हेवन' मानल्या जाणाऱ्या सोनं–चांदीकडे भांडवल वळलं. यामुळेच त्यांच्या किंमतींनी विक्रमी झेप घेतली.

तथापि, या धातूंमध्ये असलेली अस्थिरता अजूनही मोठी आहे. वर्षागणिक चांदीचे दर अधिक चढ–उतार दाखवतात, तर सोनं तुलनेने स्थिर राहते. उदाहरणार्थ, २०२१ मध्ये सोन्याचा भाव घटला पण चांदी थोडीशी वाढली; तर २०१८ मध्ये दोन्ही घसरले. त्याउलट निफ्टीने २०२१ मध्ये ४० टक्क्यांहून अधिक झेप घेतली होती ह्वी कोविडपश्चात आर्थिक पुनरुत्थानाची झळाळी होती.

२०१५ हे वर्ष मात्र या तीनही पर्यायांसाठी सर्वांत निराशाजनक ठरले होते. त्या वर्षी सोनं आणि चांदी दोन्ही घसरले आणि शेअर बाजारही मंदावला.

पण पुढील काही वर्षांत, विशेषतः २०१९ ते २०२१ दरम्यान, निफ्टीने जबरदस्त पुनरागमन केले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुधारणांमुळे, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे आणि जागतिक बाजारातील अनुकूल प्रवाहांमुळे निर्देशांकाने भक्कम कामगिरी दाखवली. दुसरीकडे, धातूंच्या किंमतींवर जागतिक मागणी, चलनवाढ, डॉलरचे दर आणि आंतरराष्ट्रीय संघर्षांचा मोठा प्रभाव राहिला. त्यामुळे त्यांची हालचाल अधिक अस्थिर दिसते.

२०२५ मध्ये मात्र परिस्थिती उलटी झाली. जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेमुळे, गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा सुरक्षिततेचा मार्ग निवडला आणि सोनं–चांदीची मागणी प्रचंड वाढली. परिणामी निफ्टीपेक्षा त्यांचे परतावे झपाट्याने वर गेले.

मात्र दीर्घकाळ पाहता, निफ्टीचा परतावा अजूनही सोनं आणि चांदीपेक्षा किंचित पुढे आहे. कारण शेअर बाजार गुंतवणुकीत 'कंपाउंडिंग'चा फायदा मोठ्या प्रमाणात मिळतो. तर सोनं–चांदी हे मुख्यत्वे सुरक्षिततेसाठी आणि चलनवाढीविरोधात संरक्षण म्हणून वापरले जाणारे साधन राहते.

गेल्या दशकातील या तुलनेवरून एक गोष्ट स्पष्ट होते.अल्पावधीत सोनं–चांदीची चमक डोळे दिपवणारी असली तरी दीर्घकालीन संपत्ती निर्माण करायची असल्यास शेअर बाजार (विशेषतः निफ्टीसारखे निर्देशांक) अधिक सक्षम आणि स्थिर पर्याय ठरतात. त्यामुळे गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नुसत्या वर्षभरातील परताव्यांच्या मोहात न पडता, दीर्घकालीन शिस्तबद्ध गुंतवणुकीकडे लक्ष दिले पाहिजे. कारण सोनं आणि चांदी वर्षागणिक चमकतात आणि फिकेही पडतात; पण निफ्टीसारखा निर्देशांक सातत्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे प्रतिबिंब दाखवत राहतो.

# चांगला क्रेडिट स्कोअर असूनही कर्ज का नाकारले जाते?

अनेकदा आपला क्रेडिट स्कोअर चांगला असतो, बँकेकडून नियमित व्यवहार केलेले असतात, तरीदेखील वैयक्तिक कर्जासाठीचा (पर्सनल लोन) अर्ज नाकारला जातो. अशा वेळी प्रश्न पडतो की नेमके काय चुकले? प्रत्यक्षात, कर्ज देणारी संस्था फक्त क्रेडिट स्कोअरवर निर्णय घेत नाही, तर इतर अनेक घटकांवरही विचार करते.




**१. वयाचा परिणाम :** कर्ज मंजूर करताना वयाचा महत्त्वपूर्ण विचार केला जातो. तरुण नोकरी करणाऱ्या व्यक्तींना बँका जास्त विश्वासार्ह मानतात. कारण त्यांच्याकडे दीर्घ सेवा कालावधी असतो. परंतु ज्यांचे वय निवृत्तीच्या जवळ आलेले आहे किंवा जे लवकरच नोकरी सोडणार आहेत, त्यांचे अर्ज बँक अनेकदा नाकारते. कारण कर्जाचा कालावधी संपण्याआधीच त्यांचे उत्पन्न बंद होण्याची शक्यता असते.

**२. निश्चित उत्पन्नाचा अभाव :** स्वयंरोजगार करणारे लोक किंवा फ्रीलान्सर यांचे उत्पन्न निश्चित नसते. बँकेला प्रत्येक महिन्याचे स्थिर उत्पन्न दिसणे गरजेचे असते. जर उत्पन्न अधूनमधून येत असेल किंवा व्यवसायात स्थैर्य नसेल, तर बँक कर्ज देताना संकोच करते. त्यामुळे अशा अर्जांची नकारात्मक तपासणी होते.

**३. आधीचे कर्ज बाकी असणे :** जर एखाद्या व्यक्तीवर आधीच मोठ्या रकमेचे कर्ज बाकी असेल आणि त्याच्या मासिक उत्पन्नाच्या निम्म्याहून अधिक भाग त्या कर्जाच्या हप्त्यात जात असेल, तर नवीन कर्ज मंजूर होण्याची शक्यता कमी होते. विद्यमान जबाबदाऱ्या पूर्ण करून अर्जदाराला नवीन कर्जाचे हप्ते परवडतील का, हे बँक पडताळून पाहते.

**४. मागितलेली कर्ज रक्कम जास्त असणे :** कधी कधी व्यक्ती स्वतःच्या गरजेनुसार कर्जमागणी केली जाते; पण क्रेडिट स्कोअर उत्कृष्ट असला तरी, पगाराच्या तुलनेत कर्जाची मागणी खूप मोठी असेल तर बँक तो अर्ज नाकारते. कारण परतफेडीची क्षमता (रिपेमेंट कॅपॅसिटी) कमी असल्यास धोका वाढतो.

**५. नोकरीचा करार अल्पकालीन असणे :** ज्यांची नोकरी करारावर आधारित आहे आणि तो करार काही महिन्यांत किंवा एका वर्षात संपणार असेल तर अशा लोकांचे अर्जही बँका नाकारतात. कारण कर्जाचा कालावधी दीर्घ असतो आणि नोकरी संपल्यावर उत्पन्न थांबण्याची शक्यता असते.

**इतर महत्त्वाचे मुद्दे :** कर्ज अर्ज करताना बँक तुमच्या संपूर्ण आर्थिक इतिहासाचा (फायनान्शियल बॅकग्राऊंड) अभ्यास करते. वेळोवेळी कर्जाची परतफेड केली नसेल, किंवा पूर्वीचे हप्ते थकलेले असतील, तर तुमच्यावरील विश्वास कमी होतो. कर्जासाठी अर्ज वारंवार केल्यास क्रेडिट प्रोफाईल कमजोर दिसते.त्यामुळे केवळ चांगला क्रेडिट स्कोअर पुरेसा नसतो. बँकेला तुमच्या उत्पन्नाची नियमितता, आर्थिक जबाबदाऱ्या, वय, नोकरीतील स्थैर्य आणि परतफेडीची क्षमता या सर्व गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. त्यामुळे वैयक्तिक कर्ज अर्ज करण्यापूर्वी या सर्व घटकांचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. असे केल्यास अर्ज नाकारला जाण्याची शक्यता कमी होते आणि आर्थिक नियोजन अधिक सुरक्षित बनते.

# ई-फायलिंग पोर्टलवर नवे फिचर




आयकर विभागाने आपल्या ई–फायलिंग पोर्टलवर एक नवे फिचर सुरू केले आहे. या माध्यमातून करदात्यांना आता त्यांचे सबमिशन संबंधित अधिकारी म्हणजेच असेसिंग ऑफिसर (ए.ओ.) किंवा कमिशनर ऑफ इनकम टॅक्स (अपील)यांनी नेमक्या कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळेला पाहिले आहे हे समजू शकणार आहे. तज्ज्ञांच्या मते हा उपक्रम करप्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणारा, तंट्यांचे प्रमाण कमी करणारा आणि फेसलेस असेसमेंट प्रणालीवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ करणारा ठरु शकतो. या नव्या फीचरमुळे आधी असलेली अनिश्चितता दूर होईल आणि करदात्यांना आपल्या उत्तरांवर खरोखरच कारवाई होत आहे, याची खात्री मिळेल.

**या अपडेटचे प्रमुख फायदे असे आहेत:**

१. तात्काळ माहिती: करदात्याला त्याचे दस्तऐवज किंवा उत्तर अधिकाऱ्याने कधी उघडले हे तात्काळ समजेल.

२. अधिकाऱ्यांची जबाबदारी: प्रत्येक टप्प्याची वेळ नोंदवली जाते, त्यामुळे कोणत्याही विलंबाचा किंवा वादाचा ठोस डिजिटल पुरावा तयार राहील.

३. कार्यक्षमता वाढ: अधिकाऱ्यांवर ठराविक वेळेत काम पूर्ण करण्याचा दबाव राहील, कारण त्यांच्या प्रत्येक कार्याचा डिजिटल मागोवा घेतला जाईल.

४. फेसलेस असेसमेंटमध्ये विश्वास प्रत्येक कृती नोंदली गेल्याने प्रणालीची निष्पक्षता आणि पारदर्शकता स्पष्टपणाने समोर येईल. फेसलेस असेसमेंट योजनेत सर्वात मोठी अडचण होती ती संवादाची. करदात्यांना हे माहीतच नसतं की त्यांच्या उत्तरांकडे कोणी लक्ष दिलं आहे की नाही. आता नव्या फीचरमुळे आपली कागदपत्रे पाहिली गेली आहेत, याची खात्री मिळेल. तसेच आता करदात्यांना त्यांनी दिलेल्या उत्तरांकडे दुर्लक्ष झाले नाही, हे सिद्ध करता येईल. काही कारणाने उत्तर न पाहताच आदेश जारी झाला, तर हा नोंदवलेला डेटा पुरावा म्हणून वापरता येईल.

उदाहरण: समजा, एखाद्या करदात्याला कलम १४३(१) अंतर्गत नोटीस आली आणि त्याने उत्तर दिले असेल, तर आता तो तपासू शकतो की अधिकाऱ्याने त्याचे उत्तर पाहिले की नाही. यामुळे चुकीच्या किंवा अपूर्ण तपासावर आधारित आदेश दिले जाण्याची शक्यता कमी होईल आणि न्यायालयीन वाद टाळले जातील. या नव्या सुविधेमुळे करदात्यांच्या गोपनीयतेवर कोणताही परिणाम होत नाही. कारण हा ऑडिट ट्रेल फक्त त्या संबंधित करदात्यालाच दिसतो. त्यामुळे त्याची संवेदनशील माहिती पूर्णपणे सुरक्षित राहते. एकंदरीत, ई–फायलिंग पोर्टलवरील ही सुधारणा भारताच्या करप्रणालीमध्ये डिजिटल जबाबदारी आणि पारदर्शकतेच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे.

# खर्च आणि हप्ते भरून क्रेडिट स्कोअर कसा टिकवावा?

दिवाळी म्हणजे आनंद, सजावट, भेटवस्तू आणि खरेदीचा हंगाम. मात्र या सणाच्या उत्साहात अनेकजण विचार न करता खर्च करतात आणि नंतर आर्थिक ताण वाढतो. क्रेडिट कार्डवरील अनियंत्रित खर्च किंवा हप्ते उशिरा भरल्यामुळे क्रेडिट स्कोअर कमी होऊ शकतो. त्यामुळे या दिवाळीत आनंद साजरा करतानाच आपल्या आर्थिक आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.




**१. सणासाठी स्वतंत्र बजेट तयार करा :** दिवाळीच्या खरेदीसाठी आधीच एक स्वतंत्र बजेट ठरवणे ही सर्वात महत्त्वाची पायरी आहे. घर सजावट, भेटवस्तू, मिठाई, कपडे आणि इतर आवश्यक गोष्टींसाठी स्वतंत्र मर्यादा ठरवा. गरजेच्या आणि इच्छांच्या खर्चामध्ये स्पष्ट फरक करा. फक्त सणाचा उत्साह म्हणून अनावश्यक वस्तू खरेदी करू नका.

खरेदी आधीच नियोजित केल्यास शेवटच्या क्षणी अनावश्यक किंवा महागड्या वस्तूंवर खर्च होण्यापासून बचाव होतो. तसेच, सर्व खर्चांसाठी फक्त क्रेडिट कार्डच वापरू नका. काही व्यवहार रोख, कार्ड किंवा यूपीआयद्वारे करा. ामुळे क्रेडिट कार्डची मर्यादा ओलांडली जाणार नाही आणि देणी वेळेत भागवता येतील.

**२. फक्त मोठी खरेदी नव्हे, स्मार्ट खरेदी करा :** दिवाळीत ऑफर आणि सवलतींची रेलचेल असते. मात्र प्रत्येक सवलत तुमच्यासाठी गरजेची असेलच असे नाही. त्यामुळे प्रत्येक खरेदीपूर्वी थोडा विचार करा. मोबाईल, टीव्ही, लॅपटॉपसारख्या महागड्या वस्तू घेताना वेगवेगळ्या वेबसाइट्सवर किंमती तपासा आणि योग्य सवलत असलेली निवडा.

तुमचा क्रेडिट वापराचा प्रमाण (Credit Utilisation Ratio) ३० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ देऊ नका. म्हणजेच क्रेडिट मर्यादेच्या तुलनेत कमी रक्कम वापरा. सर्व लहान खरेदींसाठी कार्डचा वापर करण्याऐवजी फक्त मोठ्या आणि आवश्यक खरेदींसाठीच ते वापरा.

**३. वेळेवर हप्ते आणि बिल भरणे प्राधान्य द्या :** क्रेडिट कार्डचे बिल किंवा कर्जाचा हप्ता वेळेवर आणि पूर्ण भरणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. फक्त 'मिनिमम पेमेंट' करून चालत नाही, कारण त्यामुळे व्याज वाढते आणि क्रेडिट स्कोअर कमी होतो. शक्य असल्यास ऑटो–डेबिट सुविधा सक्रिय करा, जेणेकरून कोणताही हप्ता चुकणार नाही. एकदाही हप्ता चुकल्यास किंवा बिल उशिरा भरल्यास त्याचा दीर्घकालीन नकारात्मक परिणाम क्रेडिट स्कोअरवर होऊ शकतो. तुमचा क्रेडिट रिपोर्ट नियमित तपासा. चुकीचे व्यवहार किंवा फसवणूक लवकर ओळखता येतात. जर काही त्रुटी दिसली तर त्वरित दुरुस्तीची मागणी करा.

**शेवटी काय लक्षात ठेवावे? :** आनंद साजरा करताना आर्थिक शिस्त पाळली, तर भविष्यातील कर्जसंधी आणि क्रेडिट रेटिंग दोन्ही सुरक्षित राहतात. स्मार्ट बजेटिंग, मर्यादित क्रेडिट वापर आणि वेळेवर परतफेड ह्या तीन गोष्टी पाळल्यास तुम्ही दिवाळीचा उत्सव आनंदात आणि निर्धास्तपणे साजरा करू शकता, आर्थिक ताणाशिवाय.

# सात लाखांच्या विम्याविषयी...

तुम्ही खासगी क्षेत्रात काम करत असाल, तर प्रत्येक महिन्याच्या तुमच्या पगारातून थोडा–थोडा पैसा कपात होतो आणि तो तुमच्या पीएफ खात्यात जमा होतो. बहुतेक लोकांना वाटते की हा पैसा फक्त निवृत्तीच्या वेळीच काम येईल, पण खरी गोष्ट काही वेगळी आहे. पीएफसोबत आणखी




एक योजना आहे, ती म्हणजे एम्प्लॉईज डिपॉझिट लिंकड् इन्शुरन्स स्किम (ईडीएलआय). ही सामान्य स्कीम नसून ईपीएफओकडून दिली जाणारी एक जीवन विमा सुविधा आहे, जी कठीण काळात कुटुंबाला मोठा आधार देते. जर एखाद्या कर्मचाऱ्याचा नोकरी दरम्यान मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबियांना या योजनेंतर्गत ७ लाख रुपयांपर्यंतचे विमा कवच मिळू शकते आणि तेही एक रुपयाही खर्च न करता.

मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी या स्कीम संदर्भात जाहीर केले की एप्रिल २०२१ पासून लागू झालेल्या वाढीव लाभांना 'रेट्रोस्पेक्टिव्ह' पद्धतीने दिले जाईल. म्हणजे, नोकरी बदलणाऱ्यांना किंवा जुन्या क्लेम्स असलेल्या कर्मचाऱ्यांनाही याचा फायदा मिळेल.

भारतामध्ये खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी ईडीएलआय हा एक मोठा आधार आहे. १९७६ मध्ये कर्मचारी भविष्य निधि संस्थेने ही स्कीम सुरू केली होती. ही स्कीम कर्मचारी भविष्य निधि आणि कर्मचारी पेन्शन स्कीम सोबत एकत्र काम करते. या योजनेंतर्गत एखाद्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला, तर त्यांच्या नॉमिनी किंवा कायदेशीर वारसदारांना एकत्रित रक्कम दिली जाते. ही रक्कम कर्मचाऱ्याच्या शेवटच्या पगारावर आधारित असते.

२८ एप्रिल २०२१ पासून, इपीएफओने या रक्कमेची कमाल मर्यादा ७ लाख रुपये ठेवली आहे. खास बाब म्हणजे, या स्कीममध्ये कर्मचाऱ्याला कोणताही योगदान देण्याची गरज नाही. संपूर्ण खर्च एम्प्लॉयर उचलतो, जो कर्मचाऱ्याच्या बेसिक पगाराच्या ०.५% देतो. ही रक्कम प्रति महिना कमाल ७५ रुपये इतकीच आहे. ही स्कीम सर्व ईपीएफ सदस्य कर्मचाऱ्यांना कव्हर करते. यामध्ये कुठलाही अपवाद नाही. कर्मचाऱ्याचा मृत्यू भारतामध्ये किंवा परदेशात झाला तरी नॉमिनीला फायदा मिळतो. शिवाय, हे कव्हरेज २४ तास लागू राहते. म्हणजे केवळ कामाच्या वेळीच नाही तर सतत सुरक्षा मिळते.

जर एखादी कंपनी हवी असल्यास ईडीएलआयऐवजी कर्मचाऱ्यांसाठी दुसरी ग्रुप लाइफ इन्शुरन्स पॉलिसी घेऊ शकते, परंतु त्याचा फायदा ईडीएलआयपेक्षा कमी नसावा. २० किंवा त्याहून जास्त कर्मचारी असलेल्या संस्थांना ईपीएफ कायद्यानुसार नोंदणी करावी लागते. नोंदणी केल्यानंतर त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांना ईडीएलआयच्या कक्षेत आणले जाते.

# बीटीएसटी ट्रेडिंग म्हणजे काय?

शेअर बाजारातील जलद नफा कमावण्याच्या प्रयत्नात असलेल्या ट्रेडर्सकडून अनेक वेगवेगळ्या रणनीती वापरल्या जातात. त्यापैकी एक लोकप्रिय रणनीती म्हणजे बीटीएसटी ट्रेडिंग (बाय टुडे, सेल टुमारो) अर्थात आज खरेदी करा, उद्या विक्री करा. नावावरूनच स्पष्ट होते की या पद्धतीत एखादा ट्रेडर एके दिवशी शेअर खरेदी करून दुसऱ्या दिवशी विक्री करू शकतो, अगदी त्या शेअर्सची डिलिव्हरी डीमॅट खात्यात येण्यापूर्वीच.

**बीटीएसटी ट्रेडिंगची मूलभूत रचना समजून घ्या :** भारतीय शेअर बाजारात टी+१ सेटलमेंट सायकल लागू आहे. म्हणजे तुम्ही सोमवारी शेअर्स खरेदी केले, तर ते मंगळवारी तुमच्या डीमॅट खात्यात जमा होतात. पण बीटीएसटी ट्रेडिंगमध्ये शेअर्स अद्याप खात्यात आलेले नसले तरी तुम्हाला मंगळवारीच विक्री करण्याची मुभा असते.

उदाहरणार्थ समजा तुम्ही सोमवारी एखाद्या कंपनीचे १०० शेअर्स प्रत्येकी ₹५०० ला खरेदी केले. मंगळवारी त्याच शेअरची किंमत ₹५२० झाली. तुम्ही ते १०० शेअर्स ₹५२० ला विकले, म्हणजे तुम्हाला ₹२००० नफा मिळतो आणि तेही शेअर्स खात्यात येण्याआधीच.अशा प्रकारे बीटीएसटी ट्रेडिंगद्वारे किंमत बदलांचा फायदा अल्पावधीत घेता येतो.

**बीटीएसटी ट्रेड सुरू करण्याआधी लक्षात ठेवावयाच्या गोष्टी**

**१. शेअरची लिक्विडिटी :** नेहमी असे शेअर्स निवडा जे सहज खरेदी–विक्री होतात. न चालणारे शेअर्स घेतल्यास पुढील दिवशी विक्री करणे अवघड जाऊ शकते.




**२. बाजारातील बातम्या आणि घटना :** कंपनीसंबंधी घोषणा, अर्थसंकल्प, आंतरराष्ट्रीय संकेत अशा बातम्यांचा परिणाम शेअरच्या किमतींवर होतो. म्हणून ट्रेड करण्यापूर्वी सर्व घडामोडी तपासा.

**३. शेअरचा अस्थिरपणा :** सतत वेगवान चढ–उतार होत असलेल्या शेअर्सपासून दूर राहा. विशेषतः जर तुम्ही नवशिके असाल तर ही गोष्ट आवर्जून तपासा. कारण किंमत उलट दिशेने गेल्यास तोटा होऊ शकतो.

**४. ब्रोकरकडून बीटीएसटीला परवानगी आहे का हे तपासा :** सर्वच ब्रोकर बीटीएसटी ट्रेडिंग देत नाहीत. त्यामुळे सर्वांत आधी ब्रोकरकडे ही सुविधा आहे का हे विचारुन घ्या.

**५. शॉर्ट डिलिव्हरीचा धोका :** तुम्ही विक्री करत असलेले शेअर्स अजून खात्यात आलेले नसल्याने, मूळ विक्रेत्याने शेअर्स न दिल्यास शॉर्ट डिलिव्हरी होऊ शकते. अशावेळी दंड किंवा तोटा होऊ शकतो.

**बीटीएसटी ट्रेडिंगचे फायदे**

एका दिवसात किंमत वाढल्यास चांगला नफा मिळू शकतो. यासाठी पूर्ण रकमेची गरज नसते. कमी मार्जिनमध्येही व्यवहार करता येतो. दुसऱ्या दिवशी व्यवहार संपवता येत असल्याने बाजारातील दीर्घकालीन बदलांचा परिणाम होत नाही.डिलिव्हरी घेतली जात नसल्याने विक्रीच्या बाजूचा एसटीटी लागू होत नाही.

**बीटीएसटी ट्रेडिंगचे तोटे**

मूळ विक्रेत्याने शेअर्स न दिल्यास ब्रोकरला ऑक्शनमध्ये ते खरेदी करावे लागतात आणि तोटा तुमच्यावर येतो. रात्रीच्या बातम्या किंवा जागतिक बाजारातील बदलांमुळे दुसऱ्या दिवशी किंमत खाली येऊ शकते. फक्त एकाच दिवसात विक्री करावी लागते. किंमत न वाढल्यास तोटा पत्करावा लागतो. अल्प नफा मिळाल्यास यासाठी द्याव्या लागणाऱ्या शुल्कांमुळे फायदा कमी होऊ शकतो.

**कोणासाठी योग्य आहे बीटीएसटी ट्रेडिंग?**

जे दररोज बाजाराचे निरीक्षण करतात, ज्यांना किंमत विश्लेषण व तांत्रिक संकेतांची माहिती आहे, जे दीर्घकालीन गुंतवणूक नको म्हणतात, अल्प भांडवलावर जलद परतावा हवा असतो, अशांसाठी बीटीएसटी ट्रेडिंगचा पर्याय उपलब्ध आहे. आज खरेदी, उद्या विक्री हे ऐकायला सोपे असले तरी ते यशस्वीरीत्या करण्यासाठी शिस्त, जोखीम व्यवस्थापन आणि बाजाराचे ज्ञान आवश्यक आहे. योग्य नियोजनासह केल्यास बीटीएसटी ट्रेडिंग ही अल्पकालीन नफ्याची प्रभावी पद्धत ठरू शकते, पण यातील जोखीम प्रचंड आहे, हे लक्षात ठेवा.

# ट्रकच्या धडकेत दूचाकीस्वार ठार

**कारदगा,ता.२६ (वातोहर) – भोज – बेडकीहाळ मार्गावरील सांगणे मळा वळणावर मालवाहतूक ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने दूचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना शनिवारी घडली. बाळासो बाबाजी कोळेकर (वय ५९ रा. कारदगा) असे त्या मृताचे नाव आहे.**

बाळासो बाबाजी कोळेकर हे टीव्हीएस एक्सशेल सुपर स्कुटी (केए २३ एडब्लू १५९० ) वरून पत्नी शेवंता बाळासो कोळेकर याना घेऊन कारदगाहून वडगोल येथील श्री बिरेसिद्धेश्वर देवालयास गेले होते. तर दर्शन संपवून सायंकाळी ४.३०च्या दरम्यान परत येत असताना बेडकिहाळ – भोज मार्गावरील बेडकिहाळ हद्दीतील किणीकर मळा परिसरात आल्यानंतर ट्रक (एम एच २६ सी एच ६८९४) चालक भारत मंगूर राठोड (रा. धामणधरी ता. किन्नोट, जि.नांदेड) याने ट्रक रिव्हर्स घेण्याच्या नादात दूचाकीवरून येणारे बाळासो कोळेकर आणि त्यांची पत्नी शेवंता कोळेकर यांना पाठीमागून धडक दिली. यामध्ये बाळासो यांनी पत्नीला रस्त्याकडे ढकलले इतक्यात मागील ट्रकचे दोन्ही चाक बाळासो यांच्या अंगावरून गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यांनी आपली पत्नीला वाचविले पण स्वतःचे प्राण गमावले. पत्नी शेवंताने आरडाओरडा केला तरी देखील चालकाने मागे न पाहता ट्रक अंगावरून घालून पळ काढण्याचा प्रयत्न करत होता. इतक्यात परिसरातील नागरिकांनी ट्रकच्या समोर मोटारसायकल लावून त्याला पकडून त्याला चोप दिला.घटनास्थळी सदलगा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक व पोलिसांनी भेट देऊन पाहणी केली.ट्रकर चालकास पोलसांच्या ताब्यात देण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले, भाऊ, भावजय असा परिवार आहे.










































दैनिक महासत्ता
सोमवार,ता.२७ ऑक्टोबर २०२५



# गौतम गंभीरच्या जागी कोणाला लॉटरी लागणार?

नवी दिल्ली,ता.२६–

**नियतीचा खेळ कोणाला कळत नाही आणि आता हीच गोष्ट पाहायला मिळत आहे. गौतम गंभीर यांनी रोहित शर्माच्या मित्राला संघाच्या बाहेर काढले होते. पण रोहित शर्माचा तोच मित्र आता गौतम गंभीर यांचीच जागा घेणार असल्याचे समोर आले आहे.**

गौतम गंभीर हे भारताच्या संघात जेव्हा प्रशिक्षक म्हणून आले तेव्हा त्यांनी आपले नियम लागू केले. संघात आल्यावर हम करे सो कायदा... असेच त्यांचे धोरण होते. त्यामध्येच गौतम गंभीर यांना रोहित शर्माच्या मित्राचा काटा काढला. रोहित शर्माच्या मित्राला संघाबाहेर केले. पण आता तोच रोहित शर्माचा मित्र गौतम गंभीर यांची जागा घेण्यासाठी सज्ज झाला आहे.

गौतम गंभीर यांनी आयपीएलमध्ये प्रशिक्षणाला सुरुवात केली. सुरुवातीला ते दिल्ली कॅपिटल्सच्या संघात होते. त्यानंतर त्यांना केकेआरच्या संघाने मुख्य प्रशिक्षक बनवले. गंभीर यांनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने केले. कारण गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली केकेआरने आयपीएलची ट्रॉफी जिंकली. त्यानंतर जय शहा यांना गौतम गंभीर यांचे काम आवडले आणि त्यांनी त्यांना भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक बनवले. गौतम गंभीर यांनी भारतीय संघाची धुरा सांभाळली आणि त्याचवेळी रोहित शर्माच्या मित्राची भारतीय संघासाठी निवड झाली होती.

गौतम गंभीर यांच्या सुरुवातीच्या दिवसांत रोहित शर्माचा मित्र अभिषेक नायर हा सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम करत होता. पण गंभीर यांनीच त्याला काढले आणि त्यानंतर सितांशू कोटक यांना फलंदाजी प्रशिक्षक बनवत संघात आणले. पण अजूनही गौतम गंभीर केकेआरमध्ये असताना त्यांचे जे पद होते, ते अजूनही भरले गेलेले नाही.

आता केकेआरच्या मुख्य प्रशिक्षकपदी रोहित शर्माचा खास मित्र अभिषेक नायरची वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे गौतम गंभीर यांची केकेआरच्या संघातील मुख्य प्रशिक्षकाची जागा आता अभिषेक नायर घेणार असल्याचे समोर येत आहे.

गौतम गंभीर यांनी ज्याला संघाबाहेर केले, तोच रोहित शर्माचा मित्र आता त्यांचीच जागा घेणार आहे. नेमके घडणार तरी काय आहे, हे आता समोर आले आहे.



# नाईट इचलकरंजी, एसजीएम कराडची विजयी सलामी

## शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महिला खो–खो स्पर्धेस सुरुवात

इचलकरंजी,ता.२६–

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत इंटर झोनल महिला खो–खो स्पर्धेचे उद्घाटन जयहिंद मंडळ येथे झाले. उद्घाटन सामना एस जी एम कराड विरुद्ध जी ए कॉलेज सांगली यांच्यात खेळविण्यात आला. या सामन्यात एस जी एम च्या संघाने सुरुवातीपासून सामन्यावर वर्चस्व राखत जी ए सांगली संघाला १ डाव ४ गुणांनी पराभव करीत विजयी सलामी दिली. तर एम की कन्या महाविद्यालय सांगली व एस के एम कॉलेज देऊर या संघात खेळविण्यात आलेल्या सामन्यात एम जी कन्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर १ डाव ५ गुणांनी विजय मिळविला. या संघाबरोबरच केआरपी कन्या इस्लामपूर तसेच नाईट कॉलेज इचलकरंजी संघांनी आपल्या प्रतिस्पर्धी संघावर मात करीत स्पर्धेत पुढे घोडदौड चालू ठेवली.**

स्पर्धेचे आयोजन देशभक्त बाबासाहेव भा. खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी हेरिटेज व रोटरी क्लब इनरव्हील यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

दरम्यान स्पर्धेचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे प्रेसिडेंट रो. संजय घायतिडक, इंडस्ट्रियल इस्टेट चे चेअरमन राहुल खंजिरे, देशभक्त बा. भा. खंजिरे संस्थेचे अध्यक्ष अरुणराव खंजिरे, रोटरी हेरिटेजचे प्रेसिडेंट नवीत धनधानिया, इनरव्हील क्लबचे रो. इशा खंडेलवाल, माधुरी लाहोटी यांच्या हस्ते व राजू पाटील, सत्यनारायण धुत, राजू जाधव, शिवदास कित्तुरे, रेखा जाजू यांच्या उपस्थितीत पार पडला. सदर स्पर्धेमध्ये सांगली, सातारा व कोल्हापूर या तीन जिल्ह्यातील पहिला चार क्रमांकाचे महिलांच्या प्रत्येकी १२ संघात स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेमधून नांदेड येथे होणाऱ्या अश्वमेध महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेसाठी तर एसएनडीटी युनिव्हर्सिटी, मुंबई तसेच सी.आर.एस. युनिवर्सिटी, जिंद, हरीयाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो–खो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघातील महिला खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

सदर स्पर्धा दिवस–रात्र अशा दोन सत्रात विद्युतझोतात खेळविली जाणार आहे. स्पर्धेचा बक्षीस समारंभ २७ रोजी सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांनी केले आहे. आभार डॉ. देवेंद्र बिरनाळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सौरभ पाटणकर यांनी केले.

# शुभमन गिल, हर्षित राणाला संघातून वगळणार नाही, पण एका अटीवर!

सिडनी,ता.२६–

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेच्या समाप्तीनंतर भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार शुभमन गिलने वेगवान गोलंदाज हर्षित राणाबद्दल एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. गिल म्हणाला की, जर हर्षित राणा फलंदाजीने २० ते २५ धावा देऊ शकला तर तो भारतासाठी आठव्या क्रमांकावर शोधत असलेला अष्टपैलू ठरू शकतो.**



वेगवान गोलंदाज हर्षित राणाने शनिवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली आणि चार विकेट्स घेतल्या. नितीश कुमार रेड्डी दुखापतीमुळे बाहेर पडला होता, परंतु हार्दिक पंड्याच्या तुलनेत त्याच्या गोलंदाजीत आवश्यक गतीचा अभाव आहे आणि आठव्या क्रमांकावर फलंदाजी अष्टपैलू म्हणून त्याचा समावेश पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये हानिकारक ठरला. ॲडलेडमधील दुसऱ्या सामन्यात राणाने २४ धावा केल्या, ज्यामुळे गिलला हर्षित राणाकडे अष्टपैलू म्हणून पाहू लागला.

शुभमन गिलने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले की, ''मला वाटते की आमच्यासाठी, जर एखादा फलंदाज २०–२५ धावा करू शकला तर ते ८ व्या क्रमांकावर खूप महत्त्वाचे स्थान बनू शकते. आम्हाला विश्वास आहे की हर्षित राणा हे करू शकेल. उंच आणि १४० पेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करू शकणारे खूप कमी वेगवान गोलंदाज आहेत. म्हणून, जर आपण दक्षिण आफ्रिकेकडे पाहिले तर असे गोलंदाज अशा विकेटवर खूप महत्वाचे ठरतात.'' गिल पुढे म्हणाला, ''मधल्या षटकांमध्ये, आम्ही पाहिले की चेंडू विकेटवरून जास्त हलत नाही, म्हणून जर तुमची लेन्थ आणि वेग चांगला असेल तर तुम्ही संधी निर्माण करू शकता आणि मला वाटते की तेच घडले.'' गिलने दबाव निर्माण करण्याचे श्रेय फिरकीपटूंना दिले आणि त्यानंतर राणाने विकेट घेतल्या.

# रोहित शर्माची ऑस्ट्रेलिया सोडताना भावूक पोस्ट

सिडनी,ता.२६–

**रोहित शर्मासाठी सिडनीचे मैदान खास ठरले. कारण या मैदानाने रोहित शर्माला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. रोहित कोणत्याही गोष्टी कधीच विसरत नाही. यापुढे तो सिडनीच्या मैदानात कधीच खेळणार नाही, हेदेखील त्याला माहिती आहे. त्यामुळे सिडनी सोडताना रोहित शर्माने एक भावूक पोस्ट केली आहे. रोहित शर्माने आपला एक फोटो पोस्ट केला आहे आणि त्यावर असे काही एका वाक्यात लिहिले आहे की, चाहत्यांचे डोळे पाणावतील.**

रोहित शर्मासाठी ऑस्ट्रेलिया अविस्मरणीय असा देश आहे. कारण याच ऑस्ट्रेलियात रोहित शर्माला सलामीवीर म्हणून ओळख मिळाली. महेंद्रसिंग धोनीने संघात वीरेंद्र सेहवाग, गौतम गंभीर असतानाही युवा खेळाडूला वाव मिळावा, म्हणून रोहित शर्माला सलामीला आणले होते. त्याच ऑस्ट्रेलियाने रोहित शर्मा जेव्हा अडचणीत होता, तेव्हा त्याला साथ दिली. कॅप्टन्सी गेली होती. रोहित फक्त एक खेळाडू म्हणून संघात होता आणि डोक्यावर टांगती तलवार होती. पण रोहित ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आला आणि त्याच्या नावावर सर्वाधिक धावा जमा झाल्या, त्यासाठी रोहित ऑस्ट्रेलिया सोडताना भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

रोहित शर्माने शनिवारी सिडनीच्या मैदानात शतक झळकावले. रोहित शर्माला सामनावीर आणि मालिकावीर असे दोन्ही पुरस्कारही मिळाले. या एका सामन्याने रोहितची परिस्थिती बदलली आणि आता त्याच्या डोक्यावर टांगती तलवार नसेल. रोहित शर्मा रविवारी ऑस्ट्रेलियाहून मुंबईसाठी रवाना झाला. पण सिडनीच्या विमानतळावर जाताच रोहित शर्माने एक आपला फोटो पोस्ट केला आहे. हा फोटो सिडनी विमानतळामध्ये शिरतानाचा आहे. रोहित शर्माने या फोटोवर एका वाक्यात कमेंट लिहिली आहे.

रोहित शर्मा म्हणाला आहे की, वन लास्ट टाईम सिंगींग ऑफ फॉर्म सिडनी मराठीत चांगल्या शब्दांत म्हणायचे झाले तर अखेरचा हा तुला दंडवत, असे म्हणता येऊ शकते.रोहित शर्माने यावेळी ऑस्ट्रेलिया सोडताना एक भावूक पोस्ट लिहिली आहे.

